म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध.
सं. क्र. 2018

महान आरोहण

★

रॉबर्ट एल्. हाइलब्रोनर

REFBK-0015910

१८२२
निबंध
६४६२०
9313169

२०१९
मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्थलांक.
नवुक्रम ६४६२० दिः निबंध.
दालांक २०१९ ... क्रं 9313169

महान आरोहण

लेखक :

रॉबर्ट एल्. हाइलब्रॉनर

अनुवादक :

वसन्त गोविंद सहस्रबुद्धे

REFBK-0015910

पोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि. मुंबई २

Copyright © 1963 by Robert L. Heilbroner
'THE GREAT ASCENT :
The Struggle for Economic Development in our time'
By Robert L. Heilbroner
originally published by Harper & Row Publishers

मूल्य रु. २-५०

□ □

आवृत्ती पहिली : १९६७

□ □

प्रकाशक :
अ. क. गाडगीळ
वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि. करिता
३, राऊंड बिल्डिंग, काळबादेवी, मुंबई २

□ □

कंपोज :
बाबर व भंडारी कं.
३४२, नारायण पेठ,
पुणें २

□ □

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८, नारायण पेठ, पुणें २

प्रास्ताविक

आर्थिक विकास ही एक क्रांतिकारक प्रक्रिया आहे, यात काही शंका नाही. तरीसुद्धा आपल्यासारख्या अविकसित देशांचे नेते आणि अर्थशास्त्रज्ञ त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत, असे म्हटल्यावाचून राहवत नाही. प्रस्तुत ग्रंथाचे लेखक हाइलब्रॉनर यानी या बाबतीत आपले मत स्वच्छ सांगून टाकले आहे की, सद्यःस्थितीत लोकतांत्रिक भांडवलशाहीची शक्यता दुर्घट आहे. साम्यवाद ही आकर्षक गोष्ट असल्याचा दावा ते मान्य करतात. साम्यवादाच्या संकटाशी यशस्वीपणे टक्कर द्यावयाची असेल तर डाव्या गटांच्या सरकारांनाही साहाय्य करावे लागेल आणि अविकसित देशांचा विश्वास संपादन करण्यासाठी, आपल्या पायाखाली जळणारी वर्णभेदाची आग प्रथम शमवावी लागेल, असा इशारा त्यांनी पाश्चिमात्य राष्ट्रांना आणि अमेरिकेला परखड शब्दांत दिला आहे. तसें म्हटलें तर, हा ग्रंथ एका अर्थाने विशेषतः अमेरिकेला आणि सामान्यतः पाश्चिमात्य देशांना उद्देशूनच लिहिला आहे म्हटले तरी चालेल. परंतु त्यामधून आपल्यासारख्या अविकसित देशांपुढील समस्यांबाबत मार्गदर्शन मिळू शकते, असे आढळून येईल.

● ●

अनुक्रमणिका

१. कालाचे आव्हान

२. अपूर्ण विकसनाची रूपरेषा

३. मागासलेपणाचे जोखड

४. महान निश्चय

५. विकासाचे गतिशास्त्र

६. विकासगती

७. सामाजिक ताण

८. पाश्चात्त्यांना आव्हान



कालाचे आव्हान

वर्तमानकालीन घटना व फक्त एका पिढीपूर्वीच्या काळातील घटना यांची तुलना केल्यास जागतिक घटनांच्या व्याप्तीत झालेल्या वाढीपेक्षा अधिक लक्षवेधक गोष्ट आढळणार नाही. असे वाटते की जणू काय इतिहासाच्या नित्यपरिचित छोट्या आकाराच्या वार्तापटाचे परिवर्तन सिनेमास्कोपसारखे झाले आहे. आणि त्यामुळे इतिहासाचे दर्शन घडविणाऱ्या पडद्याचा प्रचंड विस्तार झाल्यामुळे रंगभूमीचे एकदा काळोखात असलेले कानेकोपरे प्रकाशमय झाले आहेत. व्याप्तीत झालेल्या बदलाची जाणीव हा भूतकाळापासून आपण दूर जात असल्यामुळे झालेला केवळ भास नव्हे. विसाव्या शतकाच्या मध्यकाळात मानवी व्यवहारांचा व्याप अभूतपूर्व वाढला आहे, हे पाहणारे आपण खरेखुरे प्रेक्षक आहोत. जो विस्तार झाला आहे तो मानवी जीवनातील एक फार महत्त्वाचा टप्पा दर्शवितो असेच कदाचित भविष्यकाळात दिसून येईल.

आजच्या घटनांची व्याप्ती आणि पंचवीस वर्षांपूर्वीची व्याप्ती यांची तुलना उद्‌बोधक ठरेल, द्वितीय महायुद्धाकडे नेणाऱ्या घटनांच्या साखळीने सारे जग वेढले गेले आहे. असेच पाश्चात्त्यांना त्या काळात वाटले. पण आज त्या वेळच्या इतिहासाच्या रंगभूमीची भव्यता आपले लक्ष वेधून घेत नाही तर तिच्या मर्यादा आणि संकुचितपणाच आपल्याला अधिक जाणवतो. युरोप आणि अमेरिका ज्या वेळी एका परममहत्त्वाच्या ऐतिहासिक कामगिरीत गुंतले होते, त्यावेळी निदान पाश्चात्त्यांच्या दृष्टीने पाहिल्यास पूर्वेकडील आणि दक्षिणेकडील जगाचे प्रचंड व दाट लोकवस्तीचे भाग निद्राधीन झाले होते. आपल्या पारतंत्र्याच्या बंधनांना कमजोरपणे हिसके देणारा भारत गुंगीत असलेल्या गलिव्हरसारखा दिसत होता. जगाची एक-चतुर्थांश लोकसंख्या

ज्यात आहे असा चीन संपूर्ण दमल्यामुळे शरण येऊन लष्करी बलात्काराचे दुःख सोशीत होता. लष्करी क्रांत्या व पिळवणूक या लॅटिन अमेरिकेत नित्याच्या घटना झाल्या असल्या तरी, कोणत्याही दृष्टीने पाहिल्यास त्यांचे ऐतिहासिक महत्त्व शून्य होते. आफ्रिका तर उपेक्षणीय अवस्थेत पिचत पडला होता. आणि एकंदर अनास्थेच्या वातावरणात नजिक पूर्वेकडील देश गंजून जात होता.

जवळ येत असलेल्या महायुद्धाशी साक्षात व क्रियात्मक संबंध नव्हता म्हणूनच केवळ वरील प्रदेश ऐतिहासिक घटनांच्या पडद्यापासून दूर फेकले गेले होते असे नव्हते. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट ही की, त्यांचे शांतता-कालीन जीवन हे पूर्णपणे निष्क्रिय होते. घटनांच्या वार्तापटात केवळ रशिया, युरोप, अमेरिका यांनाच स्थान होते हे काही उगाच नव्हे. उरलेल्या जगात अनास्था, निष्क्रियता यांचेच राज्य होते. पूर्वेकडील आणि दक्षिणेकडील खंडांतील लोकांना जे सहन करावे लागत होते त्याचे परिणाम विसाव्या शत-काच्या संस्कृतीच्या स्वरूपावर दिसण्याएवढे होतच नव्हते व झाले तरी प्रमाणाने अत्यल्प होते. आशिया, आफ्रिका अथवा लॅटिन अमेरिका यांतील लोकांच्या व्यक्तिगत आकांक्षांचा परिणाम त्यांच्या सामाजिक जीवनावर काहीही होत नव्हता. समान सामाजिक, राजकीय, आर्थिक जाणिवांनी असंख्य व्यक्तींची जीवने गुंफून जाणे व त्यामुळे त्यांना त्यांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या समान ध्येयाचा लाभ होणे हा जर इतिहास या शब्दाचा अर्थ असेल तर जगाच्या अविकसित भागाला इतिहासच तोपर्यंत नव्हता असे म्हटले तरी चालेल.

वर उल्लेखिलेली पोकळी भरून निघाल्यामुळेच वर्तमानकालीन परिस्थिती साधारणतः स्फोटक झाली आहे. पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे दिसून येणारी वाढती क्रियाशीलता, वाढता हिंसाचार आणि अव्यवस्था या गोष्टी महत्त्वपूर्ण झाल्या आहेत–एवढेच वर्तमानाचे व्यवच्छेदक लक्षण म्हणता येणार नाही. हिंसाचार आणि अव्यवस्था या गोष्टी या भागाला नव्या नाहीत. या भागात इतिहास घडविणारी, ज्या इतिहासाचे वर्णन यापुढे सत्तेसाठी होणारा व्यक्ती-व्यक्तीतील नित्यपरिचित संघर्ष असे करता येणार नाही, असा इतिहास घडविणारी, स्पष्टपणे दिसणारी कोणती गोष्ट असेल तर आता जागृत झालेल्या

प्रदेशातील आर्थिक विकासाची प्रक्रिया हीच होय. दारिद्र्य, हलाखी आणि त्याहीपेक्षा हेळसांड आणि अनुल्लेख हेच जे त्या भागातल्या बहुसंख्य जनतेचे आत्तापर्यंतचे 'जीवन' होते त्यातून सुटण्याचा विश्वव्यापी प्रयत्न असे या प्रक्रियेचे स्वरूप आहे.

विकासाची महान चढण चढण्याचा हा जो प्रयत्न आहे. त्याचे वर्णन जागतिक इतिहासाचा पहिला अध्याय (प्रवेश, अंक) असे करणे ही केवळ शब्दबाजी नव्हे, व्याप आणि विस्तार यात हा प्रयत्न यापूर्वीच कोणत्याही मानवी कर्तृत्वापेक्षा खचितच महान आहे. कारण सुमारे शंभर देशांना आर्थिक विकास ही राष्ट्रीय एकात्मता साधण्याची व घडत असलेल्या इतिहासात भाग घेण्याची मिळालेली संधी आहे. तसेच दोन अब्जांपेक्षा अधिक लोकांच्या दृष्टीने आर्थिक विकासाचा अर्थ केवळ जगण्याची व आपले व्यक्तिमत्त्व प्रस्थापित करण्याची संधी असा होतो. ही गोष्ट जगाच्या दृष्टीने क्षुल्लक असली तरीही ती अतिशय महत्त्वाची आहे. आर्थिक विकासाचे परिणाम सध्या हयात असलेल्या लोकांवर जेवढे होत आहेत, त्याहीपेक्षा अधिक भावी पिढ्यांच्या जीवनावर होणार आहेत.

विकासाचे महान आरोहण हा केवळ दारिद्र्याविरुद्ध झगडा नाही. जिला आपण विकासाची क्रिया म्हणतो ती दीर्घकाळाच्या संदर्भात, जगातील बहुसंख्य लोकांचा विचार करता, त्यांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक भवितव्याला आकार देणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेची परिणती कशी होते यावर जगातल्या केवळ गरीब आणि जीवनकलहात खोल रुतलेल्या देशातीलच नव्हे, तर श्रीमंत आणि मिरासदार देशांतील अनेक भावी पिढ्यांच्याही संस्कृतीचे स्वरूप अवलंबून राहणार आहे. शीत युद्धाचा किंवा तसे म्हटले तर प्रत्यक्ष युद्धाचा निर्णय कसाही लागो, मानवी संस्कृतीचे (जी काही शिल्लक राहिली असेल तिचे) दर्शन नव्याने जागृत झालेला व उदयास येऊ पाहणारा समाजच घडविणार आहे.

म्हणूनच आर्थिक विकासाच्या सुरुवातीने पूर्वे-दक्षिणेकडील नव्या जगाला जेवढे क्रियाशील बनविले आहे तेवढेच पश्चिमेकडील आणि उत्तरेकडील जुन्या जगालाही उद्युक्त केले आहे. इतिहास घडविणाऱ्या प्रक्रियेला जगाच्या मोठ्या प्रदेशात झपाट्याने प्रारंभ झाल्यामुळे उत्तरेकडील व पश्चिमेकडील

प्रदेशांच्या पार्श्वदृश्यात क्रांतिकारक असा बदल झाला आहे. रशियाला त्याचप्रमाणे अमेरिकेला आणि युरोपलाही नव्या विकासमान जगाची सुप्त विकसनशक्ती हे भौगोलिक अस्तित्वाचे नवे दालन खुले झाले आहे. त्याचप्रमाणे जनतेच्या जाणिवेची क्षितिजे फाकू लागल्यामुळे त्यांना नव्यानव्या समस्यांना तोंड देऊन राजकीय निर्णय घ्यावे लागत आहेत.

विकासाच्या या आनुषंगिक परिणामांचा प्रभाव अमेरिकेवर जेवढा पडला तेवढा इतर कोठेच पडला नसेल. हा प्रभावही अंशतः विकासाचे महान आरोहण समक्ष पाहण्यास मिळाल्यामुळे झालेली नैसर्गिक प्रक्रियाच आहे. आत्तापर्यंत मूक व असहाय्य असलेल्यांच्या आकांक्षांचा ध्वनी खोल दरीतून एखादा आवाज यावा तसा आपल्या कानी पडत आहे. आणि नरकाचे ओझरते दर्शन झाल्यास आपल्याला जेवढा धक्का बसेल तेवढा अरबी, भारतीय, आफ्रिका, बोलिव्हियन इत्यादि लोकांच्या, मासिकांच्या पानापानावर आणि दूरदृश्यवाणीच्या पडद्यावर दिसणाऱ्या चेहऱ्यावरील, वैफल्याचे आणि निराशेचे भाव पाहून बसत आहे.

आपल्या राष्ट्रनेत्यांची विचारप्रक्रियाही तेवढीच महत्त्वाची आहे. मानवसुलभ सहानुभूतीचा भाग बाजूला केला, तरी हे स्पष्ट आहे की, आपल्या अर्थव्यवस्थेलाच नव्हे तर आपल्या आकार देऊ पाहणाऱ्या विकासशील प्रदेशांनी जे आव्हान दिले आहे त्याकडे दुर्लक्ष करणे युनायटेड स्टेट्सला शक्य नाही. भिन्न जीवनविषयक तत्त्वज्ञाने आणि विविध शक्तिगट यांच्यातील संघर्षाचा निकाल विकासशील प्रदेशातील समाजात घडणाऱ्या घटनांची दिशा जी असेल तीवर ठरणार आहे. उभय पक्षांच्या चुकांवर तो अवलंबून नाही हे आता अधिक स्पष्ट झाले आहे. रशियाबरोबरील संबंधातील अनिर्णयावस्था दृढ होत असतानाच हे स्पष्ट होत आहे म्हणून नैतिक मूल्यांची जाणीव आणि राष्ट्रीय स्वार्थ ह्यांनी प्रेरित होऊन आरंभी बिचकत बिचकत पण नंतर वाढत्या जोमाने आपण आर्थिक विकासाला साह्य करू लागलो आहोत.

आपली प्रतिक्रिया खचित निर्भेळ नाही. अमेरिकेची संपत्ती अपव्ययकारी उद्दिष्टासाठी उधळली जात आहे, असा आरोप केला जात आहेच. तसेच परकीयांना करावयाच्या मदतीच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत तणातणी दिसून येत आहे, परकीयांना करावयाच्या मदतीच्या कार्यक्रमाला काँग्रेसचा

पूर्ण पाठिंबा मिळवण्यात रिपब्लिकन अथवा डेमोक्रॅटिक यांपैकी कोणत्याच पक्षाच्या शासनाला यश आले नाही. तरीही या बाबतीत जे साधलेले आहे ते किती थोडे आहे ह्यापेक्षा किती पुष्कळ आहे हे पाहण्यासारखे आहे. वीसच वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय आर्थिक साहाय्याची कल्पनादेखील हास्यास्पद वाटत होती, यावर आज विश्वासदेखील बसणार नाही, कारण आज आर्थिक विकासाला चालना हे अमेरिकेच्या परराष्ट्रीय आर्थिक धोरणाचे महत्त्वाचे अंग झाले आहे. एवढ्या थोड्या काळात लोकमताची दिशा व व्याप्ती इतकी बदलल्याचे दुसरे उदाहरण क्वचितच आढळेल. चालू शतकातील प्रश्नाबाबत अमेरिकेची जी प्रतिक्रिया आहे तिच्यावर दुसरा काही आरोप करता आला तरी आर्थिक विकासाचे जे आव्हान देण्यात आले आहे त्याबाबत चिक्कूपणाचा किंवा आस्थेच्या अभावाचा आरोप खचितच करता येणार नाही.

तरीपण विकासाच्या आव्हानाला अमेरिकेने दिलेला प्रतिसाद अत्यंत अपुरा आहे–चिंता वाटावी इतका अपुरा आहे, हे उघड आहे. आपली वैयक्तिक सहानुभूती किंवा आपली राष्ट्रीय उदारता यापेक्षा अधिक होऊ शकली असती असा याचा अर्थ नाही. उणीव आहे ती दुसऱ्या एका महत्त्वाच्या गोष्टीची. अमेरिकेच्या प्रतिसादात जर कशाचा अभाव तीव्रतेने जाणवत असेल, तर ती गोष्ट म्हणजे अत्यावश्यक असलेला समज होय. विकासाच्या महान आरोहणाचे खरे स्वरूप आपण कल्पनेने उभे करतो त्यापेक्षा वेगळे आहे हे आपल्याला समजलेलेे नाही.

निराळ्या शब्दांत सांगावयाचे तर, महान आरोहण आपल्याच डोळ्यांनी पाहावयाचे, त्याची वैशिष्ट्ये, गुणधर्म, सामर्थ्य यांचा अर्थ अमेरिकेच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय अनुरोधाने लावावयाचा या आपल्या प्रवृत्तीमुळे आपल्या परिसरांत उणीव निर्माण झाली आहे. विकासाचे आरोहण ही इजिप्त, भारत अथवा बोलेव्हिया यांतील लोकांना सावकाश पण निश्चितपणे आपल्यासारखे बनविणारी किंवा साऱ्या जगाला अमेरिकन बनविणारी प्रक्रिया आहे, अशी आपली भाबडी कल्पना या प्रवृत्तीच्या मुळाशी आहे. आपण आपल्या लोकप्रिय मासिकांत, वर्तमानपत्रांत आपल्या शांतिदलाच्या प्रतिनिधींच्या मित्रत्वाच्या हाकेला तेथील खेडुतांनी कसा हार्दिक प्रतिसाद दिला आणि आपल्या अवजारांच्या अथवा तंत्राच्या स्वयंसिद्ध श्रेष्ठत्वाची कशी स्तुती केली

ते वाचतो आणि अशी समजूत करून घेऊन बसतो की, साम्यवाद्यांनी काहीही कारवाया केल्या नाहीत आणि आपल्या मुत्सद्यांनी चुका केल्या नाहीत तर अमेरिकन जीवनपद्धतीकडे तेथील लोक नैसर्गिकरीत्या आकर्षित होतील आणि अमेरिकन कल्पनांना उराशी कवटाळतील.

विकासाच्या प्रश्नाशी आणि कार्याशी ज्यांचा साक्षात संबंध येतो त्यांचा असा गैरसमज अर्थातच होणार नाही. मासिकात व्यक्त होणारे विकासाचे सुबोध चित्रण आपल्या सरकारी अधिकाऱ्यांना, विद्यापीठातील विद्वानांना आणि तज्ज्ञांना मान्य नाही. इतरांच्या संस्कृतीच्या वेगळेपणाची त्यांना जाणीव आहे आणि त्या संस्कृतीला अमेरिकन जीवनगती आणि सामाजिक संस्था यांचा मर्यादित उपयोग आहे हीही जाणीव आहे. विकास म्हणजे अमेरिकन जीवनाची निर्यात अशी त्यांची समजूत नाही व तशी त्यांची इच्छाही नाही.

तरीपण वरील जाणत्या लोकांचा एक अमेरिकन दृष्टिकोण आहे व त्याचा परिणाम विकास-कार्यासंबंधीच्या कल्पनेवर होतो. सामाजिकदृष्ट्या विधायक बाजूवर भर देण्याच्या प्रवृत्तीत तो दृष्टिकोण अंशतः दिसून येतो. तसेच अंशतः तो विकासशील राजकीय प्रक्रियांचा अन्वयार्थ अमेरिकन राजकीय परिभाषेत बसवता येईल या समजुतीत दिसून येतो. अविकसित देशांत द्रुतगतीने आर्थिक विकास झाल्यास अमेरिकेप्रमाणेच त्या देशातही सामाजिक आणि राजकीय स्वास्थ्य निर्माण होईल असे अधिक विचार न करता मानण्यात देखील तो अंशतः दिसून येतो. थोडक्यात या जाणत्या लोकांच्या दृष्टिकोणात अधिक वास्तवता असली व वस्तुस्थितीचा तिला अधिक आधार असला तरी सामान्य लोकांप्रमाणेच हे लोकही विकासाच्या महान आरोहणाचे स्वरूप, वैशिष्ट्ये, सामर्थ्य यांत आपल्या अनुभवापेक्षा काही तरी वेगळे असेल, किंबहुना ते पूर्णपणे अमेरिकेपेक्षा भिन्न असेल ही शक्यता विचारात घेत नाहीत.

वरवर पाहता विकासाच्या अमेरिकन दृष्टिकोणात स्वीकारणीय असे बरेचसे आहे असे दिसते. त्याने आपल्या सदिच्छा, आपला उत्साह, एका मोठ्या आव्हानाला तोंड देण्याची आपली तयारी या प्रवृत्तींना तोंड दिले जाते. त्याने विकासाला दिलेला आपला पाठिंबा आणि शीत युद्धातील आपली भूमिका यांचा समन्वय साधतो आणि मानवतावादी हेतूने विकासाला पाठिंबा देताना सरळ असे नैतिक निर्णय आपल्याला घेता येतात.

म्हणूनच एका महान आणि अतिशय महत्त्वाच्या संघर्षाला साथ देण्यात एकत्र आणणाऱ्या दृष्टिकोणाबाबत संशय व्यक्त करताना मनाची संभ्रमावस्था होते. पण अडचण ही आहे की, प्राप्त परिस्थितीत अमेरिकन दृष्टिकोण कितीही उपयुक्त वाटला तरी भवितव्याला तोंड देण्याच्या दृष्टीने तो आपल्याला उपयोगी ठरू शकेल असे नाही. आज तो आपल्याला विकासाची बाजू घ्यावयास लावतो. कारण विकासाच्या पोटी काय दडले आहे ते अमेरिकन दृष्टीला ज्ञात आहे. आणि पुढील काही वर्षे योग्य ठरेल अशी विचारसरणी त्या दृष्टिकोणामुळे आपल्यात तयार होते. पण पुढील पन्नास वर्षांत तीच विचारसरणी योग्य ठरेलच असे नाही. विकासाच्या महाआरोहणाचा प्रभाव जगाच्या इतिहासावर जेव्हा निश्चितपणे पडू लागेल तेव्हा हे कळून चुकेल. थोडक्यात म्हणजे विकासाची आपली सध्याची जी कल्पना आहे त्यामुळे जी कार्ये आणि विचार यांना चालना मिळते, त्यांच्यात इतर सर्व गुण आहेत; फक्त भविष्यकाळातही स्वीकारणीय ठरण्याचा गुण नाही.

या छोट्या ग्रंथाचा उद्देश महान आरोहणासंबंधी एक वेगळा दृष्टिकोण मांडणे हा आहे. प्रचलित दृष्टिकोणाशी तुलना करता भविष्यकाळाच्या कसोटीलाही उतरण्याइतका तो लवचिक ठरेल अशी आशा आहे. प्रचलित दृष्टिकोणाच्या मानाने नवा दृष्टिकोण अधिक संदिग्ध, आपल्याकडून अधिक अपेक्षा करणारा आणि प्रश्नमय असल्यामुळे आर्थिक विकासाच्या उत्साहाने भारलेल्याला यापुढील पानांतील विचारसूत्र अकरणात्मक, नैराश्यपूर्ण असे वाटण्याचा संभव आहे. पण या ग्रंथामागील हेतूंचा हा विपर्यास ठरेल. महान आरोहण हा एक प्रचंड उद्योग आहे आणि त्याला प्रत्येक विकसित देशाच्या प्रयत्नांचा आणि आकांक्षांचा हातभार लागला पाहिजे हा विचार या ग्रंथाचा गाभा आहे. पण एखाद्या मृगजळावर या आशा आधारून आपल्या प्रयत्नांची दिशा ठरविणे यात फारसा फायदा नाही, तोटा मात्र पुष्कळ आहे. महान आरोहण यशस्वी व्हावयाचे असेल आणि त्यातून बाहेर पडणाऱ्या ज्वालामुखीच्या स्फोटाशी अमेरिकेला व पाश्चात्त्य देशांना जुळवून घ्यावयाचे असेल तर विकासक्रियेची स्पष्ट व वस्तुनिष्ठ आलोचना होणे अगत्याचे आहे.

याचा अर्थ असा होतो की, विकासाकडे आपण बाहेरून म्हणजे अमेरिकन दृष्टीने न पाहता, आतून म्हणजे विकसित होणाऱ्या देशांच्या दृष्टीनेच पाहिले

पाहिजे. दृष्टीदृष्टीतील हा फरक केवळ भौगोलिक फरक नाही. ज्या सीमांचे उल्लंघन करावयाचे आहे, त्या अंगवळणी पडलेल्या विचारपद्धती खोलात न शिरता, स्वीकारलेल्या कल्पना, सोयिस्कर अशा सामाजिक, राजकीय, आर्थिक मर्यादा यांच्या सीमा होत. ह्या पद्धती, ही गृहीते, या मर्यादा या सर्व गोष्टी अमेरिकन प्रश्नांचा विचार करताना योग्य असतील; पण जागतिक इतिहासातील प्रचंड अशा नवप्रवाहावर प्रकाश पाडणे त्यांना जमत नाही. महान आरोहण ज्या प्रदेशात चालू आहे त्यात प्रवेश करण्यापूर्वी ज्या बौद्धिक आणि वैचारिक मर्यादा ओलांडावयाच्या आहेत त्यांचा शोध घेऊन, त्यांचे वर्णन करण्याचा प्रयत्न पुढील प्रकरणात केला आहे. तत्पूर्वी ज्या समस्या हाताळावयाच्या आहेत त्यांबाबत काही धोक्याच्या सूचना करणे विषयप्रवेशाच्या दृष्टीने उचित होईल.

(१) आर्थिक विकास ही मुख्यतः आर्थिक प्रक्रिया नसून सामाजिक-राजकीय प्रक्रिया आहे.

अमेरिकेच्या दृष्टिकोणातून पाहिल्यास बिल्क द बार किंवा पश्चिम व्हर्जिनिया या मागासलेल्या विभागांना तात्पुरत्या अडचणीतून बाहेर काढण्याची प्रक्रिया व आर्थिक विकासाची प्रक्रिया या सारख्याच वाटण्याचा संभव आहे. निराळ्या शब्दांत सांगावयाचे तर सतत होणारा धनसंचय आणि सावकाश निश्चित वाढत जाणारा रोजगार आणि उत्पन्ने म्हणजे आर्थिक विकास असे आपण स्वाभाविकपणे समजतो. तसे करताना आपण हे विसरतो की अशा प्रकारच्या शुद्ध आर्थिक विकासासाठी ज्यात धनसंचय होऊ शकेल आणि ज्यात रोजगार व उत्पन्ने यांची वाढ सातत्याने होऊ शकेल असा समाज प्रथम अस्तित्वात असला पाहिजे.

पण नेमकी अडचण ही आहे की, असा समाज अविकसित प्रदेशात अस्तित्वात नाही. अविकसित देशांबाबत प्रमुख चिंतनीय गोष्ट ही आहे की, अमेरिकन अर्थाने त्या देशांत 'अर्थव्यवस्था'च नाही. म्हणजे दीर्घकाळ सातत्याने आर्थिक विकास होण्यासाठी ज्या संस्था, ज्या परंपरा, जी संपत्ती, जी कौशल्ये पूर्वतयारीच्या दृष्टीने आवश्यक असतात त्यांचा तेथे अभाव आहे.

आर्थिक विकासाची प्रक्रिया ही प्राथमिक अवस्थेत उपरोक्त स्वरूपाचा समाज घडविण्याचीच प्रक्रिया असते. साहजिकच प्रथमप्रथम विकास

बहुतांशाने आर्थिकपूर्व असतो. दृष्टिकोनामध्ये बदल घडवून आणणे व सक्तीने किंवा इतर मार्गांनी व कामचलाऊ असे संस्थात्मक इमले उभारणे हा त्या विकासाचा प्रधान हेतू असतो. त्यासाठी मूलगामी सामाजिक परिवर्तन होणे आवश्यक असते, आणि ते होण्यासाठी समर्थ अशा राजकीय शक्तींचे संचालन लागते. आर्थिक विकास हा 'फक्त आर्थिक' असतो असे समजण्यात आपण स्वतःची फसवणूक करतो. परिपूर्ण अशा सामाजिक, राजकीय कायाकल्पानेच महान आरोहणाला गती लाभेल, आणि त्यांच्या गतीतूनच आणखी सामाजिक-राजकीय बदल घडून येतील.

(२) आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेल्या सामाजिक-राजकीय परिवर्तनाचें स्वरूप क्रांतिकारक असण्याची शक्यता आहे.

विकास हा उत्क्रांतीच्या स्वरूपाचाच असतो, अशी दुसरी एक चुकीची समजूत अमेरिकेत आहे. महान आरोहणाच्या प्रक्रियेत प्रस्थापित समाज-व्यवस्थेत सुबत्ता वाढते आणि श्रीमंतांना व गरिबांना समप्रमाणात नसला तरी फायदा मिळतो असा ह्या समजुतीचा अर्थ आहे.

दुर्दैवाची गोष्ट अशी की विकासाच्या राजकीय गतिमानतेचे वरील वर्णन अपूर्व नाही. मागासलेल्या राष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक व्यवस्थेच्या पुनर्रचनेचा एक अंगभूत भाग म्हणजे वर्गवडणीची पुनर्रचना हा होय. सत्ता, संपत्ती, हक्कांवरील मर्यादा यांच्यात यामुळे एवढा क्रांतिकारक बदल होण्याची शक्यता आहे की, पूर्वीच्या वर्चस्व गाजविणाऱ्या हितसंबंधांना धोका प्राप्त होईल, कदाचित त्यांचा विलयही होईल, आणि त्या जागी नव्या व महत्त्वाकांक्षी हक्कदारांची प्रस्थापना होईल.

म्हणजेच विकासप्रक्रियेच्या केंद्रस्थानी क्रांतिकारक अशी सुप्तशक्ती दिसून येते या अर्थाने क्रांतिकारक नव्हे, सत्ता-संपत्तीचे औद्योगिक क्रांतीनंतर झाले तसे संथ पुनर्विभाजन होईल, तर फ्रेंच आणि रशियन क्रांतीनंतर झाले तसे द्रुत, संपूर्ण आणि क्लेशकारक पुनर्विभाजन होईल या अर्थाने.

अशा आत्यंतिक राजकीय परिभाषेत विचार करण्याची आपल्याला सवय नाही. राजकीय सत्तेचे हस्तांतर झाल्याशिवाय महान आरोहणाला गती लाभणार नाही, याकडे जेव्हा आपले लक्ष वेधण्यात येते, तेव्हा आपण लगेच 'सुधारणां'चा विचार करतो व जाहीरपणे त्यांना प्रोत्साहनही देतो, पण

विकासाचा ताण "सुधारणां"ना म्हणजेच राजकारणाच्या आखाड्यात एका विंदूपासून शेजारच्या दुसऱ्या विंदूकडे "सौकर्ययुक्त हस्तांतर होण्याला अनुकूल नसतो. याउलट विकासातील अटळ वर्गकलह व वर्गातील वाढते अंतर राजकारणाच्या आखाड्यात एका बाजूकडून दूसऱ्या बाजूकडे-अगदी विरुद्ध बाजूकडेही अकल्पित संक्रांतर होण्यास अनुकूल ठरते.

क्रांतिकारक प्रवृत्ती पुराणमतवादी देशाला आकलन होण्यास कठीण अशा दिसून येतात. जगात काही प्रकारचे 'क्रांतिकारक' बदल होणे अमेरिकेला मान्य होईल, पण महान आरोहणाच्या ओघात होणारे बदल सामान्यतः अशा प्रकारचे असणार नाहीत.

(३) आर्थिक विकास ही सामाजिक स्वास्थ्य निर्माण करणारी प्रक्रिया नाही.

विकासाला एकदा गती लाभली की सामाजिक ताण आस्ते आस्ते कमी होईल आणि लोकांचे नीतिधैर्य व समाधान यांत वाढ होईल अशी आणखी एक समजूत अमेरिकेत रुजली आहे. या अपेक्षांच्या बाबतीतही आपल्या वाट्यास घोर निराशाच येणे संभवनीय आहे. मागासलेल्या देशांतील लोकांचे राहणीमान नजिकच्या अनेक वर्षांत उल्लेखनीय एवढे वाढेल अशी विकास-प्रक्रियेची यंत्रणा नाही. याउलट संकल्प व सिद्धी यांत तफावत हेच विकासाचे वैशिष्ट्य ठरेल, म्हणजेच अपुरेपणाची वाढती जाणीव आणि दारिद्र्य व खास हक्क यांबाबत कमी होत जाणारी सहनशीलताच त्यातून प्रकट होईल. सामान्य जनतेत विकासामुळे नवी वैफल्ये, वाढता उतावीळपणा आणि असंतोष, तशीच नव्याने अंकुरणारी वैमनस्ये यांचाच प्रत्यय येईल.

राष्ट्राच्या सुबुद्ध व सुशिक्षित वर्गांनाही विकासाची किंमत मोजावी लागते. अटळ अशी सामाजिक पुनर्रचना सनातन जीवनमूल्यांचा विलय, राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रांत वर चढलेल्यांच्यामुळे निर्माण होणारा तिटकारा, अर्धशिक्षित बुद्धिजीवींच्या वाढत्या दलाचा अफाट उत्साह आणि घोर निराशा या सर्व फुटीर प्रवृत्ती विकासप्रक्रियेच्या सर्वसाधारण वातावरणात उमटतात आणि त्यांचा प्रभाव वाढत जातो. महान आरोहणाचा काल हा वाढत्या सामाजिक सुसंवादाचा काल आहे असे समजणे चूक आहे. तो काल विसंवाद व असंतोष निर्माण करणारा ठरणेच अधिक संभवनीय आहे.

(४) महान आरोहण यशस्वी होईलच अशी खात्री देता येणार नाही.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला अपयश द्यावे लागणारच नाही असे जे एक गृहीतकृत्य आहे ते अस्सल अमेरिकन आहे. अविकसित देशांतील एका पिढीच्या प्रयत्नातून अमृत बाहेर न पडता पराभवाचे हलाहल बाहेर पडेल अशी कल्पना देखील आपल्याला करवत नाही.

तरीपण या समजांच्या मार्गातील अडचणींची दीर्घ चढण चढून जाणाऱ्या बहुतेक देशांना निदान आपल्या पिढीच्या कालावधीत तरी पराभव पत्करावा लागेल हीच फार शक्यता आहे. निकटपूर्व, मध्य आणि उत्तर आफ्रिका, मध्य आणि दक्षिण अमेरिका आणि महत्त्वाचे असे भारत आणि इंडोनेशिया या प्रदेशांतील बहुतेक भागांत पुढील दहावीस वर्षांत स्वयंचलित विकास झालेला दिसून येईल असा संभव नाही. काही देशांत उल्लेखनीय प्रगती दिसून आली तरी बहुतेक देशांतील बहुसंख्य जनता विकासाच्या प्राथमिक अवस्थेच्या अखेरीस सुद्धा सुरुवातीस होती त्याच पातळीवर असेल.

हे देश सदैव गरीब व मागासलेले राहतील असा ह्याचा अर्थ नाही. विकासाच्या केवळ प्रयत्नांमुळे या देशांतील जीवनाची घडी एवढी पालटेल की, ती पूर्वपदावर पुन्हा कधीच येऊ शकणार नाही. कराव्या लागणाऱ्या त्यागामुळे आणि दाखवाव्या लागणाऱ्या कर्तृत्वामुळे सर्वसाधारण जीवनात तावडतोब जरी बदल झाला नाही तरी त्याची पातळी जाणवण्याइतकी उंचावण्याचा दिवस त्यामुळे जवळ येईल. पण विकासाला लागणारा कालावधी आपल्या अपेक्षेपेक्षा मोठा आणि त्याची गती आपल्या कल्पनेपेक्षा मंद असेल. विकासाच्या यशासंबंधीच्या आपल्या अपेक्षा आपल्या पिढीत थोड्यादेखील पुऱ्या होणार नाहीत, ही जाणीव बाळगणे वस्तुस्थितीला धरून होईल.

(५) विकासाची किंमत म्हणून राजकीय आणि आर्थिक हुकूमशाहीचा स्वीकार कदाचित करावा लागेल.

संस्थात्मक महान परिवर्तन, शक्तिमान राजकीय आकांक्षांना दिली जाणारी चालना, क्रांतीची संभवनीयता, सामाजिक संघर्ष, भवितव्याची कष्टमयता, या सर्वांचा अर्थ एकच आणि तो म्हणजे राजकीय आणि आर्थिक हुकूमशाहीचा स्वीकार ही विकासासाठी द्यावी लागणारी किंमत ठरेल. ह्या हुकूमशाहीचे स्वरूप

देशोदेशी वेगळे असेल; कुठे हुकूमशाहीचा अतिरेक दर्शविणारे असेल, तर कोठे काही प्रमाणात सहनशील असेल. हे सर्व खरे असले तरी बहुतेक विकासक्षम देशांत चढणीच्या अंगभूत ताणामुळे कमीअधिक वर्षात प्रगती व्हावयाची असेल, तर केंद्रीय हुकूमशाही प्रस्थापित होणे फारच संभवनीय आहे. बहुतेक मागासलेल्या देशांत विकासाच्या बरोबरीने शक्तिमान हुकूमशाहीचे सरकार आणि सामुदायिक आर्थिक यंत्रणा ही दिसू लागतील. हे केवळ विकासाचा आनुषंगिक परिणाम म्हणून नव्हे तर विकासाच्या महान प्रक्रियेचे सातत्य टिकविण्यासाठी जो मोठा प्रयत्न करावा लागेल त्याची आवश्यक पूर्वतयारी म्हणून.

दुर्दैव म्हणजे मागासलेल्या देशांतल्या सामाजिक व आर्थिक शक्तींचे संपूर्णपणे नियंत्रण केले तरी संकल्प व सिद्धी यांच्यातील अंतर भरून निघेल, एवढी द्रुतगती विकासाला प्राप्त होणार नाही. म्हणून अतिराष्ट्रीयवादी अथवा लष्करी स्वरूपाच्या चळवळी, केवळ वैफल्यभावनेला वाट मिळवून देण्यासाठी केल्या जातील, अशी अपेक्षा करणे शहाणपणाचे होईल. महान आरोहणाच्या कार्यात बेदिली न माजता, सामाजिक शिस्त राखण्याचे साधन म्हणून स्थानिक लढाया अथवा हुकूमशाही अथवा ह्या दोन्ही गोष्टी यांचाच उपयोग केला जाईल हे कटू सत्य आहे.

विकासाच्या प्रक्रियेसंबंधीचे वरील पैलू लक्षात घेतले तर आरोहणासंबंधी आत्तापर्यंत ज्या सवयीने आपण जी कल्पना करीत होतो त्यापेक्षा वेगळेच असे त्याचे स्वरूप दिसेल. विकासाचे वास्तव स्वरूप त्यासंबंधीच्या सर्वसाधारण अमेरिकन कल्पनांपेक्षा अगदी भिन्न आहे आणि अमेरिकेचे विकासविषयक राष्ट्रीय धोरण अद्याप वस्तुस्थितीपासून फार दूर आहे. आणि आपली सहानुभूती व औदार्य कितीही स्पृहणीय असले तरी त्याचे पाठबळ अवास्तव आदर्शांना दिले जात आहे. असाही अर्थ त्यातून निघतो, हे आपल्याला शुद्धीवर आणणारे आहे.

आपली सहानुभूती आणि साहाय्य यांची दिशा चुकली आहे किंवा विकासकार्याकडे आपण पाठ फिरवावी असा वरील विवेचनाचा अर्थ नाही. सांगण्याचा मुद्दा असा आहे की, विकास हा जागतिक इतिहासाचा एक प्रचंड विस्तार असल्यामुळे आपण एका वेगळ्या परिस्थितीत सापडलो आहोत; पण

तिचा संपूर्ण अर्थ आपल्याला स्पष्ट कळलेला नाही. एका अर्थाने ज्याप्रमाणे ध्रुव प्रदेशातला बर्फविस्तार खाली पसरू लागला तर, नव्या बर्फयुगाकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही, त्याचप्रमाणे आपली कितीही इच्छा असली तरी आपल्याला महान आरोहणाकडे पाठ फिरविता येणार नाही. विकास ही आजच्या काळातील मुलभूत वास्तवता आहे आणि त्याच्याकडे एक कल्पनासृष्टीतील किंवा भावनागर्भ प्रक्रिया म्हणून न पाहता एक वस्तुस्थिती म्हणून पाहिले पाहिजे, हेच अमेरिकेला दिले गेलेले खरेखुरे आव्हान आहे.

आपल्यापुढे कोणकोणते पर्याय आहेत, परिस्थितीची जी नवी आणि क्लेशदायक जाणीव आपल्याला झाली आहे तिच्याशी आपला दृष्टिकोण आणि धोरणे कशी जुळवून घ्यावी लागतील हा विषय थोडा वेळ लांबणीवर टाकणे भाग आहे. कारण विकासाचे वरील अनपेक्षित पैलू विकासाच्या प्रक्रियेतच कसे अंगभूत आहेत हे अजून आपल्याला समजावयाचे आहे. त्यासाठी महान आरोहणाची प्रत्यक्ष कार्यरीती आपल्याला समजून घ्यावी लागेल. आपल्या कल्पनेतील नव्हे तर प्रत्यक्षातील आर्थिक विकासाचा जवळून परिचय झाल्याशिवाय त्याच्या आव्हानाला कसा प्रतिसाद द्यावयाचा हे आपल्याला ठरविता येणार नाही. म्हणून आता आपण अविकसित जगाकडे अविकसितावस्थेची प्रत्यक्ष वस्तुस्थिती जाणण्याचा हेतू मनात बाळगून वळू या.

• •

२

अपूर्णविकसनाची रूपरेषा

जो प्रश्न सोडविण्यासाठी आर्थिक विकास करावयाचा आहे, त्याचे स्पष्ट चित्र उभे करणे आर्थिक विकासाची कल्पना येण्यासाठी अवश्य आहे. ज्या दोन अब्ज मानवांच्या बाबतीत अविकास म्हणजे केवळ आकडेवारी नसून दैनंदिन जीवनातील एक जिवंत अनुभव आहे, त्यांच्या दृष्टीने अविकासाचा अर्थ काय हे आपण आपल्या मनश्चक्षूपुढे आणले पाहिजे. ज्यांना चढण चढावयाची आहे त्यांच्या भूमिकेवरून महान आरोहणाकडे पाहिल्याशिवाय चढणीतील अडचणींची कल्पना आपल्याला येईल ही आशा फोल आहे.

हे मानसिक उड्डाण सोपे नाही. तरी पण उपनगरात छोट्या घरात राहणाऱ्या व सहासात हजार डॉलर्स उत्पन्न असणाऱ्या प्रातिनिधिक अमेरिकन कुटुंबाला अविकसित जगातील प्रातिनिधिक कुटुंब व्हावे लागले आहे अशी कल्पना करून ही उडी मारण्याचा प्रयत्न करू या.

आपल्या काल्पनिक अमेरिकन कुटुंबातले फर्निचर काढून टाकून आपण आपल्या प्रयत्नांना सुरुवात करू या. पलंग, टेबले, टेलिव्हिजन सेट, दिवे सर्व काही काढले जाईल. त्या कुटुंबाजवळ फक्त काही जुनी कांबळी, स्वयंपाकघरातील एक टेबल व एक लाकडी खुर्ची राहील. कपाटाबरोबर कपडेही जातील; पण कुटुंबातील प्रत्येकाला आपला अगदी जुना पोशाख, सदरा अथवा पोलके ठेवता येईल. कुटुंबप्रमुखाकडे पादत्राणे राहतील पण त्याच्या बायकामुलांना ती ठेवून घेता येणार नाहीत.

आपण आता स्वयंपाकघरात जाऊ. उपकरणे आधीच काढून घेतली आहेत. काड्यापेट्या, पिठाची एक छोटी पिशवी, थोडी साखर व मीठ राहील. किडू लागलेले व आधीच केराच्या टोपलीत गेलेले काही बटाटे घाईने वाचवले

पाहिजेत, कारण रात्रीच्या जेवणाचा तोच तर मोठा आधार आहे. मूठभर कांदे व कडवे वाल तसेच राहू देऊ या. मांस, ताज्या भाज्या, डबाबंद वस्तू, मिठाई इत्यादी बाकी सर्व आपण काढून घेऊ.

घर आपण आता साफ केले आहे. स्नानगृह पाडले आहे. नळाचे पाणी बंद केले आहे, विजेच्या तारा काढून टाकल्या आहेत. घरही आता काढून घेऊ आणि कुटुंबाला पडवीत जाण्यास सांगू. तेथे गर्दी होईल. पण हॉलयॉग म्हणजे एका पलंगाच्या जागेत (म्हणजे पलंग व त्याने व्यापलेली जागा, एकावर एक दोनतीन बिछाने असलेली) चार किंवा अधिक माणसे असलेले संबंध कुटुंब राहते त्यापेक्षा ते काही वाईट नाही. त्यांचा खाजगीपणा म्हणजे पडद्याने मिळेल तेवढा.

आता कोठे आपण सुरुवात केली आहे. भोवतालची सर्व घरेही काढून टाकली आहेत आणि आपले उपनगर झोपडपट्टी झाले आहे. पण आपल्या कुटुंबाला काहीतरी आसरा आहे. ते नशीबवानच म्हटले पाहिजे. कलकत्त्यात अडीच लाख लोकांना आसराच नाही आणि ते रस्त्यावर राहात आहेत. आपले कुटुंब आता कोलंबियातील काली शहराच्या पातळीवर आले आहे. तेथे जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांच्या माहितीप्रमाणे फक्त एका टेकडीच्या उतारावर दिवाबत्ती, पाणी, हवा यांची सोय नसलेल्या झोपड्यातील वस्ती चाळीस हजार आहे. आणि कालीतील सर्व गरीब एवढे नशीबवान नाहीत. इतरांनी शहराजवळ पूररेषेखालील जमिनीवर झोपड्या बांधल्या आहेत. त्यांना उघड्या गटारातून येणाऱ्या सांडपाण्याजवळ राहावे लागते, आणि नदीचे पाणी चढेल तेव्हा सांडपाणी त्यांच्या झोपड्यांत शिरते.

अजूनही जगाच्या मोठ्या भागात जी जीवनपातळी आहे त्या पातळीपर्यंत आपले अमेरिकन कुटुंब घसरले आहे असे म्हणता येणार नाही. त्यासाठी वाहतुकीची साधने नाहीशी झाली पाहिजेत. यापुढे वर्तमानपत्रे, मासिके, पुस्तके नाहीत. त्यामुळे काही बिघडेल असे नाही; कारण आपल्या कुटुंबाची साक्षरता पण नाहीशी होणार आहे. आपल्या झोपडपट्टीत एक रेडिओ आहे, पण बहुसंख्य रेडिओ शहरी लोकांच्या मालकीचे असल्याने आपली ही सवलत औदार्याचीच म्हणावी लागेल.

सरकारी सेवाकर्मे यानंतर गेलीच पाहिजेत. यापुढे टपालवाला नाही आणि आगीचा बंबवाला नाही. शाळा आहे पण ती तीन मैलांवर आहे.

आणि तीत फक्त दोन वर्ग आहेत. तीत फारशी गर्दी नाही. कारण वसाहतीतील फक्त निम्मीशिम्मी मुलेच शाळेला जातात. जवळपास अर्थात रुग्णालये किंवा डॉक्टर्स नाहीत. सर्वांत जवळ दवाखाना दहा मैल लांब आहे आणि त्यात फक्त एक सुईण आहे. तेथे जाण्यासाठी कुटुंबास सायकल असेल तर तिचा उपयोग करता येतो. पण सायकल असण्याची शक्यता कमीच. बसमधून जाता येईल. बसच्या आत जागा मिळणार नाही, पण टपावर बहुधा मिळेल.

शेवटी पैशाचा विचार. आपल्या कुटुंबाला आपण पाच डॉलरची रोकड जवळ बाळगण्यास परवानगी देऊ. त्यामुळे रुग्णालयात बरा होण्यासाठी प्रवेश मिळण्याकरिता ३·९४ डॉलर लागतात या समजुतीने ते मिळविण्याचे प्रयत्न करून त्यांत अपयश आल्यामुळे डोळे गमावून आंधळे होण्याची पाळी एका इराणी शेतकऱ्यावर आली, तशी आपत्ती तरी आपल्या कुटुंबातील कर्त्या पुरुषावर येणार नाही. आपल्या कुटुंबप्रमुखाला चरितार्थ चालविलाच पाहिजे. तीन एकरांची मशागत करणारा शेतकरी या नात्याने शंभर ते तीनशे डॉलर किमतीचे पीक तो काढू शकेल. तो शेतकरी जर कूळ असेल–आणि तीच शक्यता अधिक–तर एक-तृतीयांश पीक जमीन-मालकाला द्यावे लागेल आणि दहा टक्के स्थानिक सावकाराला द्यावे लागेल; तरी पण खायला पुरेसे उरेल अथवा कसेबसे पुरेल एवढे उरेल. मनुष्याच्या शरीराला पेशींची खर्च झालेली शक्ती भरून काढण्यासाठी दोन हजार कॅलरी अन्न खावे लागते. आपल्या घराला मुकलेल्या अमेरिकन गृहस्थाने जर भारतीय शेतकऱ्यापेक्षा अधिक कमाई केली नाही तर त्याला सरासरीने १७००–१९०० कॅलरी अन्न उपलब्ध होईल. अपुरे तेल मिळालेल्या यंत्राप्रमाणे त्याचे शरीर झिजू लागेल. भारतातले जन्मकालीन सरासरी अपेक्षित आयुर्मान चाळीस वर्षांपेक्षा कमी असण्याचे कारण हे आहे.

पण मुलांची मदत होऊ शकेल. ती नशीबवान असल्यास त्यांना काम मिळेल आणि कुटुंबाच्या उत्पन्नात भर टाकण्यास काही रोकड हाती येईल. उदाहरणार्थ, पाकिस्तानमधील हैद्राबाद शहरात छोट्याशा घासलेटी दिव्यातील ज्योतीवर बांगड्यांची टोके जुळविण्याचे जे काम असते तसे घरी करता येण्याजोगे सोपे काम त्यांना मिळू शकेल. बांगड्यांची टोके जुळविण्याचे वेतन अर्थातच कमी–आठ आणे किंवा दहा सेंट असेल. म्हणजे एक ग्रोस बांगड्या

जोडण्यास आठ आणे. आणि त्यांना काम मिळाले नाही तर ? तर इराक्रमधली मुले भुकेच्या वेळी घोड्याच्या लिदेतून न पचलेले दाणे वेचून गोळा करतात त्याप्रमाणे उकिरड्याचा उपसा करावा लागेल.

आता आपले प्रातिनिधिक अमेरिकन कुटुंब मानवी जीवनाच्या अगदी किमान पातळीवर आले. या पातळीवर आपल्याला निदान एक अब्ज, फारफार दहा कोटी कमी असतील, लोक आढळतील. मागासलेल्या प्रदेशातील उरलेले अब्ज लोक जरा बऱ्या पण फार बऱ्या नाहीत अशा स्थितीत आहेत. त्यातील थोडेसे सुस्थितीत आहेत आणि मूठभर श्रीमंत आहेत.

अर्थात वर जे काही सांगितले, ते अविकसित भागातील स्थूल दर्शन झाले; प्रत्यक्ष जीवन नव्हे. अविकासामुळे येणाऱ्या आणि जाणाऱ्या काही गोष्टींचा उल्लेख त्यात कमीच आहे. दारिद्र्याचा सुतकट वास, रोगराई, माशा, उघडी गटारे यांचे प्रतिबिंब त्यात नाही. सहवासामुळे येणारी सुखद जाणीव त्यात दिसून येत नाही. गोळ्यातील घरगुती जीवनात सुद्धा आनंदाचा व उन्मादाचा भाग असतो. अमेरिकन डोळ्यांना धक्का देणारे मूकदर्शन, ज्यांना दुसरे काहीच माहीत नाही त्यांना, फारसा धक्का देत नाही. पण त्यामुळे एक स्थूल कल्पना येते. सामान्यतः आकडेवारीने ज्याचे मापन केले जाते, त्यात विकासाभावाचे वास्तव चित्रण होते. जगातील अर्ध्या लोकांचे राहणीमान वर्षाला शंभर डॉलर यापेक्षा कमी आहे. या आकड्याचा अर्थ त्यामुळे स्पष्ट होतो.

अविकासाचा नकाशा

आत्तापर्यंत आपण प्रकाशाच्या ठोकळेबाज दृष्टीने अविकासाचे दर्शन घेतले. ज्यात तीव्रतेने पिचणारे दारिद्र्य आपले लक्ष वेधून घेते, ती तीव्रताच आपण त्याकडे अमेरिकन दृष्टीने पाहतो, अविकसित जगाच्या भूमिकेपेक्षा वेगळ्या दृष्टीने पाहतो ह्याचाच पुरावा आहे. परकीयांच्या निरीक्षणाचा भाग त्या दृश्यातून निपटून काढावयाचा असेल तर अविकासाच्या चौकटीतच आपल्याला प्रवेश केला पाहिजे. ते जीवन आपलेच आहे. त्या जीवनाबद्दल आपल्याला आतुरता वाटणार नाही हे उघड आहे. पण या शोचनीय दारिद्र्याच्या कारणांचा शोध घेतल्यास आपल्याला वरच्या आवरणाचा भेद करून आत प्रवेश करता येईल. स्थानिक भेद बाजूला केल्यास अविकसित प्रदेशातील दारिद्र्य व उपासमार यांत आपल्याला कोणते महान सूत्र दिसेल बरे ?

ती शंभर राष्ट्रे

आता आपण जगाचा नकाशा पुढे ठेवून अविकसित प्रदेश कुठे आहेत ते पाहू. म्हणजे त्या प्रदेशांच्या समान दुर्दशेची आपल्याला कल्पना येण्यास मदत होईल. असा नकाशा शेजारच्या पानावर दाखवता येईल, त्यापेक्षा खूप मोठा हवा; कारण त्यावर शंभरपेक्षा अधिक राष्ट्रे आणि सुमारे पन्नास प्रदेश दाखवावे लागतील. अफगाणिस्तानपासून झांझीबारपर्यंतच्या त्यांच्या नावाच्या आद्याक्षरात सर्व इंग्रजी मुळाक्षरे आहेत. यांचे अगदी स्थूल अवलोकन केले तरी बरीच महत्त्वाची सत्ये उघडकीस येतील.

नकाशाकडे पाहिल्यावर पहिल्याप्रथम जी गोष्ट लक्ष वेधून घेते ती म्हणजे अविकसित राष्ट्रांतील विविधता. आकार, विस्तार, भूरचना, जीवसृष्टी, राजकीय प्रगती व इतिहास यांबाबतीत त्यांच्यात समान असे काही नाही. कमीत कमी दोन अविकसित देश—ब्राझील व चीन-युनायटेड स्टेटस्पेक्षा मोठे आहेत. दुसरे तीन एल साल्व्हेडोर, लेबॅनन आणि अल्बेनिया हे पश्चिम व्हर्जिनिया एवढेही मोठे नाहीत. काही अगदी निर्जन आहेत. लिबियाचा विस्तार भारताच्या अर्धा आहे. पण लोकसंख्या ब्रूनपेक्षा कमी आहे. काही प्रदेश विश्वास न बसण्याइतक्या दाट वस्तीचे आहेत. सुमारे अरबामाच्या आकाराच्या जावामध्ये युनायटेड स्टेट्सच्या एक-तृतीयांश वस्ती आहे. काही देश चीनसारखे 'साम्यवादी', काही भारतासारखे 'समाजवादी', काही भांडवलशाही; तर सौदी अरेबियासारखे काहींचे वर्णन अकराव्या शतकातून झपाट्याने बाराव्या शतकात जाण्याचा वेडेपणा करणारे असे करण्यात आले आहे.

प्रथमदर्शनी जरी विविधतेने आपले लक्ष वेधून घेतले तरी पुनः नकाशाकडे पाहिल्यास एक उघड दिसणारे पण समान वैशिष्ट्य आपल्या लक्षात येते. ते हे की जगाच्या पूर्व व दक्षिण भागात सगळे अविकसित देश केंद्रित झाले आहेत. आफ्रिका (नजिकपूर्व धरून) आशियाचा सलग भूविस्तार आणि द्वीपसमूह, दक्षिण अमेरिकेची विस्तीर्ण त्रिकोणपर्णाकृती भूमी आणि मध्य अमेरिका हे त्यांचे देह असा हा भाग आहे. याचा अर्थ अन्यत्र अविकसित भाग कोठे नाही असा नाही. युरोपातील स्पेन, पोर्तुगाल, युगोस्लाव्हिया, दक्षिण इटाली, ग्रीस, काळ्या समुद्रातील देश यांत अतिशय विकासहीन प्रदेश आढळतात. ओरीनियात रानटी वेटे आहेत. ग्रीनलंडचे दरमाणशी उत्पन्न १०० डॉलरच आहे. कॅनडाचे काही

भाग, एवढेच काय, संयुक्त अमेरिकन संस्थानांचेही काही तुकडे अविकसित म्हणावे लागतील.

पण विकासाभावाच्या प्रश्नाचा गाभा जगाच्या पूर्वेकडील व दक्षिणेकडील प्रदेशांत आढळतो यात शंका नाही. लॅटिन अमेरिकेचे दर माणशी उत्पन्न ३०० ते ४०० डॉलर आहे. आशियात ५० ते १०० डॉलर आहे. आफ्रिका आणि मध्यपूर्वेत ते त्याहीपेक्षा कमीच असेल.

भूगोल व हवामान

अविकासाच्या या भौगोलिक केंद्रीकरणाला काही कारण असेल काय ? एक कारण ताबडतोब सुचते. ते हे की बहुतेक सर्व गरीब देश पूर्णतः अथवा अंशतः उष्ण हवामानप्रदेशात आहेत. त्यांचे दारिद्र्य या साध्यासुध्या कारणातून निघाले असेल काय ?

हा प्रश्न अभ्यासाच्या दृष्टीने सोपा वाटला तरी विश्लेषण करण्याच्या दृष्टीने वस्तुतः साधा नाही हे थोडेसे आश्चर्यच होय. वरवरचा पुरावा तपासून आर्थिक मागासलेपणाची हवामाननिष्ठ मीमांसा मान्य करण्यात येत असे, त्याला फार वर्षे झाली नसतील. वनस्पतिवैपुल्य पाहून काहींना असे वाटले असेल की, ह्या प्रदेशात शेती फार सुकर असल्याने अनुदार निसर्ग मानवी प्रयत्नांना जे प्रोत्साहन देतो त्याचा इथे अभाव आहे. म्हणून हे प्रदेश मागासलेले आहेत. काहींनी रहिवाशांच्या आळशीपणाबद्दल उष्ण हवेला दोष दिला. दमट व रोगानुकूल भू-प्रदेश सातत्याने प्रयत्न करण्यास प्रतिकूल आहे, असेही काहींना वाटले.

विकासाभाव हा केवळ हवेचा परिणाम आहे असे मानण्यास आपण आज तयार नाही. जगाच्या काही भागात उष्णता अगदी मारक असते हे खरे आहे. काही वर्षांपूर्वी ट्रिपोलिटिनियामधील ॲझीद्रियात सावलीतले तपमान १३२ अंश होते. पण अशी स्थळे हा नियम नसून अपवाद होत. उष्णकटिबंधातला बहुतेक प्रदेश तेवढा उष्ण नाही. आणि उष्णतामान कडक असले तरी ते दिवसाचे काही तास अथवा वर्षाचे काही महिनेच तसे असते. शिवाय असे की उष्णकटिबंधातील काही ठिकाणी उदाहरणार्थ : ऑस्ट्रेलियातील क्वीन्सलँडमध्ये किंवा वॉशिंग्टन D. C. म्हणजे जेथे ब्रिटिश परराष्ट्र खात्याच्या मते

उन्हाळ्यातील काम कडक हवामानातले समजले जाते तेथे आर्थिक विकासाचा जोर आढळून येतो.

उष्णकटिबंधातील हवामानाचे आणि दमट व गरम हवेतील रोगानुकूल वातावरणाचे गंभीर प्रतिकूल परिणाम दुर्लक्षित करण्याचा यात हेतू नाही. निव्वळ हवामानी घटक सांस्कृतिक घटकातून अलग करणे किंवा हवामानाने विकासप्रतिकूल संस्कृतीच्या निर्मितीला नेमका किती प्रमाणात हातभार लावला हे निश्चितपणे दाखविणे कठीणच आहे.

आर्थिक विकास या विषयाचे तज्ज्ञ डॉ. बेनामिन हिगिन्स लिहितात की, काम, रिकामपण, उत्पन्न याबाबतची वृत्ती उपोष्ण प्रदेशांतील (Sub-tropical) डार्विन ह्या ठिकाणापासून–जेथे उन्हाळा विषुववृत्तावरील कित्येक देशांपेक्षा कडक असतो–होबार्टपर्यंत–जेथे दहा महिने हिवाळा व थंड उन्हाळा असतो–सारखीच दिसून येते. समुद्रपातळीवर राहणारे इंडोनेशियातील लोक व पर्वतावर चार हजार फूट उंचीवरील आल्हाददायक हवामानातील लोक यांच्या वृत्तीत किंवा उत्पादनक्षमतेत फार मोठा फरक दिसत नाही.

मागासलेपणाची कारणे फक्त हवामानात शोधताना सर्व अविकसित देश उष्णकटिबंधात नाहीत हे लक्षात ठेवले पाहिजे. पेरू, बोलेव्हिया, उंचवट्यावरील आफ्रिका आणि उत्तर चीन ह्यांच्याप्रमाणेच कोरियातही समशीतोष्ण हवामानाचे सर्व गुणधर्म आहेत.

हवामान आणि आर्थिक मागासलेपणा यांच्यातील संबंधाच्या सूक्ष्म पाहणीचा मध्यबिंदू पाऊस हा करता येईल. भूप्रदेशावर प्रतिवर्षी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा फारच थोडा भाग आफ्रिका खंडाच्या वाट्याला येतो हीच त्या प्रदेशाची मोठी समस्या आहे. आफ्रिकेच्या उत्तरेकडील मोठ्या किनारपट्टीवर, अरबी लोकांना शतकानुशतके अपुऱ्या व क्वचित पडणाऱ्या पावसावर समाधान मानावे लागले आहे. 'उकडण्या'ला ओलावा लागतो. उलट विषुववृत्तावरील आफ्रिकेचे प्रदेश कधी अफाट पावसाने धुऊन निघतात तरी कधी अजिबात पाऊस नसल्याने भाजून निघतात. आशियाला सुद्धा वार्षिक पावसाच्या प्रतिकूल वाटपाशी जुळवून घ्यावे लागले आहे. दक्षिण आशियात शेतीला अत्यावश्यक असे पाणी मोसमी पावसाकडून मिळते आणि मोसमी पावसाला उशीर झाला की पिके मरतात.

वरील समस्या दक्षिण अमेरिकेत सामान्यतः नाही. प्राचीन रोमन साम्राज्याच्या काळात चांगला पाणीपुरवठा, मशागत आणि देखरेख यांमुळे तो भाग म्हणजे धान्यकोठार होता. म्हणजेच हवामानाप्रमाणेच पावसातही विकासाभावाचा खुलासा अंशतः आढळतो. जगाच्या काही भागात या दोन गोष्टींचा परिणाम भौतिक दृष्ट्या प्रगत संस्कृती उभारण्याचा पाया घालण्यास म्हणजेच अतिरिक्त संचय निर्माण करण्यास प्रतिकूल असे वातावरण बनवण्यात झाला असेल. अतिशीत प्रदेशाबाबतही हे खरे आहे. पण विकासाभावाचा जागतिक विस्तार पाहिल्यास–ज्यात मंगोलियाचे पठार त्याचप्रमाणे मलायाची जंगले यांचा समावेश होतो–आर्थिक मागासलेपणाचा खुलासा या कारणात सापडणे कठीणच जाईल.

अर्थात हे निश्चित की प्रतिकूल हवामान आणि अपुरा पाऊस यांमुळे अडचणी निर्माण होतात आणि असाधारण मोठे असे आर्थिक प्रयत्न करावे लागतात. पण तसा प्रयत्न केल्यास, तसेच मोठ्या प्रमाणावर पाण्याचा साठा, धरणे, वातानुकूलित जागा या सोयी केल्यास निसर्गातील उणिवा भरून काढता येतात हे ऑस्ट्रेलिया, इस्राएल, यांच्या आर्थिक प्रगतीच्या उदाहरणाने स्पष्ट होते. भौगोलिक दोषांशी उष्ण व वाळवंटी प्रदेशांना नेहमीच झगडावे लागेल आणि जुळवून घ्यावे लागेल. पण केवळ त्याच दोषामुळे या प्रदेशांना प्रगत देशांच्या पंक्तीत बसता येणार नाही असे समजण्याला काहीच कारण नाही.

साधन-धन

हवामान आणि पाऊसपाणी यांच्या विकासाभावाची मीमांसा करताना अंशतःच उपयोग होत असला तरी या प्रश्नाकडे पाहण्याच्या भौगोलिक दृष्टिकोणातून दुसरा जो एक महत्त्वाचा घटक कारण सुचतो त्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. साधनधनाची उपलब्धता हे ते कारण. चांगली माती, उत्तम वाढलेली जंगले अथवा उपयुक्त खनिज धन यांचे अस्तित्व हे आर्थिक विकासाचे शुभचिन्ह आहे हे उघडच आहे. हेच विधान उलटे करून असे म्हणता येईल की, भौगोलिक दुर्विलासामुळे या फायद्याच्या गोष्टीपासून वंचित असलेले देश दरिद्रीच राहतील अशी अपेक्षा करणे चूक नाही.

साधनधनाची उपलब्धता विकासाभावाच्या नकाशात माठी जागा व्यापते हे वादातीत आहे. आफ्रिकेची अलीकडेच ज्याने पाहणी केली आहे असा एक लेखक लिहितो : क्रांतिवृत्तावरील आफ्रिकेबाबत एखादी समान भौगोलिक गोष्ट कोणती असे विचारल्यास चांगल्या मातीची अपवादात्मकता हे उत्तर प्रभावी ठरेल. बरीचशी जमीन अतिनिकृष्ट अशा मध्य अक्षांशावरील जमिनीपेक्षा चांगली नाही. काही त्यापेक्षा वाईट आहे आणि एकूण सर्वच जमीन सकस होण्यापेक्षा निकस होणे सुलभ असते. आफ्रिकेचा भाग निकृष्ट मातीमुळे मागे पडला आहे. उत्तरेकडे अर्थातच संपूर्ण नापीक अशी वाळवंटे असल्यामुळे त्या विभागाची हानी झाली आहे. तोच प्रकार क्रांतिवृत्तावरील प्रदेशात, काँक्रीटप्रमाणे कठीण अथवा वादळी पावसाने सहज धुपणारी अशा जमिनीमुळे झाला आहे. नायजेरियातील एका पाचशे फूट खोल चौरस मैल भगदाडाचे क्षेत्रफळ फक्त सहा वर्षांत चौपट झाले आहे.

या मूलभूत अडचणींमुळे केवळ आफ्रिकेचे नुकसान झाले आहे असे नाही. दक्षिण अमेरिकेतील पावसाळी जंगलातील माती देखील पिके वाढण्यास अशीच निरुपयोगी आहे. कदाचित तेथील विपुल जंगलामुळे या विधानावर विश्वास बसणार नाही. आशियातील विस्तीर्ण मैदानात जमीन अशी निकस आहे. भारताचे मोठमोठे भाग निकस आहेत आणि चीनमध्ये फार पूर्वीपासून जंगले काढून टाकली गेल्यामुळे जमिनीवर ताण पडला आहे.

केवळ चांगल्या मातीचाच नव्हे तर इतर प्रकारच्या साधनधनांचा अभावही अविकसित जगाच्या मोठ्या भागात अडथळे निर्माण करीत असल्याचे दिसून येते. नौकानयनक्षम नद्या, जलविद्युतनिर्मितियोग्य स्थळे, लोखंड, कोळसा, मँगेनीज, कथील, बॉक्साइट यांच्या ज्ञात खाणी आणि आधुनिक उद्योगाला लागणारा हजारो प्रकारचा कच्चा माल यांच्या उत्पन्नाच्या खालच्या पातळीशी बहुतेक किंवा अनेक देशांच्या हिशोबात पत्ताच नाही.

तरीही ज्याप्रमाणे भौगोलिक परिस्थितीला मागासलेपणाच्या खुलाशात अल्प स्थान आहे त्याचप्रमाणे भौतिक साधनधनांचा अभाव हे सुद्धा विकासाभावाचे दुय्यमच कारण होय. एक तर काही गरीब देश साधनधनाने समृद्ध आहेत. उदाहरणार्थ ज्वालामुखीनिर्मित सुपीक जमीन व भरपूर खनिज धन

यांनी युक्त असल्यामुळे इंडोनेशिया हा नशीबवान देश आहे. दक्षिण अमेरिकेत विस्तीर्ण अशी सुपीक जमीन व मोठ्या संभाव्य खाणी आहेत. भूमीखाली प्रचंड खजिना असल्याची प्रौढी आफ्रिका मिरवू शकेल. इतर बऱ्याच देशांत साधनधनाचा अभाव आहे म्हणण्यापेक्षा त्यांचा शोध घेतला गेला नाही असे म्हणणेच उचित होईल. लिबिया याचे प्रातिनिधिक उदाहरण होय. लिबियास नैसर्गिक देणगी अजिबात लाभली नाही अशी काही वर्षांपूर्वी समजूत होती. आज लिबिया प्रचंड तेलसाठ्याचा देश म्हणून ओळखला जातो. पैसा व तांत्रिक ज्ञान या दोहोंच्या अभावामुळे कोणत्याच अविकसित देशात उपलब्ध धनाची शास्त्रशुद्ध तपासणी व यादी कधीच झाली नाही. त्यात साधनधन दिसत नाही कारण त्याचा कोणी व्यवस्थित शोधच घेतला नाही.

शोध घेतलेले धनही बऱ्याच प्रदेशांत आहे. आणि आर्थिक विकास झाल्यास त्याचे महत्त्व जाणवेल ही गोष्टही महत्त्वाची आहे. नैजर नदीवर धरण बांधल्यास नायजेरियात हजारो एकर नवी जमीन पिकाखाली येईल. इंडोनेशियात आवाश नदीवर धरण बांधल्यास त्या नदीचे खोरे हा आफ्रिकेतील सर्वांत समृद्ध प्रदेश ठरेल. भूमध्य समुद्राभोवतालच्या वाळवंटी प्रदेशात जलसिंचनप्रबंध केल्यास रोमचे प्राचीन धान्यकोठार पुनः उभे राहील. भारत–पाकिस्तानमधील मातीवर केलेल्या शास्त्रीय संस्कारामुळे तेथील निर्जीव जमिनीत जिवंतपणा येऊ लागला आहे.

निसर्गदत्त धनाच्या वाटपात विषमता असल्याने काही प्रदेशात इतरांच्या तुलनेने आर्थिक विकास महागडा व ताण पडणारा होईल यात शंका नाही. त्याचा विकासाच्या दिशेवर खचितच प्रभाव पडेल. त्यामुळे काही ठिकाणी पशुपालनाला तर काही ठिकाणी तांदूळ पिकवण्याला उत्तेजन मिळेल. एका ठिकाणी कोळसा तर दुसऱ्या प्रदेशात तेल तर तिसऱ्यात अणुशक्ती ही सर्वांत किफायतशीर प्रेरकशक्ती ठरेल. विकासाची गती व आराखडा यात तो ज्या नैसर्गिक वातावरणात होतो त्यातील विविधता प्रतिबिंबित झालीच पाहिजे. सर्वांगीण विचार करता निसर्गाची दुर्दैवी अवकृपा आहे आणि त्यात सुधारणा होणे शक्य नाही. अविकसित जग कायमचे दारिद्र्यात खितपत पडणे अपरिहार्य आहे असे म्हणण्यात अर्थ नाही.

विकासाभावाचे पैलू

साधनधन आणि हवामान यांवर दृष्टिक्षेप केल्याने विकासाभावाचे कोडे काही सुटले नाही. काही प्रदेश मागासलेले का या प्रश्नाचे पटणारे उत्तर त्याने मिळाले नाही तरी त्याच प्रश्नाचे उत्तर इतर प्रदेशांच्या बाबतीत त्या घटकांच्या अनुरोधाने मिळत नाही. उदाहरणार्थ चीन हा भौगोलिक विषमतेचा बळी म्हणता येत नाही. तेच दक्षिण अमेरिकेबाबतही म्हणता येईल. आफ्रिकेच्या मोठ्या भागाचेही तेच आहे. निसर्ग व विकासाभाव यांच्यातील विचित्र व स्पष्टपणे न कळलेला संबंध आपले लक्ष आर्थिक मागासलेपणाच्या ऐतिहासिक म्हणजेच सामाजिक आणि सांस्कृतिक कारणाकडे वेधतो स्थूल मानाने असे म्हणता येईल की, आर्थिक मागासलेपणा हे नैसर्गिक परिस्थितीचे फळ नसून मानवी संस्था व प्रवृत्ती यांचे फळ आहे.

हा मुद्दा महत्त्वाचा आहे. कारण त्यामुळे विकास ही कोणत्याही अर्थाने नैसर्गिक प्रक्रिया नाही याकडे आपले लक्ष जाते. उलट ज्या ठिकाणी सांस्कृतिक व राजकीय इतिहासाचा संयुक्त परिणाम विशिष्ट प्रकारच्या आर्थिक व्यवहाराला असाधारण आणि उपचारात्मक प्रोत्साहन देण्यात झालेला आहे, अशा एका छोट्याशा भागातच ही प्रक्रिया गतिमान झाली आहे. पाश्चात्त्य देशांच्या आर्थिक विकासाची मुळे पाश्चिमात्य जीवनविषयक दृष्टिकोण आणि त्या समाजांच्या सामाजिक आणि राजकीय घडामोडी ह्यात शोधावी लागतील. पाश्चात्त्य देशातील आर्थिक विकास हा एका लांब साखळीतला शेवटचा दुवा होता. आणि ह्या साखळीतले अनेक दुवे पूर्वेकडल्या व दक्षिणेकडल्या प्रदेशांतल्या ह्या समाजात आढळत नाहीत.

मागासलेल्या प्रदेशात नैसर्गिक विकासाच्या ज्या प्राथमिक शर्ती पुऱ्या झाल्या नाहीत त्यांचा आपण विस्ताराने विचार करू. विकासाभावाच्या नकाशाची जी आपण प्राथमिक पाहणी केली तिच्यामुळे गतिशून्यतेच्या अंतिम कारणांचा पत्ता जरी आपल्याला लागला नाही तरी निदान त्या प्रश्नाची एक महत्त्वाची बाजू आपल्याला समजली. आर्थिक विकास करावयाचा म्हणजे नाना प्रकारच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागते हे आपण पाहिले. हवामान आणि साधनधन यांतील विविधता आणि त्यात पडलेली चालीरीती आणि सामाजिक संस्था यांच्यातील विविधतेची भर यामुळे विकासाच्या कार्यात सर्वत्र सारखेपणा न

दिसता त्याला विविध पैलू प्राप्त होतात. उदाहरणार्थ बोलीव्हियात उंचावरील पठारांचे प्रश्न सोडवावे लागतील तर समुद्रपातळीवरील जंगलांचा प्रश्न ब्राझीलला हाताळावा लागेल. हाँगकाँगमध्ये विकासाभाव ही नागरी समस्या आहे. तर अफगाणिस्तानात ती ग्रामीण आहे. भारतात गाय हा एक मोठा प्रश्न आहे. कारण तेथे जगाचे एक-तृतीयांश पशुधन माणसाच्या अन्नावर जगत असून धार्मिक समजुतीमुळे त्याचा योग्य आर्थिक उपयोग होऊ शकत नाही. घानाची निर्यात ज्यावर बरीच अवलंबून आहे त्या कोकोच्या लागवडीला ज्यापासून धोका आहे त्या सूज आणणाऱ्या रोगाचा प्रश्न तेथे महत्त्वाचा आहे.

विकासाभावाच्या (मागासलेपणाचा) तोंडवळा देशातल्या देशात वेगवेगळा असतो. दारिद्र्य ही त्या सर्व देशांची समान अवस्था आहे आणि मागासलेपणाचा अनुभव हा त्यांना जोडणारा दुवा आहे. तरीही प्रत्येक देशाने आपल्या विशिष्ट प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विकासाचा आपला स्वतःचा मार्ग शोधला पाहिजे. 'शंभर देशांचे शंभर प्रश्न' असा अर्थपूर्ण अभिप्राय याबाबत संयुक्त राष्ट्रांच्या स्पेशल फंडाचे डॉयरेक्टर पॉल हॉफमन यांनी व्यक्त केला आहे.

• •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वाधीन
अनुक्रम ७४६२० दि: निवेद
वर्ग क्र. ३०१.५ नों दि. ३१.३.८१

३

मागासलेपणाचें जोखड

आर्थिक विकासाच्या प्रश्नांचा विचार करताना सुरुवातीलाच या समस्यांतील विविधतेचा परिचय करून घेणे योग्य होईल; कारण त्यामुळे रामबाण म्हणून समजल्या जाणाऱ्या उपायांबाबत आपल्या मनात संशयाची भावना उत्पन्न होईल. त्याहीपेक्षा असे की, प्रत्येक देशाचा स्वतंत्र विचार होऊन काय व्यवहार्य आहे, काय नाही हे प्रतीत होईल. विकासविषयक प्रश्नांचा अभ्यास करणारा अर्थशास्त्रज्ञ, तांत्रिक साहाय्याच्या विनंतीचा विचार करणारी राष्ट्रसंघ समिती किंवा त्या शंभर देशांची सरकारे ह्यांना मागासलेपणाच्या विविधतेच्या कटू वस्तुस्थितीचे दर्शन होईल.

आपण दारिद्र्याचे प्रथम जे समग्र दर्शन घेतले, तेथेच आपले विश्लेषण थांबविणे जसे दिशाभूल करणारे ठरले असते तसेच केवळ त्याची विविधता कळली म्हणजे विश्लेषण संपले असेही नाही. या सर्व शंभर देशांत गंभीर स्वरूपाचे फरक असले तरी महत्त्वाची साम्यस्थळेही पुष्कळच आहेत. भौगोलिक आणि नैसर्गिक परिस्थितीच्या बाबतीत त्यांच्यात जास्तीत जास्त भिन्नता असली तरी सुरुवातीच्या अवस्थेत सामाजिक आणि आर्थिक स्वरूपाच्या बेड्यांनी ते सर्व देश जखडून गेलेले असतात. आत्तापर्यंत आपण एक अविकसित देश दुसऱ्यापेक्षा ज्या बाबतीत भिन्न असतो, त्याच वैशिष्ट्याकडे लक्ष दिले. आता जे प्रश्न सर्वांच्या बाबतीत समान आणि मध्यवर्ती आहेत त्यांचा अधिक खोल जाऊन विचार केला पाहिजे.

साद्दश्यांचा शोध घेण्याच्या दृष्टीने आपण जगातील भिन्नभिन्न अविकसित प्रदेशांकडे पाहू लागलो की, एक दोष चटकन नजरेत भरतो तो हा की, या सर्व देशांत मनुष्यबळ करुणा यावी इतके अनुत्पादक आहे. तेथील एक

दिवसाचे काबाडकष्ट पश्चिमेतील त्याच प्रकारच्या एका दिवसाच्या कामापेक्षा अंग मोडणारे असूनही धैर्य खचून जावे एवढे कमी फळ देतात.

अविकसित देशांच्या अर्थव्यवस्थेचा ज्याला पाया म्हणता येईल त्या शेतीच्या क्षेत्रात वरील गोष्ट आपल्याला विशेषेकरून दिसून येते. युनायटेड स्टेट्समधला एक शेतकरी सामान्यतः अन्नोत्पादन न करणाऱ्या चोवीस नागरिकांना पोसतो. याची आफ्रिकेतील परिस्थितीशी तुलना करता येईल. डॉ. किम्बक लिहितात की, आफ्रिकेतील शेतीची उत्पादनक्षमता इतकी कमी आहे की, एका अन्नोत्पादन न करणाऱ्या प्रौढासाठी व त्याच्या स्वतःसाठी अन्नोत्पादन करण्यास पुरुष, स्त्रिया व मुले धरून दोन ते दहा माणसे लागतात.

किंवा जीवनदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे पूर्वेकडील पीक म्हणजे तांदूळ त्याची परिस्थिती पाहा. खालच्या तक्त्यात अमेरिका, ऑस्ट्रेलिया व आशियातील प्रमुख देशांची तांदूळ शेतीच्या उत्पादनक्षमतेची आकडेवारी आढळेल :

दर हेक्टरी तांदुळाचे उत्पादन (१०० किलो ग्रामांत) १९५५

युनायटेड स्टेटस्	३४·३
ऑस्ट्रेलिया	४५·९
ब्रह्मदेश	१४·८
चीन (१९५४)	२४·७
भारत	१२·६
इंडोनेशिया	१६·५
थायलंड	१४·३
फिलीपाईन्स	११·९
व्हिएटनाम	१२·३

जे तांदुळाबाबत तेच जवळजवळ सर्वच पिकांसंबंधी म्हणता येईल.सोयाबीनचे अमेरिकेतील उत्पादन चीन व इंडोनेशियाच्या सुमारे दुप्पट आहे. तेथील तंबाखूचे एकरी उत्पादन फिलिपाईन्सच्या जवळ जवळ तिप्पट आहे. प्राध्यापक हिगिन्स लिहितात की, अविकसित देशांत प्रथमच जाणाऱ्या परराष्ट्रीय आर्थिक सल्लागाराला निराशेचा धक्का देणारी कोणती एक गोष्ट दिसत असेल तर ती म्हणजे तेथील सर्वांत महत्त्वाचे शेतकी पीक खुल्या बाजारात प्रगत देशांतून होणाऱ्या त्याच मालाच्या आयातीशी स्पर्धा करू शकत नाही ही जाणीव

होय. म्हणूनच लुईझियानातला तांदूळ फिलिपाईन्समध्ये तेथीलच तांदुळाशी स्पर्धा करतो, लिबियात परदेशी खजूर देशी खजुरापेक्षा स्वस्त असतो, कॅलिफोर्नियातील नारिंगे इंडोनेशियातील छोट्या कडवट देशी संत्री लिंबाशी स्पर्धा करतात असे आपल्याला आढळते.

मनुष्यबळाच्या–जमिनीच्या नव्हे, तौलनिक उत्पादनक्षमतेचा विचार केला तर फारच फरक जाणवतो. एक अमेरिकन शेतकरी ५० ते २०० एकर जमिनीची मशागत करतो. आशियातील अथवा दक्षिण अमेरिकेतील शेतकरी आपली सर्व शक्ती दोन किंवा तीन एकरांवर केंद्रित करतो. तेव्हा तेथील मनुष्यबळाची उत्पादकता आर्थिकदृष्ट्या प्रगत देशाच्या एक दोनशेअंश एवढी कमी असली पाहिजे.

अविकसित जगातील शेतमजुराची उत्पादकता एवढी कमी का ? प्रगत व मागासलेले देश यांत शेतीच्या प्रमाणात जो फरक आहे त्यातच या प्रश्नाचे उत्तर सापडेल.

संपूर्ण आशिया, नजीकपूर्व देश आणि दक्षिण अमेरिका व आफ्रिकेचा बराच भाग यात, ज्याला 'पोस्टाच्या तिकिटाची मशागत' म्हणतात ती शेतीचा प्रातिनिधिक नमुना आहे. शेत नव्हे तर त्याचा एक तुकडा हे प्रातिनिधिक परिमाण असते. मोठ्या जमीनदारांची मोठमोठी शेते देखील शब्दकोड्यातील चौकोना-एवढ्या लहान तुकड्यांत विभागली जातात आणि कुळांकडून त्याची मशागत केली जाते. भारताबाबत वीस वर्षांपूर्वी लिहिताना जॉन गंथर यांनी या परिस्थितीचे बहारदार वर्णन केले आहे :

> मोठ्या मुलाला बापाची मिळकत मिळावी हा नियम भारतात कोठेच नाही आणि जेव्हा शेतकरी मरतो तेव्हा त्याची जमीन सर्व मुलांत वाटली जाते. परिणामी बहुतेक शेते अणुतुकड्याएवढी लहान होतात. पंजाबच्या एका जिल्ह्यात पिढ्यान्पिढ्या झालेल्या तुकडेमोडीमुळे ५८४ मालक १६०० तुकड्यांची लागवड करतात. दुसऱ्या १२८०० एकरांची विभागणी ६३००० तुकड्यांत झाली आहे. भारतातील तीनचतुर्थांश तुकडे दहा एकरांपेक्षा लहान आहेत. भारताच्या बहुतेक भागांत सरासरी तुकडा एक एकरापेक्षा लहान आहे.

वरील वर्णन वीस वर्षांपूर्वीचे आहे. आज परिस्थितीत फारच सुधारणा झाली आहे असे नाही आणि तिचेच प्रतिबिंब इतर अनेक अविकसित देशांत पडले आहे.

या भयानक तुकडेमोडीला आणि आणखी तुकडेमोडीला अनेक बाटपांचा हातभार लागतो. काही देशांत गंथरने उल्लेखिलेली वारसाबद्धत हे कारण आहे. इतरांत शेतकऱ्यांचा त्यांच्या जमिनीवर कायदेशीर मालकी हक्क नाही आणि त्यांना जमीन विकतही घेता येत नाही अशी सरंजामशाही जमीनदारी पद्धत कारणीभूत आहे. खोलवर विचार करता आणखी काही ठिकाणी शेती-लायक अशा थोड्या जमिनीवर मोठ्या लोकसंख्येचे पडलेले दडपण हे कारण आहे. आणि वरिष्ठ वर्गाच्या हातात जमिनीचे अतीव केंद्रीकरण झाल्यामुळे त्याला गंभीर स्वरूप प्राप्त झाले आहे. यांपैकी अनेक कारणांचा आपल्याला पुन्हा विचार करण्याची वेळ येणार आहे. कारणे काहीही असली तरी परिणाम तोच, एवढीच नोंद या ठिकाणी करून ठेवायला हवी. तो परिणाम म्हणजे मनुष्य आणि जमीन यांचे प्रमाण भयावहरीत्या कमी असल्याने उत्पादकतेला बाधा येऊन शेतीला हानी पोचते हा होय.

जमिनीवरील गर्दीमुळे जी तांत्रिक परिस्थिती निर्माण होते, तिच्यामुळे जमिनीच्या विशिष्ट आकाराच्या तुकड्यातून काढले जाणारे पीक भयानक प्रमाणात कमी होते. ज्या प्राकृतिक, यांत्रिक व रासायनिक साधनांमुळे पाश्चात्य शेती भरघोस पीक देते त्यांचा छोट्या जमिनीवर काम करणाऱ्या शेतकऱ्यांना कार्यक्षमतेने वापर करता येत नाही किंवा त्यांना ती परवडतही नाहीत. मागास-लेल्या भागातील अति लहान शेतावर पेरणी-कापणी-मळणी यंत्रे संपूर्णपणे गैरकिफायतशीर असतात. त्याहीपेक्षा वाईट असे की, गुंतवणक्षम अतिरिक्त उत्पादन शेतकरी करू शकत नसल्यामुळे लाकडी नांगराऐवजी लोखंडी नांगर घेणे किंवा सेनखत-शेणखताऐवजी रासायनिक खत वापरणे त्याला शक्य होत नाही. खरे म्हणजे शेणखताचाही क्वचितच उपयोग केला जातो. त्याच उपयोग शेतकरी आपला भात शिजवण्यासाठी सावकाश जळणारे जळण म्हणून करतो. आउतासाठी जनावरांचे साहाय्य त्याला मिळतेच असेही नाही. भारतीय खेड्डत नांगराला खेड्यातला बैल जोडतो तर चिनी शेतकरी आपली बायको जोडतो असा एक विनोद पूर्वी ऐकिवात येत असे. उत्पादनप्रक्रियेत भांडवलाचा

उपयोग करण्याची असमर्थतता असल्यामुळे शेतीच्या उत्पादकतेची पातळी इतकी खाली आहे असा या सर्व अगतिक व असहाय्य करणाऱ्या उणिवांचा सारांश सांगता येईल.

दारिद्र्याला पोषक असा हा भांडवलाचा अभाव फक्त शेतीतच आहे असे नाही. उलट अविकसित अर्थव्यवस्थेत तो वरपासून खालपर्यंत सर्वत्र आढळतो. केवळ जमिनीत वापरावयाच्या भांडवलाच्या अभावामुळेच नव्हे तर सर्व प्रकारच्या भांडवलाच्या अभावामुळे अविकसित देशांना पुरेशी अर्थप्राप्ती होऊ शकत नाही. या देशात मनुष्यबळाचा अभाव नाही किंवा उपयोग करता येईल असे साधनधन थोडेही नाही असे नाही. त्यांच्यात अभाव असेल तर तो, मनुष्यबळ व साधनधन ह्यातून केवळ शारीरिक शक्ती व रानटी उपकरणे यांचा उपयोग केल्यास जेवढे उत्पादन होईल त्यापेक्षा अधिक उत्पादन करण्याचे सामर्थ्य ज्यामुळे प्राप्त होते त्या यंत्राचा, प्रेरकशक्तीच्या इंजिनांचा, कारखान्यांचा, गिरण्यांचा आणि तत्सम भांडवली साधनांचा होय. १९५९ मध्ये एक अमेरिकन कामगार सरासरीने दर ताशी ३·९० डॉलर मोलाच्या वस्तूंचे उत्पादन करीत असता, त्याचाच जपानी बांधव फक्त ४० सेंट मोलाचे उत्पादन करी याचे हे प्रमुख कारण आहे. आणि अविकसित देशांच्या तुलनेने जपान हा भांडवलसमृद्ध, अतिशय उत्पादनक्षम अर्थव्यवस्था असलेला देश असे समजले जाते.

भांडवलाची कमतरता या सर्वव्यापी व खोलात नेणाऱ्या प्रश्नाची विस्तृत चर्चा पुढे करावी लागेलच, कारण आर्थिक विकासासाठी जो उपाय सांगावयाचा त्याचे रहस्य यातच आहे. या ठिकाणी अविकसित भूखंडातील समान उणिवांची ओळख करून घेत असता, आपण या प्रश्नाचे स्वरूप पाहिल्यास पुरे होईल. अल्प उत्पादन हे मागासलेपणाचे सार्वत्रिक वैशिष्ट्य असेल तर भांडवलाची भयानक कमतरता हे त्याचे जवळ जवळ सार्वत्रिक कारण होय.

सामाजिक प्रवृत्तींचा प्रश्न

तरीही आर्थिक अडचण हे मागासलेपणाचे अंतिम कारण नव्हे. भांडवलाचा अभाव एक अधिक खोल दडलेली समस्या दर्शवितो. भांडवलनिर्मितीला पोषक ठरणाऱ्या सामाजिक प्रवृत्तींचा व संस्थांचा अभाव ही ती समस्या होय. अविकसित देशांच्या अर्थव्यवस्था भांडवलनिर्माणकारी नाहीत या सर्वांत

महत्त्वाच्या सत्याकडे भांडवलाची कमतरता आपले लक्ष वेधून घेते. या अर्थव्यवस्था पाश्चात्त्य अर्थव्यवस्थांहून–मग त्या भांडवलशाही असोत अथवा साम्यवादी असोत–घडणदृष्ट्या महत्त्वाच्या बाबतीत भिन्न असल्याच पाहिजेत.

तो फरक कोणता ? अविकसित देशांची प्राकृतिक नव्हे तर सामाजिक वैशिष्ट्ये पाहिल्यास तो आपल्याला दिसू लागेल. या प्रदेशातील समाजाचा प्रमुख प्रतिनिधी म्हणजे शेतकरी. त्याच्यापासून सुरुवात करू या. कारण मागासलेल्या देशांच्या लोकसंख्येपैकी ७०–८० टक्के लोक शेतकरीच आहेत.

शेतकरी म्हणजे तरी काय ? त्याचा अर्थ कसणारा नव्हे हे ठासून सांगितले पाहिजे. युनायटेड स्टेट्समधला कसणारा शेतमालक हा खऱ्या अर्थाने व्यावसायिक असतो. किंमत आणि उत्पादन खर्च याची त्याला चांगली जाणीव असते व बाजारपेठेचा कानोसा घेऊन तो आपले उत्पादन कमीजास्त करीत असतो. त्याच्या मनाचा कल तंत्रविद्येकडे असतो. आणि काहीतरी निश्चित फायदेशीर दिसल्यास तो आपले उत्पादनतंत्र बदलण्यास तयार असतो. जमिनीवरील त्याचे परंपरागत प्रेम लक्षात घेऊनही तो प्रामुख्याने 'आर्थिक' मनुष्य असतो असे म्हणता येईल.

शेतकरी व कसणारा यांत कमालीचा फरक आहे. शेतकरी जमाखर्चातील अधिक व उणे या चिन्हांना ओळखत नाही. किंमत बदलली की, तो आपले पीक तत्परतेने बदलीत नाही. त्याला तांत्रिक शिक्षण मिळालेले नसते किंवा नावीन्याकडे त्याचे लक्ष नसते. नैसर्गिक जगाचा त्याला समजणारा अर्थ ठराविक व अपरिवर्तनीय असतो. निसर्गावर मात करण्यापेक्षा त्याची आराधना करण्यात तो मग्न असतो.

डॉ. आलपेन हेन्सन भारतीय खेडुतांच्याबद्दल लिहितात : नव्या घडामोडी-बाबत ग्रामीण मत अनेकदा प्रतिकूल असते आणि सातत्याने पाठपुरावा न केल्यास परंपरागत पद्धती परत येणे संभवनीय असते. यात आश्चर्यकारक काहीच नाही. पिढ्यान्पिढ्या भिनलेल्या धार्मिक, सामाजिक संस्कारांनी युक्त असा निरक्षर समाज सामाजिक मूल्याबाबत आधुनिक दृष्टिकोणाकडे सहजपणे वळणार नाही. रूढ श्रद्धांना व समजुतींना अव्हेरणाऱ्या नवीन कल्पनांमुळे विविध देवता रुष्ट होतील अशी त्यांना भीती वाटते. नवीन कल्पनांमुळे

असहाय्य खेडुतांवर महापूर, दुष्काळ, रोगराई इत्यादी आपत्ती कोसळतील अशी त्यांना भीती वाटते.

शेतकी व्यवहार रूढी, परंपरा यांनी नियमित केलेले असतात. खेडुताला विज्ञानाची भीती वाटते. जीवन हे पवित्र असल्यामुळे जंतुहत्या पुष्कळ खेडुतांना निषिद्ध वाटते. नवे सुधारलेले बी-बियाणे संशयास्पद वाटते. त्याचा वापर करणे हा जुगार वाटतो. रासायनिक खतांचा वापर शास्त्रशुद्ध नसल्यास व त्यात पुरेसा ओलावा नसल्यास त्यात खराच धोका असतो. पूर्वी न वापरलेल्या पद्धती स्वीकारणे म्हणजे अपयशाचा धोका पत्करणे आणि अपयश म्हणजे उपासमारच होय.

याचा अर्थ खेडूत हा परंपरेशी कायमचा जखडलेला असतो असा नाही. यशाची खात्री असेल तर तो आपल्या कार्यपद्धती बदलतो. डॉ. आर्थर लुईस यांनी दाखविलेच आहे की, जगात अत्यंत आळशी म्हणून समजल्या गेलेल्या गोल्ड कोस्टमधील शेतकऱ्यांना जेव्हा कोकोचे पीक किफायतशीर वाटले, तेव्हा त्यांनी सर्वांनी चरितार्थशेती एकदम सोडून दिली आणि ते कोकोकडे वळले. त्यांना शक्य असलेल्या विविध पिकांच्या किंमतीमधील फरक जेव्हा मलाया व चीनमधील शेतकऱ्यांनी दाखवून दिला तेव्हा त्यांनी कसा प्रतिसाद दिला, हे इतर शास्त्रज्ञांनी त्यावर जोर देऊन सांगितले आहे. जमीन कसणाऱ्याला व्यावसायिक प्रोत्साहनाचा विचार शिवत नाही किंवा परंपरांच्या मगरमिठीत तो पूर्णपणे जखडलेला असतो असे चित्रण करणे चूक ठरेल.

पण अनेक तांत्रिक सहायक, कृषितज्ञ व मानववंशशास्त्रज्ञ आपल्याला अशी सावधगिरीची सूचना देतात की, सामान्यतः खेडुताची परिवर्तनाची गती चिंतनीय वाटावी एवढी कमी असते आणि येथेच डॉ. हेन्सन यांनी खेडुताबद्दल जे म्हटले आहे, त्याचे अंतरंग जाणून घेण्याचा उपयोग होतो. भूमी कसणारा हा हेकट अथवा मूर्ख नसतो. ज्या जगात चुकीला अवसर नाही अथवा कल्पनांना वाव नाही अशा जगात तो वावरत असतो. ज्या शास्त्राची तर्कप्रणाली त्याला समजत नाही त्याविरुद्ध तो ज्यामुळे त्याला जिवंत राहता आले ते भूतकालीन अनुभवावर आधारलेले तर्कशास्त्र उभे करतो. आणि काही वेळेला त्याचे आडाखे अचूक ठरतात. नवीन पद्धती-अवलंबनाच्या परिणामांचा युनेस्कोने जो अभ्यास केला आहे, त्यात बदल व विकास घडवून आणण्याचा

प्रयत्न चालू असताना कधी कधी जुन्याच कार्यपद्धती कशा प्रभावी ठरतात हे दिसून येते.

ब्रह्मदेशात युरोपियन कृषितज्ञांनी आणलेल्या सखोल नांगरणीमुळे शेतात पाणी धरून ठेवणारा कठीण तळ नाहीसा झाला. रबराच्या मळ्यातले तण काढून टाकल्यामुळे रबराच्या झाडातील रस कमी झाला. अधिक पीक देणारा नवीन जातीचा टोमॅटो काढण्यासाठी ब्रह्मी लोकांचे मन वळविण्यात आले तेव्हा त्याला त्यांना न आवडणारा स्वाद आहे असे दिसून आले. परदेशात शिक्षण घेतलेल्या तुर्की तज्ज्ञांनी तुर्कस्थानातील तरुण शेतकऱ्यांचे मन वळवून त्यांना आपल्या नांगरलेल्या जमिनीतील दगड काढून टाकायला लावले. जेव्हा रोपे वाढली तेव्हा वृद्ध किसानांच्या जमीनीत चागले पीक आल्याचे आढळले कारण तेथील कोरड्या हवेत ओलावा राखण्यासाठी दगडांचा उपयोग होत होता.

काही वेळा अनिष्ट परिणाम झाला त्याचा बागुलबोवा करून चालणार नाही. शेतकरी जेव्हा बदल करण्याचे नाकारतो तेव्हा त्याची ती गंभीर चूक असते. तरी पण शेतकऱ्यांच्या जगात बदल मंदगतीनेच का होतात ? गोगलगायीपेक्षा अधिक मंदगतीने ! महान चढण चढायची असेल तर त्यासाठी जी गती हवी तिच्यापेक्षाही मंदगतीने का होतात त्या वस्तुस्थितीवर वरील उदाहरणे प्रकाश पाडतात.

कामगार, संयोजक व सरकारी नोकरवर्ग

शेतकी तंत्रात बदल करण्याची नाखुषी हाच सामाजिक प्रवृत्तीतून उद्भवलेला आर्थिक बदल होण्याच्या मार्गातील एकमेव अडथळा नव्हे. अविकसित देशांतील अर्थोद्योग चालवणारांमध्ये उद्योगक्षेत्रात असेच आडमुठेपणाचे प्रकार दिसतात. नव्या कारखान्यातील अननुभवी कामगारवर्गाचे उदाहरण घ्या. जागतिक बँकेचे अध्यक्ष डॉ. युजेन ब्लॅक यांनी या बाबतीतल्या परिस्थितीचे यथार्थ वर्णन केले आहे.

अविकसित जगात जे ऐतिहासिक परिवर्तन होत आहे त्याचा सर्वांत अभागी बळी शहराकडे ओढलेला कामगार होय. आपल्या [जन्मग्रामाच्या] परिचित विश्वातून तो जीवनविषयक व उद्योगविषयक नव्या प्रवृत्तींची जेथे आवश्यकता आहे अशा आकारहीन, असुरक्षित व गोंधळून टाकणाऱ्या

जीवनात फेकला जातो. कारखान्यात काम मिळण्याएवढा तो नशीबवान असेल तर तेथील शिस्त त्याला त्रासदायक व निरर्थक वाटण्याचा संभव असतो. यंत्र चालवण्यास त्याला शिकवणे हा मोठा अवघड प्रश्न नसला तरी दर्जानियंत्रण अथवा रोजगार-कराराच्या शर्ती अशा गुंतागुंतीच्या कल्पनांची त्याला ओळख करून देणे कठीण जाते, कारण परस्परांना समान अशा भाषेचा अभाव. रिकाम्या वेळी तो सामान्यतः गलिच्छ वस्त्यांतील खुराड्यात सहकाऱ्यांसमवेत लोटला जातो व अविकसित जगातील शहरात संशयास्पद अशा फालतू धंद्यावर कसेबसे जगण्याची किमया ज्यांना साधली आहे अशा भिकारी, भणंग, निराश्रित, छोटे गुन्हेगार आणि तत्सम लोकांच्या मोठ्या विश्वाचा बळी होऊन बसतो.

खेडुतांप्रमाणेच कामगारांचेही आधुनिक आर्थिक व्यवस्थेच्या घटकात सुलभपणे परिवर्तन होत नाही. कारखान्यातील काम हा आपला कायमचा व्यवसाय आहे ह्या विचाराशी किंवा त्या कामात राहणीमान सावकाशपणे उंचावत जाण्याचा संभव आहे ह्या कल्पनेशी तो परिचित नसल्याने एखाद्याने तात्पुरता तुरुंगवास जसा स्वीकारावा तसा तो कारखान्यातील परिस्थितीपुढे मान तुकवतो. युनेस्कोचा ताजा अहवाल म्हणतो की, अविकसित प्रदेशात कामगारांच्या दृष्टिकोणात उत्पादक गुंतावणीची कल्पना दूरच राहिली पण दूरवर पाहण्याच्या दृष्टीचाही अभाव असतो. उदाहरणार्थ, ग्रामीण भागातल्या कामगाराला कामावर जाताना वाटेतील नदीत त्यानेच टाकलेल्या जाळ्यात मासा अडकलेला आढळला तर तो तडक मागे फिरतो. कारण त्याची गरज भागलेली असते. त्याचप्रमाणे शहरातला कामगार वेतनवाढ झाली की, काम कमी करतो व शक्य तेवढ्या लवकर जन्मग्रामी परत जातो.

सुस्ती आणि प्रतिकार ह्या ज्या प्रवृत्ती औद्योगिक समाजाच्या अपेक्षांच्या बाबतीत दिसून येतात, त्या समाजाच्या खालच्या थरापुरत्याच मर्यादित आहेत असे नाही. वर निर्देशिलेला युनेस्को अहवाल पुढे असे म्हणतो की, व्यापारी, इंजिनियर्स, यंत्रज्ञ, कृषिशास्त्रज्ञ अथवा तत्सम मूर्त उत्पादनाशी प्रत्यक्ष संबंध असणारे जे लोक असतात त्यांच्यापेक्षा जमीनमालकी, सरकारी अधिकार, व्यावसायिक अथवा बौद्धिक कार्य यांच्याशी संबंध असणाऱ्यांचा दर्जा मोठा समजला जातो. हा आर्थिक विकासातील एक सर्वत्र आढळणारा मानसिक

अडथळा आहे. अल्पप्रगत देशांत विशेषाधिकारी वर्गदेखील खेड्डूत अथवा सामान्य कामगाराप्रमाणेच आर्थिक विकासाच्या बाबतीत दुराग्रही असतो. श्रीमान लोक आपल्या संपत्तीचे मापन करताना सोने, दागदागिने, घरे, जमिनी यांचाच विचार करतात. एखादा रूपरंगहीन कारखाना किंवा छापील शेअर्स ही संपत्ती आहे हा विचार त्याच्या गळी उतरणे शक्य नसते. तेथील हुशार लोक कायदा, वाङ्मय-निर्मिती, सहकारी खाती यांकडे आकर्षित होतात. पण कनिष्ठ मानलेल्या व्यवसायात आपला अभ्युदय साधता येईल ही कल्पना त्यांना सहजासहजी रुचत नाही. अविकसित देशांतून अमेरिकेत शिकावयास आलेले जे अनेक विद्यार्थी आहेत त्यांतील फक्त चार टक्के विद्यार्थ्यांना त्यांच्या देशांचा मूलभूत प्रश्न जो शेती त्याबाबत आस्था वाटत हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्याहीपेक्षा असे की ज्या समाजात दर्जा व सत्ता जमीनमालकीवर अवलंबून असतात त्यात व्यापारी व उद्योगपती वर्गाच्या उदयाकडे संशयाच्या भावनेनेच पाहिले जाते. आपण असे गृहीतच धरतो की, सर्व संपत्ती सारखी आणि जमीनदारांचे उद्योगपतिवर्गात सहजी परिवर्तन होईल किंवा जमीनदारांना औद्योगिक भांडवलदारांच्या हितसंबंधाबद्दलही आपलेपणा वाटेल. या संदर्भात फ्रान्समध्ये अठराव्या शतकात किंवा इंग्लंडमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला जुने जमीनदार व नवे कारखानदार यांच्यात जो तीव्र संघर्ष झाला त्याची आठवण करून देणे उचित होईल.

आफ्रिका, आशिया अथवा लॅटिन अमेरिकेतील औद्योगिक वर्गाची पैसा मिळवण्याबाबतची जी विचारसरणी आहे ती आपल्यापेक्षा भिन्न आहे. तेथील उद्योगपतींची दृष्टी पाश्चात्त्य संयोजकाची असते तशी नाही. ती बाजारातील व्यापाऱ्यांची वृत्ती आहे. मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि दीर्घकाळ फळ देणारी गुंतवण ही त्यांची उद्दिष्टे नसून झटपट विक्री, झटपट नफा ही आहेत. जेथे सर्वच आर्थिक व्यवहार चिल्लर व तात्कालिक असतात आणि मोठे व्यापारीदेखील नफ्यासाठी अंतर्गत बाजारपेठेच्या संथगती विस्तारापेक्षा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमतीच्या लहरी चढउतारावर अवलंबून असतात, तेथील आर्थिक वातावरण हे आश्चर्यकारक नाही.

सामाजिक प्रवृत्तीमधला आणखी एक फरक सहकारी अधिकार या मोक्याच्या क्षेत्रात दिसतो. स्थूलपणे पाश्चिमात्य देशांत सहकारी अधिकाऱ्याबाबतची

आपली कल्पना मुलकी नोकरवर्गाशी निगडित असते. आणि हेही मोठ्या सहकारी खात्याबाबत आणि त्यातीलही वरिष्ठ विभागाबाबत खरे असते. तेथे भ्रष्टाचारापासून अलिप्त अशी न्यायालये आणि विधिमंडळेच नव्हे तर अव्यक्तिक (impersonal) तंत्रज्ञांची श्रेणी असेल अशी आपली अपेक्षा असते.

बहुतेक अविकसित प्रदेशांतील परंपरागत अपेक्षा वरच्यापेक्षा अगदी भिन्न असतात. पिळणूक व वशिलेबाजी, चिल्लर व मोठ्या प्रमाणावरील लाच या गोष्टी अपवादात्मक नसून सहकारी कारभारातील नियमच आहेत असे तेथे समजले जाते. अलबर्ट हर्शमन यांनी लिहिल्याप्रमाणे लॅटिन अमेरिकेत राज्य-संस्थेची तुलना लूट वसूल करणाऱ्या आणि पूर्णपणे बांडगूळवृत्तीच्या लुटारूंच्या टोळीशी करण्यात येते. आर्थिक विकास राज्यकारभारामुळे होत नसून राज्यसंस्था अस्तित्वात नसली तरीही होतो अशी जी कल्पना आहे ती ब्राझीलमध्ये प्रचलित असलेल्या पुढील म्हणीत चांगल्या प्रकारे व्यक्त झाली आहे. 'रात्री जेव्हा राजकारणी लोक झोपतात तेव्हा देशाचा विकास होतो.'

वरीलसारख्या धोपट विधानामुळे आपण काहू पाहात असलेल्या चित्राल व्यंगचित्राचे स्वरूप येते हे खरे आहे. बहुतेक अविकसित प्रदेशात काही आधुनिक शेतकरी, काही कुशल व शिस्तप्रिय कामगार, काही अतिशय कार्यक्षम असे उद्योगक्षेत्रीय अधिकारी आणि कामाला वाहून घेणारे सरकारी अधिकारी आहेत, हे सांगितले पाहिजे असे नाही. पण तेथे हे 'पाश्चात्त्य' नमुने नियम नसून अपवाद असतात. मेक्सिकोसारख्या पुढारलेल्या अविकसित देशांचा इतिहास तपासला तर आपल्याला वर वर्णन केलेल्या प्रकारचे जिवंत नमुने आढळतील. शेतकरी, वेशिस्त कामगार, खिसेकापू व्यापारी आणि लोभी सरकारी अधिकारी हे तेथील नमुने होत.

समाजात आढळणाऱ्या नमुन्यांची ही पाहणी संपविण्यापूर्वी दोन अनुमाने सांगता येतील. पहिले हे की, आपल्या ऐतिहासिक अनुभवातल्यापेक्षा अगदी भिन्न अशी सामाजिक श्रेणीरचना आपल्याला प्रातिनिधिक अशा अविकसित देशात आढळते. तेथे वरिष्ठ व कनिष्ठ वर्गातील सामाजिक अंतर पाश्चात्त्य देशांत आहे त्यापेक्षा तुलनाच अयोग्य ठरेल एवढे मोठे आहे, मागासलेल्या प्रदेशात–मग तो भारत असो, लॅटिन अमेरिका असो नजिक

पूर्वेतील देश असो अथवा आफ्रिका असो; तेथे नाना प्रकारच्या सामाजिक भेदभावांची आपण विशिष्ट वर्गाचे असल्याची व आपल्यापेक्षा कनिष्ठ अथवा वरिष्ठ वर्गांशी आपला काही संबंध नाही किंवा असलाच तर नाममात्रच अशी भावना फार दिसते. या गोष्टीचे स्थान अविकसित देशाच्या चित्रणातून फार मोठे आहे.

तेथील वर्गभावना 'लढाऊ' असते असा याचा अर्थ नाही. उलट सामाजिक वर्गश्रेणीतील वरच्या व खालच्या थरांतील लोकांची प्रचलित प्रवृत्ती चालू सामाजिक भेदभाव स्वीकारण्याचीच आहे. पण तरीही समाजात भेदभावांचे प्रमाण फार मोठे असण्याचे राजकीय परिणाम व्हावयाचे ते होतातच. खालचे वर्ग सुस्त असतील तरच परंपरागत सत्तातोल टिकून राहील असा त्याचा अर्थ होतो. कदाचित त्यांचा सुस्तपणा आवश्यकच ठरतो. श्रीमंत गरिबांना विभागणारी दरी मागासलेल्या देशांत आहे त्याचप्रमाणे अनुलंघ्य असेल तर विशेष अधिकार उपभोगणारे वर्गबदल, लोकक्षोभ, प्रगती यांबाबत आस्था दाखवतील अशी अपेक्षा करिता येणार नाही. गरीब देशांच्या जुन्या शासनसत्तेला – आणि त्यांपैकी बऱ्याच आजही विद्यमान आहेत – प्रचलित जीवनभाग टिकवून धरणे किंवा फार तर त्यात नवा दृष्टिकोण व नवे व्यवसाय यांना अत्यंत सावधगिरीने स्थान देणे यातच स्वहित आहे असे वाटते.

दुसरे अनुमान हे की, वरील सामाजिक नमुने व सामाजिक घडी भांडवलनिर्माणकारी अर्थव्यवस्था प्रस्थापित करण्याला पोषक नाही. ज्याची शेतीतच पुन्हा गुंतवण करता येईल असे अतिरिक्त उत्पादन शेतकरीवर्ग काढू शकत नाही. दरिद्री व हंगामी कामगारवर्ग येंबभरसुद्धा बचत करू शकत नाही. मध्यमवर्ग अल्पसंख्य व कमकुवत आहे. आणि सर्वांत महत्त्वाचे हे की, वरिष्ठ वर्गाला गुंतवणक्षम नफा मोठ्या प्रमाणात मिळत असला तरी तो नफा विकासासाठी आवश्यक असा अर्थोद्योगात गुंतवण्याची प्रवृत्ती त्यांच्या परंपरागत हितकल्पनांत बसत नाही.

ज्याचे बीज शेवटी सामाजिक संस्थांत व प्रवृत्तीतच आहे अशा आर्थिक सुस्तीमुळे अविकसित समाजांना हानी पोचली आहे. पाश्चात्त्यांचे वैशिष्ट्य असलेल्या प्रयत्नवादी संस्कृतीऐवजी त्यांची संस्कृती दैववादी असल्यामुळे महान आरोहणासाठी आवश्यक असलेले निश्चय व कृतिशीलता हे गुण कमी

होतात. मागासलेल्या देशांतील लोक काम करीत नाहीत असे त्यांच्या कधी न संपणाऱ्या श्रमाशी अपरिचित असलेला मनुष्य म्हणेल. पण तरीही त्यांच्या श्रमाच्या बोजात आशेचा अंतर्भाव नाही आणि म्हणून कामाबद्दल पाश्चात्त्यांना वाटणारे आकर्षण नाही. निराशेतून निरुत्साहाचा जन्म होतो. पराङ्मुखता आपलेच संवर्धन आणि समर्थन करते. श्रीमान आणि गरीब देश प्रेरणांमधील प्रचंड तफावतीमुळे त्याचप्रमाणे सामाजिक संस्था आणि उत्पादनसामर्थ्य यांतील तफावतीमुळे परस्परांहून भिन्न होतात. अविकसित देश हे श्रीमान देशांचे समानतेत कमी असलेले केवळ नमुने आहेत असे नाही तर त्यांच्या घडणीतच सुस्ती व माघारसुद्धा अंतर्भूत आहेत.

महान स्थित्यंतर

विचाराचे व आचाराचे हे सर्व मार्ग बदलणे शक्य आहे. किसानाची परंपरागत संशयवृत्ती घालवून सरंजामशाहीनंतर युरोपमध्ये झाले त्याप्रमाणे शेतीकडे पाहण्याच्या व्यापारी प्रवृत्तीला जाग आणता येईल. अननुभवी कामगारवर्ग हे आधुनिक राज्यातले शिस्तबद्ध औद्योगिक सैनिकवर्ग बनू शकेल. व्यापारी-उद्योगपती होऊ शकतील. सरकारचे पगारखाऊ खरेखुरे मुलकी नोकर होऊ शकतील. पण सामाजिक प्रवृत्तीमुळे विकास मार्गात जे अडथळे येतात, त्यांवर लक्ष केंद्रित करणे म्हणजे आर्थिक विकास या शब्दप्रयोगामुळे होणारे ' महान आरोहणा 'चे दर्शन किती अपुरे आहे हे आपल्याला समजते.

आर्थिक विकास म्हणजेच प्रतीत वाढ व उत्पादनात विस्तार, लोक 'आर्थिक' असण्यावर अवलंबून असते. ' आर्थिक ' लोक म्हणजे उत्पादनाविषयी आस्था बाळगणारे शेतकरी, औद्योगिक कामगार, कारखान्याचे क्रियाशील व्यवस्थापक, सहाय्योत्सुक सरकारी अधिकारी होत. ह्या वर्गांचा जोपर्यंत अभाव आहे, तोपर्यंत आर्थिक विकासाची उभारणी विस्तृत पायावर होणे शक्य नाही.

डोळ्याला सुरळ पाडणारे औद्योगीकरण दर्शविणारे काही नमुने अर्थातच उभारता येतील. भातशेतीशेजारीच पोलादाचे कारखाने होतील, आणि एकदा अनेकांगी छोटासा उद्योगधंदा उभा करता येईल हे सर्व खरे आहे. पण ब्राझीलच्या चैतन्यहीन ईशान्य भागात भरभराटीस आलेले साओपावलो

शहर, कटांगासारख्या संपूर्णपणे अविकसित पार्श्वभूमीवर दिसणाऱ्या प्रचंड खाणी किंवा भारतातील प्राथमिक अवस्थेतील गिरिजनांच्या नजरेच्या टप्प्यात दिसणारे उद्योगमय दामोदर खोरे ही उदाहरणे हेच दर्शवितात की, महत्त्वाचा भांडवलसाठा भावी आर्थिक विकासासाठी कितीही अनिवार्य असला तरी तेवढ्यानेच परंपरागत समाजात चैतन्य येऊन त्याचे परिवर्तन आधुनिक समाजात होत नाही. ते चैतन्यमय परिवर्तन होण्यासाठी सर्वव्यापी असे सामाजिक परिवर्तनच व्हायला हवे. त्यापेक्षा कमी असे काही होऊन भागणार नाही. जीवनसरणीचा संपूर्ण कायापालट, वेळ, पैसा, दर्जा, काम यांबाबतच्या मूल्यात आमूलाग्र पालट, दैनंदिन जीवनाची घडामोड व पुनर्घडी या गोष्टी व्हायला लागतील. शिवाय आपण हे पाहिलेच आहे की, असा सामाजिक कायापालट होण्यासाठी 'जैसे थे' वर अधिष्ठित असलेली राज्ये जाऊन स्वैर सामाजिक बदल घडवून आणण्याचे धारिष्ट करणारी राज्ये प्रस्थापित झाली पाहिजेत.

या महत्त्वाच्या राजकीय स्थित्यंतराकडे आपण नंतर पुन्हा वळू. कोणत्याही समाजात असे राजकीय स्थित्यंतर हा सांधे उखडणारा व गोंधळ माजवणारा अनुभव असतो एवढे मात्र येथे आग्रहाने सांगितले पाहिजे. सरंजामशाही साच्यातून आपला पाश्चात्त्य आधुनिक समाज उत्क्रांत होत असता जे वेदनामय संघर्ष झाले त्यांची आठवण केली की, पिढ्यान्‌पिढ्यांचे विचार व आचार सहज सोडून दिले जात नाहीत हे समजेल. या प्रक्रियेला मोठा कालावधी लागतो. पश्चिमेकडे देखील ती अजून पुरी झाली नाही. हे दक्षिण इटलीतील खेडुतांकडे अथवा स्पेनच्या राज्यव्यवस्थेकडे पाहिल्यास समजेल. अविकसित देशांत तिच्यासाठी किती कालावधी लागेल याचे भविष्य वर्तविता येणार नाही. एवढे निश्चित की, विस्तृत पायावर व सर्वव्यापी असे महान आरोहण होऊन आर्थिक विकास व्हावयाचा असेल तर विशाल प्रमाणावर सामाजिक परिवर्तन होऊन ते सुस्थिर होईपर्यंत वाट पाहावी लागेल.

पण अविकसित देशांच्या अंगभूत प्रश्नांचा आढावा आपण अद्याप पूर्ण केला नाही. प्रगती अडवून धरणाऱ्या सर्वांत मोठ्या धोंड्याचा विचार अजून करावयाचा आहे. तो धोंडा म्हणजे लोकसंख्येची बेसुमार वाढ होय. लोकसंख्यावाढीच्या प्रश्नाचा विचार करणाराला पुढे येणाऱ्या संकटाची चाहूल

लागण्यास फार वेळ लागणार नाही. हा मुद्दा स्पष्ट होण्यास थोडीशी आकडेवारी पुरेशी आहे.

आपलाच दक्षिणेकडील शेजारी जो मेक्सिको त्याच्यापासून सुरुवात करू या. आज मेक्सिकोची एकूण लोकसंख्या ३६ दशलक्ष (३ कोटी ६ लक्ष) म्हणजे न्यूयॉर्क, पेनसिल्व्हेनिया, न्यूजर्सी, कनेक्टिकट यांच्याएवढी आहे. मेक्सिकोची लोकसंख्या सध्याच्या गतीने वाढत राहिली, तर आजपासून चाळीस वर्षांनी ती १२३ दशलक्ष (१२ कोटी ३ लक्ष) म्हणजे वरील चार राज्ये अधिक उरलेले न्यू इंग्लंड, अधिक सबंध साऊथ अॅटलांटिक सीबोर्ड, अधिक संपूर्ण पश्चिम किनारा, अधिक ओहायो, इंडिआना, इलिनाय, मिशिगन, विस्कान्सिन एवढी होईल. किंवा कॅरेबियन आणि मध्य अमेरिकन प्रदेश घ्या. आज या छोट्या प्रदेशाची लोकसंख्या ६६ दशलक्ष (सहा कोटी साठ लाख) आहे. आजच्या गतीने चाळीस वर्षांनंतर ही लोकसंख्या युनायटेड स्टेटस्च्या आजच्या लोकसंख्येपेक्षा ३० दशलक्ष (तीन कोटी) अधिक भरेल. त्या वेळी दक्षिण अमेरिकेची लोकसंख्या (आजच्या आपल्या लोकसंख्येपेक्षा वीस टक्क्यांनी कमी आहे.) आपल्या आजच्या लोकसंख्येपेक्षा तिप्पट होईल. चालू गतीने त्या वेळची भारताची लोकसंख्या एक अब्ज व चीनची दीड अब्ज असेल.

कदाचित ह्या कॅन्सरगती वाढीची गती कमी होईल, पण तशी प्रवृत्ती अद्याप दिसत नाही. तसे न झाल्यास, विकासावरील त्याचा अपेक्षित परिणाम स्पष्ट आहे. ईजिप्तमध्ये आस्वान धरण जे कोणत्याही अपूर्ण विकसित देशातील एक प्रचंड बांधकामापैकी आहे, तेच उदाहरण म्हणून घ्या. तीस मजली इमारतीएवढे उंच व तीन मैल लांबीचे हे धरण सुमारे वीस लक्ष एकर नवी जमीन पिकासाठी उपलब्ध करून देईल. आज इजिप्तमध्ये निर्माण होत असलेल्याच्या तिप्पट बीज या धरणामुळे निर्माण होईल. त्याचा एकूण परिणाम शेतकी उत्पादन ४५ टक्क्यांपर्यंत वाढण्यात होईल. पण त्या धरणाचे बांधकाम चालू असेल त्या दहा वर्षांत इजिप्तची लोकसंख्या तेवढ्याच टक्क्यांनी वाढेल असा अंदाज आहे. तेव्हा दीर्घकालाच्या संदर्भात उत्पादनशक्ती जरी वाढणार असली, तरी नजीकच्या काळात दरमाणशी राहणीमानवाढ शून्य होईल, तावडतोब होणारे परिणाम लक्षात घेतल्यास, या प्रचंड राक्षसी बांधकामे-उद्योगामुळे ईजिप्तच्या अर्थव्यवस्थेला अतिप्रजननाच्या धोक्यामुळे गुदमरून जावे लागणार नाही

एवढेच यश मिळेल. इतर खंडांमध्येही तशीच निराशाजनक परिस्थिती आहे. आकडेबारी असे दर्शविते की, आशियाला केवळ सध्याचे दरिद्री राहणीमान टिकवून धरण्यासाठी आजपासून १९७५ पर्यंत समस्त उत्पादन ६० टक्क्यांनी वाढवावे लागेल आणि १९७५ ते २००० इ. स. च्या दरम्यानच्या काळात ७५ टक्क्यांनी ते आणखी वाढवावे लागेल. म्हणजे वाढत्या उत्पादनापासून होणारा बहुतांश लाभ नेहमीच धोक्यात असलेली चरितार्थाची पातळी टिकवण्यापायीच खर्ची पडेल.

अविरत अतिप्रजननाच्या एका परिणामाची म्हणजे शेतजमिनीच्या तुकडेमोडीची आपण दखल घेतलीच आहे. पण तुकडेमोडीपाशीच हा प्रश्न थांबत नाही. युजेन ब्लॅक यांनी दिलेल्या माहितीनुसार ग्रेट ब्रिटनच्या लोकसंख्येएवढे लोक सध्याच भारतात जमीनमालकीपासून वंचित झाले आहेत. आणि तरीही ते ग्रामीण भागातच वास्तव्य करून आहेत. लोकसंख्येच्या या दडपणामुळे ग्रामीण भागातले दारिद्र्य वाढते व पसरते आणि ग्रामीण लोक आधीच तुडुंब भरलेल्या शहराकडे ढकलले जातात. इंडोनेशिया या दर चौरस मैलास ११०० ही लोकसंख्येची विश्वास न बसणारी एवढी दाटी असलेल्या देशात (अमेरिकन लोकसंख्येची दाटी दर चौरस मैलास ५०·४ आहे हे तुलनेसाठी पाहावे) दररोज ५०० कुटुंबे भोवतालच्या भागातून जाकार्ता या शहरात येतात. रोजी २५० कुटुंबे बँकॉक व रंगूनमध्ये येतात. भिकारी, उकिरडे उपसणारे व फूटपाथवासी यांची गर्दी वाढतच जाते.

लोकसंख्या-स्फोट ही अलीकडील घटना आहे आणि तिचा उगम प्रामुख्याने पाश्चिमात्य वैद्यक व सार्वजनिक आरोग्यविषयक कल्पनांच्या अविकसित प्रदेशातील प्रसारात आहे हा उल्लेखनीय उपरोध आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी गरीब देशांतील जननप्रमाण मोठे होते; पण तेवढेच मृत्युप्रमाणही मोठे असल्याने लोकसंख्यावाढ आटोक्यात होती. पण त्यानंतर जननप्रमाण मोठे राहिले आहे आणि मृत्युप्रमाण मात्र झपाट्याने कमी झाले. त्याचे भयानक परिणाम झाले आहेत. उदाहरणार्थ सिलोनमध्ये हिवतापनियंत्रण व तत्सम आरोग्यवर्धक उपायांमुळे १९४६ या एकाच वर्षात मृत्युप्रमाण ३० टक्क्यांनी कमी झाले. तैवान, मलाया, आफ्रिका व नजीकपूर्वकडील विस्तीर्ण देश यांत आयुर्मान तुलनेने वाढले आहे व लोकसंख्या फुगली आहे. लोकसंख्येचा

स्फोट अजून पुरा झालाच नाही. उष्णकटिबंधातील आफ्रिकेत आज बालमृत्यु-प्रमाण हजारी २०० ते ८०० व सरासरीत हजारी ३०० ते ५०० आहे. हे भयंकर प्रमाण जसे कमी होईल–आणि तसे ते होणारच–आणि हजारी २६ या अमेरिकन बालमृत्युप्रमाणाजवळ येईल तशी भावी लोकसंख्या प्रचंड होईल.

स्वनाशकारी मोठे जननप्रमाण अखंड चालू राहील काय? या प्रश्नाचाही नंतर विचार करावा लागेल; पण या प्रश्नाचा आपला व छोटासा आढावा युजेन ब्लॅक यांच्या औदासिन्यपूर्ण शब्दात संपविणे उचित होईल. ते म्हणतात की, लोकसंख्यावाढ थोपवता आली नाही तर आशिया आणि मध्यपूर्व यात आर्थिक प्रगती होईल ही आशा या पिढीपुरती तरी सोडून द्यावी लागेल.

दुष्ट चक्रे

अपूर्ण विकसित देशांचा आपला प्राथमिक आढावा घेऊन झाला. या पूर्वीच्या पानांवर ज्या समस्यांची नोंद घेण्यात आली आहे, ती कोणत्याही अर्थाने अपूर्ण विकसनातून उद्भवणाऱ्या अडथळ्यांची संपूर्ण यादी म्हणता येणार नाही. तसेच आधी सांगितल्याप्रमाणे सर्व अपूर्ण विकसित देशांत या अडथळ्यांचे दुष्परिणाम सारखेच होतात, असे समजण्याचे कारण नाही. प्रत्येक देशात घटकांचे प्रमाण वेगवेगळे असते. प्रत्येकात निराळ्या अशा काही बाबी असतील आणि त्यांची पाळेमुळे तेवढीच खोलवर गेलेली आणि सहज उपटून न काढता येणारी असतील. भारतातील जातिभेद, आफ्रिकेतील काही टोळ्यांना वाटणारा कामाचा तिटकारा, कारखानदारांसंबंधी जावामधील लोकांची 'अनार्थिक' कल्पना ही उदाहरणे अशा बाबींची होत.

आणि आपण अद्याप अनारोग्य अथवा अज्ञान या समस्यांचा निर्देशही केला नाही. प्रत्येक अपूर्ण विकसित देशात या समस्येमुळे विकासाचा प्रवाह अवरोधला जातो. मलेरियाचे उदाहरण घ्या. आज जगात सुमारे एक अब्ज लोक मलेरियाने ग्रस्त झालेले आहेत. भारतासारख्या देशात मलेरियाच्या तापामुळे दरवर्षी एक-पंचमांश अथवा अधिक लोक वर्षातून काही दिवस तरी काम करू शकत नाहीत. त्याच कारणामुळे अफगाणिस्तानमधील कुटुंब-भोवतालच्या विस्तीर्ण पिकाऊ जमिनी लागवडीशिवाय राहतात. मरायचे असेल तर कुटुंबला जा अशी अफगाणीत म्हणच आहे. मेक्सिकोत मलेरियामुळे दरवर्षी

१७५ दशलक्ष (साडेसतरा कोटी) डॉलरचे पीक वाया जाते. कारण शेतकऱ्यांना त्याची देखरेख करता येत नाही.

आर्थिक विकासाला सुरुंग लावणाऱ्या आरोग्यप्रश्नांपैकी मलेरिया हा एक झाला. पाच सेंट किमतीच्या पेनिसिलीनने पूर्ण बरा होणाऱ्या भयानक व शक्तिहीन करणाऱ्या रोगाने परवापर्यंत दरवर्षी ५ कोटी लोक पछाडले जात. संथपणे नाश करणाऱ्या क्षयाचे वार्षिक बळी ५० लाख आहेत तर महारोगाचे १ कोटी २० लक्ष रोगी आहेत. अंधत्व आणणारा मोतीबिंदू ४० कोटी लोकांची दृष्टी पळवतो. हे सर्व रोग जागतिक आरोग्य संघटनेचे लक्ष्य आहेत आणि त्यांच्या विरुद्ध उघडण्यात आलेल्या पहिल्याच मोहिमेपुढे त्यांनी शरणागती पत्करली आहे. तरीही हे रोग अद्यापही विकासात प्रचंड अडथळा आणीत आहेत. उदाहरणार्थ आफ्रिकेत १२ टक्के आफ्रिकी वयात येण्यापूर्वीच मलेरियाने मरतात. म्हणजेच दीड कोटीपेक्षा अधिक आफ्रिकन लोक त्या खंडाच्या अपुऱ्या उत्पादनाचे सेवन करण्यापुरतेच जगतात आणि उत्पादनवाढीला हातभार लावण्यापूर्वीच मरतात.

ज्यांची आपण फारशी दखल घेतली नाही, त्यांपैकी आजारीपण हा एकच विकासातील अडथळा नाही. माणसाचा तेवढाच शक्तिपात करणारी भूक अथवा विकास रोखण्यास अधिक हातभार लावणारे अज्ञान, रस्ते नसलेली खेडी, पूर्णपणे कूपमंडूक वृत्तीचे समाज यांमुळे येणारा, अज्ञानाचा पाया असणारा अलगपणा याही गोष्टी आहेत व ही यादी कितीतरी लांबवता येईल.

अपूर्ण विकसनाच्या या अनेक कारणांचे सारांशाने वर्णन करायचे झाले तर दुष्ट चक्रे या नेहमीच्या वापरातील शब्दप्रयोगानेच करता येईल. केवळ भांडवलाचा अभाव, केवळ जुनाट चालीरीती, केवळ लोकसंख्या किंवा केवळ राजकारण यांचे दडपण गरीब देशांवर पडले असे नाही. या सर्वांचे एकत्रीकरण होऊन एकामुळे दुसऱ्याची तीव्रता वाढते. अपूर्ण विकासाचे दोष स्वतःची वाढ स्वतःच करतात. सर्वांचा समाचार घेतल्याशिवाय कोणताही एक अडथळा बाजूला करता येणार नाही.

ह्या अपूर्ण विकसनातील अति दुर्लंघ्य अडचणी होत. दुष्ट कारणांची गुंतागुंत, पराभवाची आपोआप उद्भवणारी प्रवृत्ती या गोष्टी बहुतांश मानवाच्या

आजच्या जीवनाकडे व उद्याच्या भवितव्याकडे पाहू इच्छिणाऱ्याला सामोऱ्या येतात. या कठोर परिस्थितीला कमी लेखून काही फायदा होणार नाही. समस्येचा खोल व सर्वांगीण विचार केला तर तिला तोंड कसे द्यावयाचे याच्या योजना आखता येतील.

पण एवढ्याच उपाययोजनांकडे वळणे घाईचे होईल. अपूर्ण विकसित देशांच्या एका अति महत्त्वाच्या अशा समान वैशिष्ट्यांचा आपण विचार केलाच नाही. ते म्हणजे त्यांनी विकासासाठी अलीकडे केलेली सर्वस्व पणाला लावण्याची तयारी. हे कसे घडून आले व त्याचा भवितव्यावर काय परिणाम होणार आहे या प्रश्नांकडे आता आपण वळले पाहिजे.

४

महान निश्चय

आर्थिक विकासाचा अभ्यास करताना आपण ज्या परिस्थितीचा विचार करीत आहोत ती परिस्थिती किती प्राचीन आहे हे आपण विसरण्याचा संभव आहे दारिद्र्य हीच जर आपण कसोटी मानली तर अपूर्ण विकसन हे मानवी संस्कृती-एवढेच पुरातन आहे असे दिसून येईल. हॉब्सने मानवी जीवनाला लावलेली दरिद्री, घाणेरडे, पाशवी व अल्प ही प्रसिद्ध विशेषणे पुरातनकाळापासूनचे मनुष्याचे सर्वसाधारण जीवन दर्शवितात.

आणि तरीही अपूर्ण विकसनाचा प्रश्न असा अलीकडीलच आहे.कारण आता मागासलेल्या प्रदेशांच्या परंपरागत परिस्थितीस दोन संपूर्णपणे नवे असे घटक दिसू लागले आहेत. त्यांतील पहिला घटक औद्योगिक तंत्रविज्ञान हा होय. सध्या ते विज्ञान थोड्याशा प्रगत देशात केंद्रित झाले आहे. आणि आतापर्यंत कल्पनेच्या कक्षेपलीकडे असणारे आर्थिक पराक्रम करून दाखविण्याचे सामर्थ्य त्यात आहे. दुसरा घटक म्हणजे आपली परिस्थिती सुधारू शकेल अशी अपूर्ण विकसित प्रदेशातील लोकांत झालेली जाणीव होय. या दोन घटकांचा संयुक्त परिणाम एका महान निश्चयाचे पाठबळ विकासरूपी क्रांतीला लाभण्यात झाला आहे. या महान निश्चयाला आता कोठे मानव जातीसाठी स्वीकारण्यात आलेल्या कार्यक्रमाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आणि आजही अनुकूल परिस्थितीला काही देशांतल्या लोकांना विकासाची कल्पना देखील अकाली जन्मली आहे असे वाटते. मानव जातीच्या इतिहासावरील हे भाष्य बोलके व अर्थपूर्ण आहे.

युरोपमधल्या ज्या भागाला सोळाव्या सतराव्या शतकात ही अनुकूलता लाभली त्याला त्या बाबतीत कोणत्या कारणांचा हातभार लागला आहे हे पाहणे उचित होईल; पण ते या छोट्या ग्रंथाच्या फारच मर्यादेपलीकडे जाईल. तेव्हा त्याऐवजी १९ व्या शतकाच्या अखेरच्या परिस्थितीपासून प्रारंभ करता येईल; कारण तेव्हाच महान निश्चयाची बीजे प्रथम पेरली गेली.

१९०० सालचा जगाचा नकाशा आपण आपल्या पुढे पसरला तर त्यात बऱ्याच सुरस गोष्टी दिसून येतील. आर्थिकदृष्ट्या तो नकाशा आजच्यासारखाच दिसेल. पण राजकीयदृष्ट्या तो बराच भिन्न आहे. ईजिप्तपासून संयुक्त दक्षिण आफ्रिकेपर्यंतचा सर्व आफ्रिकाखंड ही त्या वेळी एक गौरवर्णीय युरोपियनांची वसाहत होती. आग्नेय आशिया, हॉलंड व ब्रिटनच्या वर्चस्वाखाली होता. अनेक युरोपियन गटांकडून सबलतीच्या रूपाने शोषला जाणारा चीन हा एक मृतप्राय देश होता. फक्त दक्षिण अमेरिका राजकीय दृष्ट्या स्वतंत्र असलेला दिसतो. पण वरवर काही दिसले तरी त्यातील कॉफी-केळ्यांच्या बागायती मांस डबाबंद करणारे कारखाने, तांबे व जस्त यांच्या खाणी, उसबाक (sisal) शेती यात अमेरिकन, ब्रिटिश, युरोपियन भांडवलाचा निर्णायक प्रभाव किती होता हे समजण्यास फार खोलात शिरावयास नको.

दोन संपूर्णपणे भिन्न, जवळजवळ पूर्णपणे स्वतंत्र पण तरीही धोका प्राप्त होऊ शकेल इतक्या प्रमाणात परस्परांवर परिणाम करणाऱ्या जगाचे सहजीवन ही आजच्या परिस्थितीची पार्श्वभूमी असल्याचे दिसून येते. त्यातील एक जग गतिशील, विकासशील, शक्तिमान, स्वसामर्थ्यावर विश्वास असेलेले, साम्राज्यशाहीच्या वैभवशिखरावर असणारे भांडवलशाही जग होते; तर दुसरे गतिशून्य, कृतिशून्य, औद्योगिक क्रांतिपूर्व वसाहती अथवा निमवसाहती देश-प्रदेशांचे जग होते.

येथे साम्राज्यवादाच्या आणि वसाहतवादाच्या गुंतागुंतीच्या इतिहासात शिरण्याचे प्रयोजन नाही. या इतिहासाचा आता कटू शेवट होऊ लागलाच आहे. पण आर्थिक विकासाची वाटचाल समजण्यासाठी ह्या इतिहासाचा जो वारस आहे त्याची दखल आपल्याला पाहिजे. बहुतेक अपूर्ण-विकसित देशांनी वसाहतवादाच्या व साम्राज्यवादाच्या शाळेत धडे गिरविले आहेत. प्रत्येक वसाहतीत शिकविले जाणारे धडे वेगळे असले तरी शिक्षकांबद्दलची सारखीच अप्रीती त्यांच्या सर्व माजी विद्यार्थ्यांत आहे हे स्पष्ट दिसते.

प्राथमिक चालना

पूर्वेकडील व पश्चिमेकडील भूखंडावर पाश्चिमात्यांचे जे दीर्घकाळ वर्चस्व होते त्याचा आढावा घेतल्यास त्यांच्या संबंधातील घाणेरड्या बाजूवर स्वच्छ प्रकाश पडणे स्वाभाविक आहे. ती बाजू नेहमीच घाणेरडी होती आणि अँगोला व न्होडेशियासारख्या ज्या प्रदेशांत एकोणिसाव्या शतकातीलच परिस्थिती विसाव्या शतकात चालू राहिली आहे तेथे ती अद्यापही घाणेरडी आहे.

दीर्घकालीन परिणामाच्या दृष्टीने पाहता वसाहतवादाचा परिणाम केवळ शोषणात न होता बराच अधिक झाला आहे हे मान्य करावे लागेल. वसाहतकारी राष्ट्रांबरोबर आर्थिक संबंध जोडले गेल्याच्या पाठोपाठच अपूर्णविकसित देशांत औद्योगिक भांडवलाची आयात प्रचंड प्रमाणावर होऊ लागली. रस्ते, लोहमार्ग, गोद्या, खाणकाम-सामग्री, कोठारे यांच्या ह्या सर्व गोष्टी प्रथम पाश्चात्त्य राष्ट्रांनी उभ्या केल्या. खरे म्हणजे या गोष्टींना वसाहतीचा अंगभूत भाग म्हणण्याऐवजी वसाहतकारी देशांच्या अर्थव्यवस्थांचा विस्तार म्हणणे शोभेल. अपरिवर्तनशील कृषिजीवनसागरात या गोष्टी अलिप्त अशा पाश्चात्त्य उद्योगपतींच्या गटांच्या प्रभुत्वाखालील उद्योगांची बेटे या स्वरूपातच बहुधा राहिल्या. तरी पण त्यांनी जिच्याविना अपूर्णविकसित अर्थव्यवस्था आज आहे त्यापेक्षाही अप्रगत अवस्थेत राहिल्या असत्या त्या औद्योगिक संपत्तीची वाढ घडवून आणली.

पाश्चात्त्य राष्ट्रांतून झालेली दुसरी आयात तेवढीच महत्त्वाची होती. ती म्हणजे कायदा व सुव्यवस्था ह्यांचे प्रस्थापन ही होय. बहुतेक ठिकाणी नवी राज्यव्यवस्था, जिची आशा तिने घेतली त्या राज्यव्यवस्थेपेक्षा स्थैर्य व समताधिष्ठित न्याय या गुणांनी अधिक युक्त अशी होती. नवा कायदा गौरवर्णीयांचा होता, नवी व्यवस्था गौरवर्णीयांची होती, तसेच कित्येकदा अंमलबजावणीत भेदभाव केला जात असे, हे सर्व मान्य केले पाहिजे. तरी पण अनेक अपूर्णविकसित देशांच्या दृष्टीने पाहता आधुनिक राज्यव्यवस्थेच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल होते.

पण वसाहतवादाचा–जरी अहेतुतः झालेला असला तरी–सर्वांत महत्त्वाचा विदारक परिणाम म्हणजे वसाहतींतील लोकांच्या मनांतच निर्माण झालेली

आपल्या कमनशिबाची जाणीव हा होता. इंग्लंड, हॉलंड, फ्रान्स, युनायटेड स्टेट्स् या देशांत अभ्यासासाठी गेलेल्या मूठभर एतद्देशियांना पाश्चात्त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांच्यातील जोम हा एक मोठा चैतन्यकारी शोध होता. ते तत्त्वज्ञान निर्यातीसाठी खासच नव्हते आणि जेव्हा ते तरुण विचारवंत मायदेशी जाऊन लोकशाही, समता, स्वानंद, आर्थिक प्रगती यांचा प्रचार करू लागले तेव्हा त्यांच्या शिक्षकांनी त्यांना वक्षीस म्हणून तुरुंग दाखवला. तरीही ध्यावयाचे ते धडे घेतले गेलेच आणि पाश्चिमात्यांना त्या तत्त्वांच्या अंमलबजावणीबद्दल जरी नाही तरी शिकवणीबद्दल श्रेय दिलेच पाहिजे.

आर्थिक विकासाचे आंदोलन हे एकप्रकारे समाजवादाचेच फळ होते. ज्या प्रदेशात आर्थिक प्रगतीची पूर्वतयारी स्वदेशी छापाची व स्वाभाविक नव्हती अशा देशांत पाश्चात्त्य सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीचा जो विस्तार झाला होता त्याला प्राप्त झालेले फळ होते हे दिसून येईल. त्यांचा परस्परसंबंध कितीही क्लेशकारी असला तरी त्याच्या अभावी अपूर्णविकसित देशांच्या आर्थिक विकासाला आजही गती मिळाली नसती.

एकांगी विकास

विकासाला प्राथमिक चालना हा पाश्चात्त्यांबरोबरच्या संबंधाचा एक परिणाम असला तरी त्या विकासाचा प्रवाह एका दिशेनेच वाहू लागला. हा दुसरा परिणाम तेवढा सुखकर नव्हता.

साम्राज्यवादी देशांच्या दृष्टीने अपूर्णविकसित देश हे, त्यांच्या औद्योगिक अर्थव्यवस्थेला लाभदायक असणाऱ्या कच्च्या मालाचा स्वस्तात पुरवठा करणाऱ्या प्रचंड बखारी होत्या. त्यामुळे अपूर्णविकसित प्रदेशांच्या अर्थव्यवस्थांना त्या देशांच्या पाश्चात्त्य सत्ताधीशांच्या विकृत सहाय्यकांचे स्वरूप प्राप्त झाले. मलाया रबराची बाग झाली. व्होडेशिया ही तांब्याची खाण झाली. सिलोन चहाचा मोठा मळा झाला. अरबस्थान तेलाची खाण झाली. त्या त्या प्रदेशांचे साधन धन व आंतरराष्ट्रीय श्रमविभागाचे नैसर्गिक फायदे यांनी या प्रवृत्तीला उत्तेजन दिले यात बिलकुल शंका नाही. पण विकासाची दिशा वसाहतीतल्या लोकांनी ठरविली नाही तर पाश्चात्त्य सार्वभौमांनी ठरवली आणि त्यामुळे तेथील जनतेला विशेषीकृत औद्योगिक उत्पादनाचे संभाव्य फायदे मिळू शकले नाहीत.

प्रत्यक्ष परदेशी हस्तक्षेपापासून मुक्त असलेल्या लॅटिन अमेरिकेत देखील एकांगी विकासामुळे तेथील अर्थव्यवस्थेला अत्यंत विकृत स्वरूप प्राप्त झाले. उदाहरणार्थ : व्हेनेझुएलाच्या निर्यातीपैकी ९२ टक्के निर्यात तेलाची आहे. कोलंबियाला कॉफीच्या उत्पन्नावर ७७ टक्के परदेशी चलनासाठी अवलंबून राहावे लागते. चिलीची ६६ टक्के निर्यात तांब्याची आहे. बोलिव्हियाच्या निर्यातीत टिनला ६२ टक्के स्थान आहे. होनुरासची ४५ टक्के निर्यात केळ्यांची आहे.

साम्राज्यशाहीवादाचा दुसरा भाग म्हणजे पिकावर अवलंबून असणारी अर्थव्यवस्था. ह्या पिकांच्या किंमती मालाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या लहरीपणावर अवलंबून असल्यामुळे ती अर्थव्यवस्था सदैव धोक्यात असे. परिणामी साम्राज्यवादी अमदानीतून अपूर्णविकसित जग जेव्हा बाहेर पडते, तेव्हा त्याच्या अर्थव्यवस्थेचा काही भाग फुगलेला असतो तर काही भागाला क्षयाची बाधा झालेली असते. त्यांच्या अर्थव्यवस्थेची नौका सुर्व वादळांना तोंड देण्यास समर्थ नसते. व्यापारीरूपी वारा जोराने वाहू लागला की, लगेच बुडेल अशी असते.

परतंत्र देशांच्या अर्थव्यवस्थेवर भूतकालीन प्राथमिक संबंधांचा हा जो अनिष्ट परिणाम झाला त्यामुळे विकासोन्मुख देशांना पाश्चात्त्य राष्ट्रांशी आर्थिक संबंध जोडताना आज शंका वाटणे साहजिक वाटते. साम्यवादाच्या कक्षेत गेलेले देश सोडून नव्याने उदयास आलेले जे देश आहेत, त्यांना पाश्चात्त्य मदतीची, पाश्चात्त्य सल्लागारांची, पाश्चात्त्य कर्जाची व भांडवलाची आपल्याला अत्यंत गरज आहे ही जाणीव झाली असूनही पाश्चात्त्य भांडवलाचा त्यांच्या प्रदेशात जेव्हा जेव्हा शिरकाव होतो, तेव्हा तेव्हा प्रत्येक वेळी ते संशयग्रस्त नजरेनेच त्याकडे पाहतात. प्रत्यक्ष राजकीय सत्तेच्या मार्गाने येणारा नव्हे पण लंडन, न्यूयॉर्क अथवा अमस्टरडॅममध्ये बसून निर्णय घेणाऱ्या संचालक मंडळाच्या मताच्या रूपाने देणाऱ्या आपल्या आर्थिक जीवनावरील परकीय वर्चस्वाची चाहूल त्यात त्यांना दिसते.

परिणामतः बहुतेक अपूर्ण विकसित देशांनी अर्थोद्योग संस्थांच्या धोरणावर स्थानिक नियंत्रण असावे असे कायदे केले आहेत. अंतर्गत अडचणींचे खापर परदेशी अर्थोद्योगसंस्थांच्या माथी फोडण्याची गरज व त्यातून निर्माण झालेली

तशी प्रवृत्तीही या देशांत दिसते. त्याच प्रवृत्तीनुसार परदेशी अर्थोद्योग संस्थांचे राष्ट्रीयीकरण करण्याची, विशेषतः त्या संस्थांच्या हातात मोक्याचे उत्पादन असल्यास, या देशांना मोह होतो हे समजू शकते. महत्त्वाच्या उत्पादन-संस्थांच्या उभारणीसाठी झालेल्या खर्चाची परदेशीयांनी देशातून शोषून घेतलेल्या नफ्याच्या रूपाने किती तरी पटीने फेड केली असल्याने, मवाळ प्रवृत्तीच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांना देखील ते अर्थोद्योग, त्यासाठी एकदा शेवटची किंमत मोजावी लागली तरीही ते ताबडतोब घेण्याचा मोह होतो.

परदेशांच्या या प्रवृत्तीशी घनिष्ठ संबंध असलेली आणखी एक प्रवृत्ती आहे आणि तिचा उगम देखील गतकालीन साम्राज्यशाही हाच आहे. ती म्हणजे अपूर्णविकसित देशांतल्या राजकीय पुढाऱ्यांच्या मनांत भांडवलशाहीबाबत शंकेखोरपणाची प्रवृत्ती आपल्याला दिसते ही होय. त्या पुढाऱ्यांचा कल साम्य-वादाकडे आहे असा ह्याचा अर्थ नाही; पण त्याबाबत नंतर बोलू. त्यांची अशी प्रवृत्ती असल्याचे कारण असे आहे की, ह्या पुढाऱ्यांना फक्त १९ व्या शतकाच्या अखेरीची व विसाव्या शतकाच्या सुरुवातीची "भांडवलशाही" म्हणजे जिला "निपुष्ट भांडवलशाही" म्हणता येईल व जी साम्राज्यशाहीच्या विस्ताराबरोबरच उत्कर्षाच्या कळसाला पोहोचली ती भांडवलशाही फक्त माहीत आहे. तेव्हा "भांडवलशाही" हा शब्द त्यांच्या मनात अप्रीती निर्माण करणाऱ्या शोषणपरंपरेशी संबंधित असावा व "समाजवाद" हा शब्द भावी आदर्श समाजाचा सूचक असावा यात नवल नाही.

राजकीय आणि आर्थिक असंतोष

साम्राज्यवादी देशांना अपूर्णविकसित देशांत प्रभावी अर्थव्यवस्था उभार-ण्यात अपयश आले. पण त्याहीपेक्षा त्यांचे महत्त्वाचे अपयश म्हणजे वसाहतीतील प्रजेशी परस्परआदर्शावर अधिष्ठित असलेले राजकीय व मानसिक संबंध त्यांना प्रस्थापित करता आले नाहीत हे होय. ज्यामुळे एतद्देशीय प्रजा अनुलंघ्य कनिष्ठ पातळीवर राहिली, ती भयानक वर्णभेदाची भावना, खेदजनक राजकीय वर्चस्व, दारिद्र्याबद्दल जबाबदार नसतील; पण त्याबद्दल कमालीची उदासीनता दाखविण्याची पाश्चात्त्य सार्वभौम सत्ताधाऱ्यांची प्रवृत्ती या सर्व गोष्टींमुळे अपूर्णविकसित देशांतल्या जनतेच्या मनात खोल व सावकाशपणे भरून येणारी जखम शिल्लक राहिली आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्वतंत्र
क्रमांक ४०४८२० दिनांक २०१५
महान निश्चय : ४१
दिनांक २००९ नोंद क्र. ४३१/३५

अपूर्णविकसित जगातल्या देशांनी राष्ट्रवादाचा मार्ग स्वीकारला आणि शतकानुशतके अस्मिता आणि प्रतिष्ठा यांपासून वंचित ठेवण्यात आले असल्यामुळे त्यांच्या राष्ट्रवादी भावनांनी उग्र स्वरूप धारण केले हा देखील राजकीय व मानसिक अधिक्षेपाचा परिणाम म्हणता येईल. राष्ट्रवादाचे (मानसिक) आकर्षण एवढे का असते यावर पुरा प्रकाश अद्यापि पडला नाही; पण भावनात्मक प्रतिसाद मिळविण्याचे राष्ट्रवादाचे सामर्थ्य निर्विवाद आहे. आपण भारतीय अथवा नायजेरियन अथवा लेबॅनिज अथवा ब्राझीलियन आहो ही भावना, विशेषतः राजकीय दृष्ट्या जागृत असलेल्या वर्गात पाश्चिमात्यांच्या तुलनेने फार खोल व उत्कट असल्याचे दिसते, आणि आपण अधिकारहीन वंशातील आहोत या अतिप्राथमिक व अतितीव्र जाणिवेत रुतून बसल्यामुळे राष्ट्रवादाला अधिकच धार चढते.

दि. क्र. १५९७०

विकासाच्या कठीण व परंपराविन्मुख अनुभवातून जाण्यासाठी लोकांना प्रवृत्त करता करता.....त्यांना एकात्म करण्याकरिता राष्ट्रवादी व वांशिक भावनांचा फार उपयोग होतो, कदाचित त्यांना एकत्र आणणारी ती एकच गोष्ट असेल, हे आपल्याला दिसेलच. पण पुढाऱ्यांचा दृष्टीने विचार करता अतिराष्ट्रवादाला दुसराही एक अर्थ आहे. गौरवर्णीयांच्या उद्धट मनोवृत्तीची ज्यांना तिडीक येते अशा स्वाभिमानी स्त्री-पुरुषांची अतिभावनाविवशता, कदाचित ती तर्कसंगत नसेल, त्यात व्यक्त होते. विकासशील देशांच्या राजकीय प्रवाहांच्या केंद्रस्थानी वांशिक अन्यायाची जाणीव आहे असे म्हणणे ही दिशाभूल होईल; पण पाश्चात्त्यांच्या आणि विशेषतः युनायटेड स्टेट्सच्या म्हणजे त्यातील अतिशय प्राथमिकावस्थेतील पाश्चात्त्य देशांच्या गौरवर्णीयांचे वर्चस्व मानणाऱ्या देशाविरुद्ध एकत्र करण्याची शक्ती असलेल्या त्या भावनेची दखल न घेणे तेवढेच मूर्खपणाचे होईल.

आकांक्षांचे केंद्रस्थान

आर्थिक विकासाच्या ह्या कटुताजनक पार्श्वभूमीचे समालोचन केले तरच आताच ज्याची सुरुवात होऊ लागली आहे त्या महान आंदोलनाकडे पाहण्याची योग्य दृष्टी आपल्याला येईल. ऐतिहासिक घडामोडींच्या ह्या संक्षिप्त आढाव्यांचा शेवटचा भाग आता आपण समजून घेतला तो हा की, आपला विकास करून घेण्याचा महान निश्चय मागासलेल्या देशांनी केलेला आहे.

वसाहतवादाची व साम्राज्यवादाची बंधने आता तोडण्यात आली आहेत आणि ती फेकून दिली जात आहेत. राष्ट्रवादी भावनेची लाट, तीव्रतेने जाणवणाऱ्या राष्ट्रीय व वांशिक अस्मितेची व स्वाभिमानाची लाट, आतापर्यंत पाश्चात्त्य इतिहासाची कृतिहीन पार्श्वभूमी असलेल्या महान भूखंडावर पसरली आहे.

नवोदित कल्पनांच्या व आकांक्षांच्या प्रभावाबद्दल स्वप्नरंजन करणे मूर्खपणाचे होईल. खेडूत व नागरी जनता यांना झालेली विसाव्या शतकात मध्यकाळ आल्याची जाणीव दोबळच आहे. तिला अभिव्यक्ती प्राप्त झालीच तर विकासशील देशांचे वैशिष्ट्य, म्हणून जिचा आपण उल्लेख केला त्या तीव्र राष्ट्रवादी भावनेतच होईल. राजकीय स्वातंत्र्यापासून आर्थिक विकास भिन्न केला तर आर्थिक विकासाची मशाल हाती घेण्यास गरीब लोक पुढे होणार नाहीत; तर राजकीय पुढारी, सैन्यातील अधिकारी व बुद्धिजीवी या वर्गातील निवडक लोकच पुढे येतील. त्यांच्यांत विकासाची ऊर्मी सर्वांत अधिक असते. कारण त्या धुरीणांना त्यांच्या अशिक्षित अथवा अर्धशिक्षित देशबांधवांपेक्षा अधिक विशाल दृष्टिकोण असतो व त्यामुळे त्यांना हे समजते की, गतकालाच्या आर्थिक शृंखला पार तोडल्या व भविष्यकाळासाठी सर्वव्यापी आर्थिक प्रयत्न केले तरच आपल्याला देशाची वर्तमान स्थिती सुधारता येईल. सर रॉबर्ट जॅकसन यांनी लिहिल्याप्रमाणे या पुढाऱ्यांना विकास ही राष्ट्रीयत्वाची कसोटी, राजकीय आशांचा पुरावा, आधुनिक राष्ट्रसमूहात मान्यता मिळवून देणारी निशाणी आहे असे वाटते. वसाहतकालीन पारतंत्र्यातून सार्वभौम स्वातंत्र्याकडे वाटचाल करीत असलेल्या सर्व राष्ट्रांत तीच मूलगामी राजकीय समस्या ठरली आहे.

वरील मुद्द्यांवर भर दिला पाहिजे. कारण विकासप्रक्रियेच्या प्रारंभीची अत्यंत खालची पातळी घनगर, सरळमार्गी खेडूत व वाळवंटातील भटके यांचा स्वाभिमान आणि आत्मप्रतिष्ठा आणि गिरणीतील अथवा खाणीतील कामगार झाल्यामुळे ह्या लोकांच्या वाट्याला येणारी दुर्दशा वा अहवेलना ह्या सर्वांचा विचार मनात येऊन अनेक लोकांना असे वाटू लागते की, विकासाचा मार्ग कशाला धरावयाचा ? जुनाच जीवनमार्ग पक्का करणे अथवा त्यात सुधारणा करणे हे बरे नाही का ?

सामान्यतः हा प्रश्न विचारण्यात एक भावनात्मकता असते, कारण ज्याचे चित्रण केले जाते ते गतकालीन वैभव पुनः प्राप्त होऊ शकत नाही असे जवळून दर्शन घेऊ गेल्यास समजते; पण आर्थिक विकासमार्ग स्वीकारण्यास याहून अनिवार्य अशी कारणे आहेत. आपण त्यातील पहिल्याची नोंद केलीच आहे. ते म्हणजे पाश्चात्त्य वैद्यकामुळे लोकसंख्या व उत्पादकता यांचा सनातन समतोल विस्कटला असून त्यामुळे परिस्थिती स्थिर न राहता कमालीची बिघडणार आहे हे भीषण भवितव्य प्रत्येक मागासलेल्या देशापुढे आ वासून उभे आहे, हे सत्य होय. उग्र होत चाललेल्या व चिरडू पाहणाऱ्या लोकसंख्याबाढीला प्लेग व संपूर्ण विनाश नको असल्यास औद्योगिक उत्पन्नाच्या नव्या पातळीवर नेणारी चढण द्रुतगतीने चढणे याशिवाय दुसरा मार्ग नाही.

पण दुसरेही एक कारण आहे. साम्राज्यशाहीच्या दडपणाखाली दीर्घकाल उमेदवारी केल्यामुळे दोन महायुद्धांतील उत्पातकारी बदलामुळे व हानीमुळे क्रांतिकारक कल्पनांना हळूहळू शिरकाव होत असल्यामुळे (केवळ रशियन क्रांतीतून नव्हे तर फ्रेंच व अमेरिकन क्रांतीतून उदयास आलेल्या कल्पना) आजपर्यंत अपेक्षित असलेल्या राष्ट्राच्या दृष्टिकोणात अपरिवर्तनीय स्वरूपाचा रासायनिक बदल झालेला आहे. बदल करण्याची प्रेरणा, गतकालाकडे पाठ फिरविण्याची प्रवृत्ती, वर्तमान परिस्थितीबाबत घृणा, यांनी मागासलेल्या प्रदेशात मूलभूत मानवी प्रवृत्तीत परिवर्तन घडवून आणले आहे. या नव्या भावनांना नवोदित राष्ट्रीय सरकारात जशजशी अभिव्यक्ती प्राप्त होते तसतशी त्यांची परिपूर्ती आर्थिक विकासात, त्यातील भीतिदायक कष्ट व ताण यांना न जुमानता त्यातील आकर्षक अशा फायद्याकडे व आशास्थानांकडे पाहून, शोधू पाहतात.

ही निवड संक्रमणकाळातील कष्टांना कितीही कमी लेखणारी व आर्थिक विकासातील फायद्याबाबत कितीही अतिशयोक्ती करणारी असली तरीही निर्विवादपणे योग्य अशीच आहे. औद्योगीकरणाचा मार्ग चोखाळताना अपूर्णविकसित प्रदेशांना त्यांनी पूर्वी कधीही अनुभवली नसेल अशी दुर्दशा व अव्यवस्था कदाचित अनुभवावी लागेल. औद्योगीकरणामुळे पुढाऱ्यांवर आणि लोकांवर निराशेचा आणि कष्टाचा एवढा बोजा पडेल की, त्यांना कालदृष्ट्या लांब गेल्यामुळे सौम्य झालेला भूतकाळ भविष्यकाळापेक्षा अधिक

आकर्षक वाटू लागेल आणि विकासाची दीर्घ वाटचाल निरर्थक आणि निराशामय भासेल हे जवळजवळ निश्चितच. तरीही अपूर्ण विकसनाची आजची वस्तुस्थिती लक्षात घेता आणि लोकसंख्येच्या जबरदस्त प्रवाहामुळे निष्ठुर उपाय न योजिल्यास परिस्थिती अधिकच बिकट होईल. हेही पाहता विकासाचा जो निर्णय घेतला गेला त्याला विरोध होणे शक्य नाही. कारण दीर्घकाल घेणाऱ्या आर्थिक जीवनाचा, आमूलाग्र पुनर्घटनेशिवाय जगातील बहुसंख्य लोकांच्या भुकेच्या प्रश्नाचे शमन करणारा दुसरा तोडगा, त्यांच्या खोपट्यांना दुसरा पर्याय, किंवा त्यांच्या हालाखीवर दुसरा उपाय नाही.

येथे प्रश्न उपस्थित होतो की, आकांक्षांची पूर्ती होईल काय, महान आरोहण यशस्वी होईल काय ?

● ●

५

विकासाचे गतिशास्त्र

मागासलेपणाला कारणीभूत होणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय कारणांवर आपण लक्ष केंद्रित केले. आपल्या आढाव्यात आर्थिक विकास ज्या मानसिक प्रवृत्तीच्या आधारावर व्हावयाचा त्या प्रवृत्ती, विकासातील अडचणी, स्वाभाविक विरोध यांवर आपल्या आढाव्यात भर दिला आहे. पण आत्तापर्यंत आर्थिकवाढीच्या क्रियाकल्पाची म्हणजेच गरीब देश कसा श्रीमान होतो याची चर्चा केली नाही. विकासाला आवश्यक अशा राजकीय व सामाजिक गोष्टींबाबत आपण कितीही व काहीही म्हटले–आणि पुनः ते म्हणावे लागेलच–तरीही महान आरोहणाच्या शक्याशक्यतेबद्दल आडाखे बांधावयाचे झाल्यास त्यातील आर्थिक भागाचे स्वरूप आपण समजावून घेतलेच पाहिजे.

त्यासाठी आपल्याला दोन प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. आर्थिक विकास शक्य आहे का हा पहिला प्रश्न. म्हणजे कमी उत्पादकता, भांडवलाचा अभाव, लोकसंख्येचे दडपण इत्यादींनी युक्त अशी प्रारंभावस्था–थोडक्यात म्हणजे विकासाच्या समीकरणातील सर्व परिवर्तनीय घटक लक्षात घेता विकासेच्छू देशांतील उत्पादन व उत्पन्ने यांचे आशादायक आर्थिक भवितव्य वर्तविणे शक्य आहे काय?

दुसरा प्रश्न हा की विकास शक्य असो वा नसो, कोणताही देश आर्थिक उन्नतीचा प्रयत्न कसा करतो? सामुदायिक राष्ट्रीय प्रयत्नात कोणत्या आर्थिक शक्तींचा उपयोग केला जातो, त्या प्रयत्नांच्या ओघात व त्यांना जोड म्हणून कोणते बदल आवश्यक आहेत? थोडक्यात म्हणजे आपल्या स्वतःच्याच प्रयत्नांनी देश वर कसा येतो?

अपूर्णविकसनाच्या निव्वळ आर्थिक बाजूबद्दल आपण जे आत्तापर्यंत शिकलो, त्यावरून आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा गाभा कशात आहे ते आपल्याला समजलेच आहे. अल्प असलेल्या उत्पादनक्षमतेत वाढ करणे यात तो आहे; कारण प्रत्येक मागासलेल्या प्रदेशातल्या दारिद्र्याचे ते सर्वप्रथम कारण असते. मागासलेल्या देशांत दिसून येणारा सार्वत्रिक भांडवलाचा अभाव अल्प उत्पादनक्षमतेला प्रामुख्याने जबाबदार आहे हे आपण पाहिले. तेव्हा अशा देशाला आर्थिक प्रगती करावयाची असेल, त्याला धनोत्पादन वाढवावयाचे असेल तर त्याचे पहिले आर्थिक कर्तव्य भांडवलवृद्धी हे आहे हे स्पष्ट आहे. फक्त हात व वाकलेल्या पाठी यांच्या अल्प उत्पादकतेला यंत्रे, विद्युत्शक्ती, दळणवळणाची साधने, विविध प्रकारची औद्योगिक उपकरणे यांची जोड दिली पाहिजे.

तीव्रतेने वाढत असलेला भांडवलसंचय करण्यास मागासलेला देश सुरुवात कशी करतो ? या प्रश्नाचे मागासलेल्या देशातील उत्तर प्रगत देशात जे आहे त्यापेक्षा भिन्न नाही. प्रत्येक समाजात बचतीतून भांडवलनिर्मिती होते. याचा अर्थ केवळ बँकेत पैसा ठेवणे असा नाही. त्याचा अर्थ अर्थशास्त्रात जो आहे तो म्हणजे खऱ्या अर्थाने बचत हा आहे. त्याचा समाजाने आपल्या गरजा, मग त्या कितीही तीव्र असोत, भागविण्यासाठी आपल्या सर्वच्या सर्व विद्यमान साधनांचा व उत्पादनशक्तीचा उपयोग करण्यापासून परावृत्त होणे हा आहे. समाजाने आपल्या श्रमरूप व वस्तुरूप साधनधनाचा काही भाग वर्तमानाची तरतूद करण्यासाठी न करता, वापरता भविष्यकाळाच्या तयारीसाठी राखून ठेवणे या कृतीला बचत म्हणतात. अर्थशास्त्राच्या भाषेत असे सांगता येईल की, उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनातून श्रम व वस्तुसामग्री मोकळी करून भांडवल-वस्तूंच्या उत्पादनासाठी तो वापरणे म्हणजेच बचत होय.

उत्पादकशक्तीची वर्तमान उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनातून सोडवणूक करून तिला भविष्यकाळासाठी मोकळी करणे ही श्रीमान देशाला महान समस्या वाटत नाही. पण दारिद्र्याने गांजलेल्या देशाचा प्रश्न अगदी भिन्न असतो. उपासमार होत असलेल्या देशाने जीवनावश्यक अर्थोद्योगापासून दूर कसे राहावयाचे ? पोट भरण्यासाठी ज्या देशातील ऐंशी टक्के लोकांना जमिनीवर

रावावे लागते, त्या देशाने आपल्या उत्पादकशक्तीचा ओघ धरणे, रस्ते, घरे, लोहमार्ग, कारखाने–भविष्यकाळात या गोष्टी कितीही अनिवार्य असल्या तरी आज त्यांचा पोट भरण्यासाठी उपयोग होत नसल्यास–यांचा बांधकामाच्या दिशेने कसा करावा? अपार कष्ट करून आपल्या जमिनीच्या तुकड्याची मशागत करणारा शेतकरी मूर्तिमंत मागासलेपणा असेल, पण निदान स्वतःला जिवंत राहता येईल, एवढा तरी तांदूळ तो पिकवतो. पण तो भांडवलनिर्मिती करू लागल्यास म्हणजे धरण किंवा कालवा बांधू लागल्यास त्याला अन्न कोण पुरवील? अतिरिक्त उत्पादन नसेलच तर ते कोठून वाचवले जाईल?

थोडक्यात सांगायचे तर बहुतेक अपूर्ण विकसित देशांपुढील ही मूलभूत समस्या आहे आणि वरवर पाहता ती सुटेल अशी आशा वाटत नाही. पण आपण अधिक खोल जाऊन पाहिले तर परिस्थिती दिसते तेवढी हतप्रभ करणारी नाही असे आढळून येईल. कारण जमिनीची लागवड करणारे बहुसंख्य शेतकरी स्वतःपुरतेच अन्न मिळवतात असेच केवळ नाही. उलट ते स्वतःच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांची लूट करीत असतात. बहुतेक मागासलेल्या प्रदेशात, आपण आधीच पाहिल्याप्रमाणे शेतकऱ्यांची जमिनीवर गर्दी झाल्यामुळे शेतीची उत्पादनक्षमता प्रगत देशांच्या मानाने फारच कमी झाली आहे. आपल्याला आठवत असेलच की, भारतातले एक हेक्टर जमिनीतील उत्पादन युनायटेड स्टेट्समधील उत्पन्नाच्या एक-तृतीयांश आहे. सध्या शेतीत राबगाऱ्यांची संख्या कमी झाली तरी पीक तेवढेच येईल. कदाचित जास्तच येईल या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष होण्यास सध्याची मोठी संख्या कारणीभूत होते. एका निरीक्षकाने लिहिलेच आहे की, एका अमेरिकन महाविद्यालयाने कैरोजवळ केलेल्या प्रयोगात असे आढळून आले की, हल्लीएवढे अथवा जवळजवळ तेवढेच पीक, इंजिनमधील हल्लीच्या सुमारे अर्धा ग्रामीण श्रमिकवर्ग काढू शकेल. हे उदाहरण आत्यंतिक असेल, पण काही अंशाने हे जवळजवळ प्रत्येक मागासलेल्या देशाला लागू पडते. १५ ते ३० टक्के ग्रामीण लोकांचा अपूर्णविकसित अर्थव्यवस्थेतील उत्पादनाला लागणारा हातभार शून्य आहे असा स्थूल अंदाज आहे. जे थोडे पीक ते काढतात त्याने दुसऱ्या कोणाचे तरी नुकसान होते.

खेडुतांचा प्रश्न

आता आपल्याला मागासलेल्या देशातील यक्ष प्रश्नाचे उत्तर मिळू लागले. या सर्व समाजात लुपा असा अतिरिक्त श्रमिकवर्ग आहे की, जो जमिनीवरून काढून घेतल्यास भांडवलउभारणीसाठी वापरता येईल. ते भांडवल विशेष प्रकारचे आणि अल्पमोली असेल–म्हणजे मुख्यतः श्रम वापरून व वस्तुधनाचा फारसा उपयोग न करता पार पाडता येणाऱ्या मोठ्या प्रकल्पांच्या, उदाहरणार्थ, रस्ते, धरणे, लोहमार्गाचे बांध, मोठ्या इमारती, पाटबंधारे, गटारे या स्वरूपाचे असेल. ते भांडवल कितीही अल्पमोली असले तरी 'समाजिक भांडवला'चे हे खालचे खांब गुंतागुंतीच्या औद्योगिक भांडवलासाठी म्हणजे यंत्रे किंवा मालाची उसाभर करणारी उपकरणे इत्यादींना पक्का आधार देण्यासाठी आवश्यक आहेत. बिनकिफायतशीर अर्थोद्योगातून मुक्त झालेले किसानांचे हे श्रम भांडवलाच्या कमतरतेच्या प्रश्नावर पहिला मोक्याचा व महत्त्वाचा हल्ला करू शकतात.

याचा अर्थ असा नव्हे की, ग्रामीण लोकसंख्येचा लोंढा शब्दशः शहरात म्हणजे जेथे आधीच पचवता न येणारी भीषण स्वरूपाची बेकारी आहे तेथे लोटावयाचा. याचा अर्थ एवढाच की, शेतीच्या अकार्यक्षम प्रमाणात श्रमाचे व ते करणाऱ्या श्रमिकांच्या अन्नाचे भांडार दडलेले आहे. जमिनीवर लागवड करणारांची संख्या कमी करून मागासलेला समाज रस्ते, धरणे वगैरे बांधकामासाठी वापरता येईल, असे श्रमिकदल निर्माण करू शकेल आणि भांडवल-निर्मितीसाठी झालेल्या व्यवसायानंतरचा परिणाम शेतकीउत्पादन कमी होण्यात होणार नाही.

विकासाच्या आर्थिक बाजूच्या केंद्रस्थानी हा असाधारण हातचलाखीचा खेळ आढळतो. पण ही केवळ आर्थिक चलाखी नव्हे. विकासाच्या सामाजिक गाभ्याशी निगडित असलेल्या आणखी एका प्रकियेशी त्याचा घनिष्ठ संबंध आहे. भूमिविषयक सुधारणा ही ती प्रक्रिया. जिवंत समाजात, सरळ जाऊन माणसांची हालबाहलव करता येत नाही. भूमिधारणा, कूळ-मालक व कूळ-सावकार यांचे संबंध याबाबत खोलवर गेलेल्या आणि कायदा व समाज यांची मान्यता असलेल्या प्रथा त्यापूर्वी मोडून काढल्या पाहिजेत. जुन्या रचनेतील हक्कसंबंध जमीनमालकांचा निकराचा विरोध दूर करून बाजूस सारले पाहिजेत.

आर्थिक विकासाचे गतिशास्त्र अशा रीतीने आपल्याला विकासाच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात तावडतोब नेऊन टाकते.

दुसरी एक फार महत्त्वाची गोष्ट आपल्याला सहज दिसेल. भूमिविषयक सुधारणा हा केवळ न्यायाचा, शेतकऱ्याला सरंजामशाही मालक आणि लुटारू सावकार यांच्या काचातून सोडवण्याचा प्रश्न नाही. तो एक कार्यप्रवण टप्पा झाला पाहिजे; ज्याची भरघोस उत्पादनासाठी शास्त्रशुद्ध लागवड करता येईल, अशी मोठी शेते निर्माण करण्याच्या प्रक्रियेतील पायरी ठरली पाहिजे. मोठ्या शेतांचे तुकडे पाडून छोटी छोटी शेते अस्तित्वात आणणे ही भूमिविषयक सुधारणा म्हणजे अपूर्णविकसित देशांच्या दृष्टीने केवळ राजकीय उपशमनमार्ग ठरतो. आर्थिकदृष्ट्या तो तुकडेमोड व अकार्यक्षम अणुविभागणीकडे नेणारा पीछेहाटीचा मार्ग आहे.

आता आपण निकडीच्या अशा आर्थिक प्रश्नाकडे पुन्हा वळून पाहू या. मागासलेला प्रदेश शेतकीउत्पादन वाढवणे व विकासाकरिता पुरेसे मनुष्यबळ मिळविणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी कसा करू शकेल हे आपण पाहिले आहे. पण आपण ज्याचा ऊहापोह केला ती बचत-उपभोग्य वस्तूंची मुक्तता कोठे आहे ? येथे आपण भांडवल-निर्मितीच्या प्रक्रियेतील दुसऱ्या टप्प्याकडे येतो. मोठ्या शेतांच्या निर्मितीने जेव्हा शेतीचे उत्पादन वाढते—अथवा सध्याच्या शेतावर सुधारलेले उत्पादनतंत्र वापरून वाढते, तेव्हा त्यातील काही पिकांची बचत केली पाहिजे.

निराळ्या शब्दांत सांगावयाचे तर कृषिव्यवसायात राहणारा शेतकरी अधिक उत्पादनक्षम होईल, पण आपल्या वाढत्या उत्पादनक्षमतेचा उपयोग करून वाढलेले पीक त्याला स्वतःच्या उपभोगासाठी वापरता येणार नाही. त्याऐवजी व्यक्तिगत उत्पादनातील वाढावा शेतीतून बाहेर काढावा लागेल. नशिबवान शेतकऱ्याला लाभलेले वाढीव पीक त्याने वाचवले पाहिजे आणि ते त्याच्या पूर्वीच्या अनुत्पादक नातेवाइकांत (भाचे, पुतणे, मुले, मुली) म्हणजे जे आता भांडवल-उभारणी प्रकल्पात काम करीत आहेत त्यांत वाटले पाहिजे.

भुकेलेला शेतकरी हे स्वखुषीने करील अशी अपेक्षा नाही. विविध प्रकारचे कर आकारून अथवा सक्तीचे हस्तांतर घडवून आणून अपूर्णविकसित देशांतील

सरकारने धान्याच्या या अत्यावश्यक पुनर्विभाजनाची व्यवस्था केली पाहिजे. विकासाच्या यशस्वी कार्यक्रमातील पहिल्या अवस्थांत शेतकऱ्याच्या अन्नसेवनात दृश्य अशी वाढ, जरी त्याच्या अन्नोत्पादनात ती झाली तरी होणार नाही. दृश्य जे दिसेल ते म्हणजे नव्या उत्पादनातील काही भाग चाचवला जाईल, म्हणजेच शेतावर वापरला न जाता भांडवलउत्पादनातील कामगारासाठी त्याचा उपयोग केला जाईल हे पाहणारी, कमीअधिक कार्यक्षमतेची निष्ठुर यंत्रणा. ह्याच कारणासाठी विकास कार्यक्रमांचे यशस्वी मूल्यमापन करताना शेतकऱ्याच्या राहणीमानातील वाढ हे माप न धरण्याची आपण फार दक्षता घेतली पाहिजे. दीर्घकाळपर्यंत, बहुधा नवे भांडवलप्रकल्प फलदायक होईपर्यंत त्यात वाढ होणार नाही.

तावडतोब करावयाच्या कृतीची रूपरेषा वर दिलेली नाही हे पुन्हा सांगितले पाहिजे. आपण पाहिलेच आहे की, अनेक मागासलेल्या प्रदेशांत ग्रामीण भाग बेकारीने ग्रासला आहे आणि एका रात्रीत मोठी आणि कार्यक्षम शेती उभारण्याचा प्रयत्न सामाजिक परिस्थिती असह्य करण्यास कारणीभूत होईल. खरे म्हणजे एका रात्रीत आधुनिक कृषिक्षेत्र उभारता येईल, असा विश्वासही आपण बाळगू नये. कितीही हालाची परिस्थिती असली तरी सनातन रूढींची क्रांतिकारक पुनर्घटना शेतकरीवर्ग आनंदाने स्वीकारत नाही, किंवा आपली छोटी शेती अथवा जमिनीशी असलेला पिढ्यान्‌पिढ्यांचा संबंध सोडण्यास सहजासहजी तयार होत नाही. साम्यवादी देशांत शेतीच्या सामुदायिकीकरणाला सार्वत्रिक प्रखर विरोध झाला आहे. क्यूबा, चीन, पोलंड, युगोस्लाव्हिया सारख्या भिन्नप्रकृती देशांत शेतकऱ्यांच्या प्रवृत्ती व संस्था सुधारण्याच्या उत्साही प्रयत्नांना निकराचा प्रतिकार झालेला आहे व त्याला घातपाताचे स्वरूपही आलेले आहे. सहकारी संस्था काढण्याच्या सौम्य पद्धतीच्या प्रयत्नांनादेखील भारताप्रमाणे इतर देशांत अपुरी शैक्षणिक पार्श्वभूमी व अननुभव यांमुळे फारसे यश मिळाले नाही.

शेतीच्या परिस्थितीत महत्त्वाची सुधारणा करण्यासाठी सामाजिक बदल घडवून आणू पाहणाऱ्या विकासेच्छू सरकारांना मग ते लोकशाही असो वा हुकूमशाही असो, कठीण प्रश्नांना तोंड द्यावे लागेल. पण त्यावाचून सुटका नाही. प्रत्येक मागासलेल्या देशात विकास होण्यासाठी वाढत्या लोकसंख्येला अन्न

पुरवावयाचे असेल व भांडवलनिर्मितीसाठी मनुष्यबळ पुरवावयाचे असेल तर शेतीची उत्पादनक्षमता वाढवलीच पाहिजे. तेव्हा छोट्या शेतांचे मोठ्यात एकत्रीकरण आणि शेतकरीवर्गाच्या मोठ्या भागाचे जमिनीवरून उच्चाटन ही विकासशील देशाची गरज आहे; मग ती प्रक्रिया कितीही त्रासदायक असो. हे घडून येण्याची गती मात्र मंद राहील. ती प्रक्रिया म्हणजेच एक दीर्घकालीन परिवर्तन ठरेल, व ते अनेक वर्षे चालू राहील. आपल्याला एवढेच समजू शकले की, विकासाच्या मूलभूत प्रक्रियेत एक अंतर्गत व्यवसायांतर– जेथे मनुष्यबळ वाया जाते त्या शेतकी उपयोगातून जेथे त्याचा राष्ट्रीय प्रगतीला हातभार लागतो त्या औद्योगिक व अन्य अर्थोद्योगाकडे त्याचे जाणे– अंतर्भूत आहे.

औद्योगीकरण

मागासलेल्या समाजात सामाजिक भांडवलनिर्मितीसाठी सुप्त शक्ती कशी असते ते आपण पाहिलेच; पण भांडवलनिर्मिती म्हणजे फक्त मनुष्यबळ व अन्न मुक्त करणे नव्हे. घरणे बांधता येतील, पण धरणांकरवी प्रेरक शक्ती निर्माण करण्यास लागणारी निर्मितियंत्रे व विद्युद्वाहिका तयार करता येणार नाहीत. निराळ्या शब्दांत सांगायचे तर महान आरोहणाच्या यशाला केवळ मनुष्यबळसंचय पुरत नाही. त्यासाठी आधुनिक अर्थव्यवस्थांच्या विकासाचा अनिवार्य गाभा असलेला औद्योगिक उपकरणांचा प्रचंड संग्रह खरोखरच आवश्यक आहे.

विकासकांक्षी प्रदेशाला आपली भौतिक उन्नती कार्यक्षम कृषिव्यवस्थेच्या पुढल्या अवस्थेत न्यावयाची असेल तर त्याला औद्योगिक उपकरणांचा संच कधी ना कधी उभा करावाच लागेल. यांत्रिक अवजारे, लेथ, सर्व प्रकारची विशेषीकृत यंत्रसामग्री ज्यात आहे असा संच. पण येथे एक नवी अडचण येते. कारण धरण, कालवे, साधी घरे यांना आधीचे भांडवल लागत नाही; पण औद्योगिक उपकरणांसाठी ते लागते. रस्ते व धरणे वगैरे विशिष्ट मार्यादेपर्यंत प्राथमिक अवजारांचे साहाय्य असलेल्या मनुष्यबळाचा उपयोग करून बांधता येतात. पण लेथ व माग, शक्तिकेंद्रे आणि यांत्रिक कारखाने तशी बांधता येत नाहीत. त्यासाठी लागणारी यंत्रे व उपकरणे बनवण्यासाठी यंत्रे व

उपकरणेच लागतात. येथे असे एक कधीच न संपणारे वर्तुळ दिसते की, ज्याच्या आत अपूर्णविकसित प्रदेशाला प्रवेश करता येत नाही.

खरे म्हणजे ते वर्तुळ नसून वरवर जाणारे चक्र (Spiral) आहे. कारण फार प्राचीन काळात पहिली यंत्रे, प्राथमिक हस्तोपयोग तंत्राचा वापर करूनच बनवण्यात आली होती. मागासलेल्या देशांना वेळ असता तर त्यांनीही पाश्चिमात्यांनी प्रथम केले त्याप्रमाणे हस्तव्यवसायाच्या मंद गतीने औद्योगिक भांडवल उभारले असते. पण विकासाच्या शर्यतीत वेळेचाच काय तो मुख्यतः अभाव आहे. तेव्हा सामाजिक भांडवल निर्माण करणाऱ्या सार्वजनिक बांधकामात औद्योगिक भांडवलाची भर टाकावयाची असेल तर ती द्रुतगतीने टाकण्याचा मार्ग अपूर्ण विकसित प्रदेशांनी शोधून काढला पाहिजे.

तो मार्ग कोणता? काही अंशी ही महत्त्वाची उपकरणे विकासकांक्षी देशातील कारखानदारीला बनवता येतील. कारण अतिरानटी प्रदेशांतच कारखाने अथवा औद्योगिक उत्पादनशक्ती अजिबात नसेल. पण तेथे तयार करता येणारा साधनसंच एकूणाचा फार छोटा भाग ठरेल. अपूर्ण-विकसित प्रदेशांतील त्यांतल्या त्यात प्रगत झालेल्या कित्येक देशांना अनेक अवजारे व उपकरणे बनवणे आपल्या तांत्रिक सामर्थ्यापलीकडे वाटेल आणि सातत्याने व द्रुतगतीने वरची चढण चढण्यासाठी लागणारे औद्योगिक भांडवल निर्माण करण्याचे सामर्थ्य कोणत्याही अपूर्णविकसित देशात दूरत्वाने देखील नाही.

म्हणूनच अपूर्णविकसनाच्या समस्येचे उत्तर त्या देशाच्या अर्थव्यवस्थांत आढळणार नाही. औद्योगीकरणाच्या पहिल्या अवस्थेत, यंत्रनिर्माण-दोषाचा गाभा तयार होईपर्यंतच्या काळांत, औद्योगिक भांडवलाची मुळे बाहेरून मिळवावी लागतील. त्यातील काही अपूर्णविकसित देश आपला उपभोग न घेता बचत केलेल्या उत्पादनाचा उपयोग करून म्हणजे कच्च्या मालाच्या अथवा हस्तोद्योग वस्तूंच्या रूपाने त्यांची निर्यात करून विकत घेऊ शकतील. काही पश्चिमेकडील उद्योगसंस्था व व्यक्ती यांनी गुंतवलेल्या खाजगी भांडवलाचा परिणाम म्हणून प्राप्त होऊ शकेल आणि काही परदेशी मदतीच्या म्हणजे प्रगत देशांनी दिलेल्या देणग्यांच्या व कर्जाच्या रूपाने मिळू शकेल.

या ठिकाणी प्रथमच आपण अपूर्णविकसित देश व त्याचे विकसित जगातले शेजारी यांच्यातल्या परस्परसंबंधाच्या अतिमहत्त्वाच्या प्रश्नाकडे येतो. त्याकडे आपण लवकरच पुन्हा वळू. पण तत्पूर्वी या संबंधाचा यथार्थ स्वरूपाचा थोडा विचार करणे उचित होईल. औद्योगीकरणाची गती सर्वांशी नसली तरी बहुतांशी बाहेरून मिळणाऱ्या भांडवली मालावर अवलंबून राहील हे उघड आहे. मग तो व्यापारमार्गे मिळो, गुंतवण म्हणून मिळो अथवा मदत म्हणून मिळो. पण औद्योगीकरण हा देखील विकासाच्या एकूण प्रक्रियेतील एक टप्पा आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. आधारभूत सामाजिक भांडवल निर्माण करण्यापूर्वी, काही प्रमाणात तरी शेतीसुधारणा होण्यापूर्वी अथवा सामाजिक प्रवृत्तीत दृश्य बदल होण्यापूर्वी, औद्योगिक क्षेत्र अस्तित्वात आले तर अविकसित शेतकरी समाजाने वेढलेला एक छोटा भाग निर्माण झाला आहे एवढाच त्याचा परिणाम दिसून येईल. भारतातल्या दामोदर खोरे किंवा कटांगातले यूनियन मिलिएर्स हे प्रदेश खरे म्हणजे असेच आहेत. औद्योगिक क्षेत्राची पाळेमुळे खोल जायला हवी असतील आणि संपूर्ण समाजावर व्यापक प्रमाणावर त्याचा आर्थिक व सामाजिक प्रभाव पडावयाचा असेल तर केवळ औद्योगिक यंत्रसामग्री व साधनसंच आणून भागणार नाही. त्याचे आरोपण त्याचा स्वीकार करण्यास निदान अंशतः तरी तयार असलेल्या भूमीत झाले पाहिजे. औद्योगीकरण हा विकासाच्या यशस्वी प्रयत्नांना फुटलेला अंकुर असल्याचे दिसून येईल. त्याच न्यायाने, औद्योगिक उत्पादनाची वाढ शेतकी उत्पादनाच्या व ज्यांचे मापन करणे सोपे नाही त्या कौशल्यांच्या व प्रवृत्तीच्या संदर्भात न झाले तरी ती महान आरोहणाचा प्रगतीचे पुरेसे दर्शन घडवणार नाही.

संपूर्ण-दर्शन उड्डाणकाळ (प्रस्थान)

आपल्या आत्तापर्यंतच्या पाहणीचा आपण आता सामग्र्याने विचार करू या. आपण क्षणभर असे समजू की, अपूर्ण विकसित देशात शेतीत बदल होण्यास सुरुवात झाली आहे, सामाजिक चालीरीतीत मंदपणे परिवर्तन होऊ लागले आहे, आणि स्वतःच्या निर्यातीचा मोबदला म्हणून किंवा खाजगी भांडवल गुंतवणूक म्हणून अथवा आंतरराष्ट्रीय मदत म्हणून औद्योगिक भांडवलाच ओघ वळवण्यात यश लाभू लागले आहे. असा देश सातत्याने आर्थिक

विस्तार करून, कालांतराने दारिद्र्यातून बाहेर पडून, मर्यादित सुस्थितीच्या पहिल्या अवस्थेत प्रवेश करील असे भविष्य आपण वर्तवू शकू काय ? रोस्टाव यांचा सुपरिचित शब्दप्रयोग वापरावयाचा झाला तर असा देश "प्रस्थान रेषेपर्यंत" म्हणजे जेथून भांडवलाची वाढ स्वयंप्रेरित उत्पादनवाढ शक्य करते त्या रेषेपर्यंत पोचण्याएवढी भांडवलनिर्मितीची गती त्या देशात दिसेल असे आपण सिद्ध करू शकू काय ?

अर्थशास्त्रज्ञाला या प्रश्नाचे निरपवाद असे उत्तर कोणत्याही विशिष्ट देशासंबंधी देता येणार नाही. पण विकासकोष्टकातील मुख्य भाग वेगळे काढून आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत परिवर्तनीय घटक परस्परांवर कसा परिणाम करतात हे आपल्याला पाहता येईल.

(१) अपूर्णविकसित देशाला साध्य होणारे भांडवलगुंतवण-प्रमाण :

चालू उत्पादनप्रयत्नाचा किती भाग एखादा देश प्रथम प्रामुख्याने सामाजिक भांडवलाच्या व नंतर औद्योगिक भांडवलाच्या निर्मितीसाठी देऊ शकेल, त्यावर हे अवलंबून राहील हे आपण पाहिले. जेवढी बचत अधिक-अर्थात केवळ गोळा केलेली बचत नसून भांडवली प्रकल्पावर खर्च पडणारी-तेवढी "प्रस्थान क्रिया" अधिक शक्य हे स्पष्ट आहे. त्याखेरीज जरी तिचा उगम अंतर्गत नसला तरी, परकी मदत ही विकासशील देशांतील भांडवल गुंतवणीचा भाग मानावयास हरकत नाही.

(२) नव्या भांडवलाची उत्पादनक्षमता :

नव्या भांडवलात परिवर्तित होणाऱ्या बचतीने शेवटी उत्पादनवाढ होते. पण सर्व भांडवल उत्पादनात सारखी वाढ घडवून आणीत नाही. दशलक्ष डॉलरचा पोलादाचा कारखाना आणि एक लक्ष डॉलरची घरबांधणी यांचा उत्पादनावर परिणाम सारखा नसतो. भांडवलाची उत्पादनक्षमता जेवढी अधिक तेवढा प्रस्थानकाळ नजीक हे सहज कळेल. तरी पण "अल्प फलदायी" भांडवलगुंतवण, उदाहरणार्थ शिक्षणातील "बहुफलदायी" भांडवल गुंतवणीकडे-उदाहरणार्थ आधुनिक कारखाना-जाण्यासाठी आवश्यक आहे.

(३) लोकसंख्या :

हा समीकरणातील ऋणात्मक घटक आहे. प्रगती स्वयंप्रेरित व्हावयाची असेल तर लोकसंख्यावाढीमुळे प्रगती क्षीण होऊ नये ह्यासाठी उत्पादनात जलद गतीने वाढ झाली पाहिजे. नाहीतर दरमाणशी उत्पादन, विकासाचा दृश्य वेग मोठा असला तरी तेवढेच राहील अथवा कमी होईल.

हा आर्थिक विकासाचा "कठोर नियम" म्हणता येईल. जोपर्यंत एकंदर बचत आणि त्या बचतीपासून प्राप्त होणारे फळ ही लोकसंख्यावाढीपेक्षा उत्पादनवाढ अधिक होण्यास कारणीभूत होत आहेत तोपर्यंत वाढता आर्थिक विकास होत राहील. दर वर्षी मागील वर्षापेक्षा उत्पादन अधिक असेल, आणि हे वाढलेले उत्पादन पुढील वर्षात वाढते फल देत राहील. सुरुवातीला लहान दिसणारी वाढ या प्रकारे कालांतराने भरघोस वाढ घडवून आणील–ज्या न्यायाने लहान रक्कम अल्प व्याजाच्या दराने पण चक्रवाढव्याजपद्धतीने काही वर्षांनंतर मोठी रक्कम होते त्याच न्यायाने.

उलट, एकूण बचत अल्प असेल, अथवा ती ज्यात गुंतवली आहे त्या भांडवली प्रकल्पाची उत्पादनक्षमता कमी असेल आणि त्यामुळे वाढलेला उत्पादन वाढलेल्या लोकसंख्येच्या तुलनेने कमी पडत असेल तर त्याचा परिणाम प्रगती कुंठित होण्यात अगर प्रगतिचक्र मागे फिरण्यात होईल. प्रगतीचा अभाव, समीकरणातील एखाद्या परिवर्तनीय घटकात बदल होईपर्यंत, म्हणजे बचत वाढेपर्यंत, अथवा भांडवलगुंतवणाची उत्पादकता वाढेपर्यंत अथवा लोकसंख्यावाढीचा वेग कमी होईपर्यंत कायम राहील.

अर्थशास्त्रीय तत्त्वमीमांसा याप्रमाणे महान आरोहणावर तर्कशुद्ध प्रकाश टाकते; किंवा असेही म्हणता येईल की, प्रगत देशात विकास का व कसा झाला याचा खुलासा करते. त्यात आपल्याला आर्थिक विकासाच्या महान राजकारणातील महत्त्वाच्या परिवर्तनीय घटकांचे दर्शन घडते. त्यामुळे अतिशय गुंतागुंतीच्या प्रश्नाचा विचार, कार्यकारणभावाच्या बऱ्याच सुस्पष्ट चौकटीत बसवण्यास आपल्याला मदत होते. विकासाच्या मीमांसेस ज्या दोन प्रश्नांच्या उल्लेखाने आपण सुरुवात केली, त्याकडे पुन्हा वळल्यास असे दिसेल की, आपल्याला केवळ अपूर्णविकसित देशाला विकास करणे शक्य आहे. हेच न समजता तो शक्य करणारे गतिशास्त्र देखील समजते.

तरीपण काही सूचनांची आवश्यकता आहे. या विवेचनात ही गोष्ट लक्षात आणण्याची सावधगिरी घेतली आहे की, आर्थिक विकास म्हणजे केवळ संख्यात्मक उत्पादन नव्हे आणि संख्येच्या भाषेत तो मोजताही येणार नाही. विकासाचे केवळ आर्थिक विश्लेषण हे महान आरोहणासाठी पुरेसे नसले तरी आवश्यक म्हणता येईल, अशी परिस्थिती कोणती हेच जास्तीत जास्त दर्शवू शकते. उत्पादनाची कसोटी वेगळी काढून ते विश्लेषण सामाजिक व आर्थिक बदल या महत्त्वाच्या घटकांकडे दुर्लक्ष करील असा धोका आहे.

शिवाय परिवर्तनीय आर्थिक घटकावर भर देण्यामुळे विकास ही शुद्ध यांत्रिक प्रक्रिया आहे असे मानण्याची प्रवृत्ती होते. विकासरेषेवरील प्रस्थान-बिंदू गाठला म्हणजे जादू होऊन अखंड विकास होत राहतो हे वरील विश्लेषणात गृहीत धरलेले आहे पण सिद्ध केलेले नाही. पण अर्जेंटिना, तुर्कस्थान यांसारख्या देशांतल्या अर्थव्यवस्थांत उड्डाण केल्यानंतर परत खाली येणे भाग पडले आहे. युद्धापूर्वी फ्रान्सने उड्डाण केले पण तो देश फार उंच कधीच गेला नाही. १९२९ मध्ये अमेरिकेला वर फिरता फिरता भोवळ आली. परिवर्तनीय घटकांना मोक्याच्या बिंदूपर्यंत ढकलल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. उलट विकास सुरू करण्यासाठी जेवढा प्रयत्न करावा लागेल तेवढाच तो चालू ठेवण्यासाठीही करावा लागेल.

म्हणूनच विकासाचा "कठोर नियम" नेहमी कक्षेत ठेवला पाहिजे. ते एक विश्लेषणाचे साधन आहे. यशाची-जादूची कांडी नव्हे. त्याचा आपण सावधगिरीने उपयोग केला, तर अपूर्णविकसित देशाच्या आर्थिक विकासाच्या शक्याशक्यतेचा अंदाज घेण्यास आपल्याला त्याची मदत होईल. त्यातून उद्‌भवणाऱ्या काही प्रश्नांचा विचार आता करू.

● ●

६

विकासगती

विकास कसा होईल ते आर्थिक विश्लेषणाने समजले; पण त्याची गती काय असेल ? या प्रश्नाचे उत्तर समीकरणात जे आकडे आपल्याला मांडावे लागतील त्यांवर अवलंबून असेल. त्या समीकरणात सध्या काय आकडे आहेत याचा शोध प्रथम घेणे उचित होईल.

आपल्याला ते काम अचूक करता येणार नाही यात नवल नाही. अपूर्ण-विकसित जगातील बहुतेक भागांत राष्ट्रीय अर्थोद्योगाची अगदी सामान्य आकडे-वारीसुद्धा अंदाजावर आधारलेली आहे. स्थूल भांडवलगुंतवणीचा सध्याचा अंदाज अफगाणिस्थानच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या ५ टक्के तर व्हेनेझुएला-सारख्या काही देशांत वीस टक्के एवढा आहे. सरासरी बहुधा दहा टक्क्यांपेक्षा कमी आहे. भांडवलाच्या उत्पादकतेच्या प्रमाणात तर खूपच अधिक विविधता आहे. पण सरासरी $\frac{1}{3}$ आहे, असे साधारणपणे गृहीत धरण्यात आले आहे. एकूण वाढ सरासरीने वर्षाला तीन ते चार टक्के होईल, अर्थात काही ठिकाणी ती बरीच मोठी तर काही ठिकाणी बरीच कमी असेल. विकासाला मागे खेचणारी लोकसंख्यावाढ सरासरीने दोन टक्के आहे. आणि त्यातही देशोदेशात बरीच भिन्नता आहे.

वरील ढोबळ आकडे प्रत्येक देशाची कर्तबगारी अथवा भवितव्य ठरवताना उपयोगी पडतील असे नाही. पण केवळ प्राथमिक अंदाज म्हणून ढोबळ मानाने का होईना, त्यांचा उपयोग अपूर्णविकसित प्रदेशांच्या प्रगतीचे मापन करताना हिशेबासाठी होतो.

आपल्या ताळेबंदातील जमेची बाजू पाहिली की, एक नवलाची पण सत्य गोष्ट दिसून येते. ती ही की, आपण वर्णिलेले विकासातील सर्व अडथळे

असूनही, आर्थिक विकास होत आहे. आणि भूतकाळाशी तुलना करताना त्याची गती आश्चर्यजनक आहे. गेल्या दहा वर्षांत, मागासलेल्या राष्ट्रांत एकंदरीने राष्ट्रीय उत्पन्न चाळीस टक्क्यांनी वाढले आहे आणि ही गती त्याच काळात युनायटेड स्टेटसमध्ये जो वेग दिसून आला त्याच्याच जवळपास आहे.

पण त्या ताळेबंदातील वजा करण्याची बाजू अद्याप विचारात घ्यावयाची आहे. मागासलेल्या देशांचे उत्पन्न जरी एकंदरीने चाळीस टक्के वाढले, तरी त्यात तीन-चतुर्थांश वाढ लोकसंख्येतील वाढीमुळे साफ धुऊन निघाली आहे. लॅटिन अमेरिकेतील कित्येक देशांत लोकसंख्या उत्पादनाच्या पुढे गेल्यामुळे दर माणशी धान्योत्पादन वस्तुतः कमीच झाले आहे. आफ्रिका, नजिकपूर्व, आग्नेय-एशियात धान्यपरिस्थिती अशीच निराशाजनक आहे. उदाहरणार्थ, भारतात १९१० पासून १९६० पर्यंत शेतकी-उत्पादन वीस-पंचवीस टक्क्यांनी वाढले आहे, आणि ह्या प्रमाणामुळे लोकसंख्यावाढीशी कशीबशी त्याची बरोबरी झाली. औद्योगिक क्षेत्रातील कर्तबगारी त्या मानाने अधिक बरी होती. संबंधित दशकात पोलादाचे उत्पादन सुमारे पंचवीस टक्क्यांनी वाढले, कोळशाचे एक-तृतीयांशाने वाढले, सिमेंटचे शंभर टक्क्यांनी वाढले, विद्युतनिर्मिती सुमारे १५० टक्क्यांनी आणि खतांचे उत्पादन सुमारे ९ पट वाढले. ही प्रगती नेत्रदीपक असूनही, उद्योगक्षेत्र अद्याप इतके लहान आहे की, त्याचा एकंदर विकासावर पडणारा परिणाम मर्यादित आहे. १९५० ते १९५८ मध्ये भारताचे स्थूल राष्ट्रीय उत्पादन वास्तवात फक्त ३० टक्क्यांनी वाढले, लोकसंख्येच्या वाढीपेक्षा ही वाढ वर्षाला जास्तीत जास्त दीड टक्का आहे.

या फलदारिद्र्याचा अर्थ वास्तव भाषेत सांगू लागल्यास वरील आकडे अधिकच आकुंचन पावताना दिसतील. गेल्या दशकात निव्वळ वाढ सरासरीने प्रत्येक माणसाला वर्षाला एक डॉलर इतकी झाली म्हणजे जवळजवळ ती उपेक्षणीय झाली.

भारताचे उदाहरण पुन्हा अपूर्णविकसनाच्या पहिल्या आढाव्यात २५० लोकांना एक हे रेडिओ असण्याचे प्रमाण भारतात पडते, हे आपण पाहिलेच आहे. १९५५ च्या परिस्थितीतील ही शंभर टक्के सुधारणा म्हणता येईल.पण आकडेवारीच्या रेषेवर नजरेत भरणारी ही प्रगती बहुसंख्य भारतीयांच्या दृष्टीने शून्यवत आहे. बायसिकलीबाबत तेच म्हणता येईल. चार वर्षांपूर्वीपेक्षा

भारतात दर माणशी सायकलींचे प्रमाण पन्नास टक्के अधिक आहे. आणि तरीही दर चारशेमागे एकटाच सायकलमालक आहे.

देशोदेशांत थोडीफार भिन्नता असली तरी वरील सर्वसाधारण विवेचन अपूर्णविकसनाच्या नकाशावरील जवळ जवळ प्रत्येक देशाला लागू करता येईल. मेक्सिकोसारख्या काही देशांत औद्योगिक उत्पादनात असाधारण वाढ झाली असली तरी बरेच देश भारताच्या अल्प प्रगतीकडेही असूयेने पाहतात. याचा अर्थ असा नव्हे की, भविष्यकालात प्रगतीची बीजे पेरली गेली नाहीत. किंवा उल्लेखनीय वाटचाल झालेली नाही. महान आरोहणाची सुरुवात झाली आहे हे निःसंशय. धीर सुटतो तो प्रगतीची गती दुःखदायक व्हावी एवढी मंद असल्यामुळे. आफ्रिका, नजीकपूर्व देश या जगाच्या महत्त्वाच्या भागातली गेल्या दहा वर्षांतील प्रगती हा कसाबसा टिकाव धरण्याचा प्रकार आहे; लोकसंख्येची उसळणारी लाट किनाऱ्यावर कशीबशी थोपवून धरण्यात आली आहे. भारतात अभूतपूर्व प्रयत्नांचा परिणाम अर्थव्यवस्था एक इंचभर पुढे सरकण्यापेक्षा अधिक झाला नाही. दक्षिण-अमेरिकेतील परिस्थिती अधिक आशादायक आहे, पण तेथेही बहुतेक देशांत "स्वयंप्रेरित विकास" या शब्दप्रयोगाल पात्र ठरण्याजोगे काही आढळत नाही.

महान आरोहणाची वाटचाल अधिक गतिमान होऊ शकेल काय? या प्रश्नाचे उत्तर विकासाच्या समीकरणात जुन्या आकड्यांच्या जागी नवे आकडे येतील काय, यावर अवलंबून आहे. आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असणाऱ्या घटकांत सुधारणा होण्याचा संभव किती आहे हे पाहिले पाहिजे.

लोकसंख्या नियंत्रण :

विकासाची गती वाढण्यात लोकसंख्येची वाढ हा एक फार मोठा अडसर आहे हे उघड आहे. म्हणून असे वारंवार प्रतिपादन केले जाते की, आत्मघातक अशी ही प्रवृत्ती थोपवण्याकडे अपूर्णविकसित देशांनी प्रथम लक्ष दिले पाहिजे. अनेकही सांगितले जाते की, मदत देताना युनायटेड स्टेट्सने संततिनियमनाची शर्त घातली पाहिजे.

लोकसंख्याबाढीला परिणामकारकपणे आळा घातल्यास विकासाला फार मोठा हातभार लागेल यात संशय नाही. दुर्दैवाने सुधारणा सुचवणे ती करण्यापेक्षा

सोपे असते. अपूर्णविकसित जगाच्या बऱ्याच भागांत मुले ही ज्यांना दर्जा प्राप्त करून घेण्याची कोणतीच संधी नाही किंवा स्वतःचे म्हणता येईल असे काही नाही, त्यांच्याकडून पुरुषार्थाची—दर्जाची, चिन्हे मानली जातात, हे आपण विसरतो. ज्यांना कोणतीही साधने अथवा शेतीची अवजारे उपलब्ध नाहीत त्यांना मुले म्हणजे कौटुंबिक अथवा शेतावरील मनुष्यबळ वाटते हेही आपण विसरतो. ज्या देशात अपत्यहीन वार्धक्य म्हणजे अपार हलाखी ठरते त्या देशात मुले म्हणजे (सामाजिक) "सुरक्षिततेचे साधन" मानले जाते हे आपण विसरतो.

तेव्हा शेतकऱ्याला किंवा शहरातील कामगाराला कुटुंब-नियोजन करण्यास प्रवृत्त करणे सोपे नाही; आणि वैयक्तिक दृष्टीने पाहता मानवतेला धरूनही नाही. तुम्ही त्याला असे सांगाल की, प्रत्येकाने आपले कुटुंब मर्यादित ठेवले तर सर्व कुटुंबाची परिस्थिती सुधारेल. पण आपण जेवढ्या परहितबुद्धीने वागतो त्यापेक्षा अधिक परहितबुद्धी किसान-कामगार दाखवू शकणार नाही. तुम्ही त्याला असे सांगाल की, कमी मुले असली तर त्यांचे संगोपन अधिक चांगले होईल. पण दोन-तीन मुले असली तर साथीच्या रोगाला पूर्वीप्रमाणे त्यांतील अर्धीच बळी पडतील, सर्वच्या सर्व बळी पडणार नाहीत अशी खात्री वाटण्यासारखे त्याच्यापाशी काही नाही. संततिनियमन सोपे आहे, साधे आहे, कमी खर्चाचे आहे असे तुम्ही त्याला सांगू शकाल पण त्याला आणि त्याच्या बायकोला ते खर्चिक, कठीण, त्रासदायक आणि गूढच वाटेल. आणि शेवटी प्रश्न असा की, त्याच्याजवळ स्त्रीखेरीज दुसरे करमणुकीचे साधन काय आहे! लखनौच्या एका भारतीय डॉक्टरने मुलाखतीत सांगितल्याप्रमाणे 'खेडुतां'ना आणि नागरी जनतेला काबाडकष्टाखेरीज वेगळे जीवन जोपर्यंत आपण देऊ शकत नाही आणि दिवसाअखेरच्या त्यांच्या करमणुकीच्या साधनांऐवजी रेडिओ, नाटक, सिनेमा, शिक्षण, सभासमारंभ यांसारखे करमणुकीचे व श्रम-परिहाराचे मार्ग जोपर्यंत आपण पुरवू शकत नाही तोपर्यंत वाढते जननप्रमाण चालूच राहील. लोकांना ऊर्जितावस्थेला आणल्याखेरीज व त्यांचे सांस्कृतिक क्षितिज रुंदावल्याखेरीज जननप्रमाण खाली येणार नाही.

संतति-नियमनाचा स्वीकार करून एका झटक्यात आपण सर्व प्रश्न का सोडवू शकत नाही, हे वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येईल. खरी

गोष्ट ही आहे की, कुटुंब-नियोजनाचा कार्यक्रम हा सुरू करण्यास अत्यंत कठीण अशा सामाजिक कार्यक्रमांपैकी एक आहे. फक्त जपान या एकाच राष्ट्रात संतति-नियमनाचा परिणामकारक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. आणि हा कार्यक्रम म्हणजे गर्भपाताला कायदेशीर मान्यता देणे. म्हणजे त्यांनी लोकसंख्या-नियंत्रणाच्या एका उत्स्फूर्त प्रकाराला कायद्याची मान्यता दिली एवढेच. विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे गर्भपाताचा मार्ग लोकांनी उल्लेखनीय अशी आर्थिक प्रगती झाल्यानंतर स्वीकारला, त्या प्रगतीला तो मार्ग कारणीभूत झाला नाही.

वरील शेवटचा मुद्दा फार महत्त्वाचा आहे. मागील अनुभवावरून पाहिले तर असे दिसते की, औद्योगीकरणाचा जननप्रमाणावर सूक्ष्म असा प्रभाव पडतो. स्त्रियांचा बदलेला दर्जा, औद्योगिक वातावरणात निर्माण होणाऱ्या बालसंगोपनाच्या आर्थिक अडचणी, विवाहाची लांबलेली वयोमर्यादा आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अपेक्षांची विस्तारलेली क्षितिजे. या सर्वांचा प्रभाव पाहून नैसर्गिक जननप्रमाण कमी होत असल्याचे आढळते. उदाहरणार्थ रशियात १९२० मध्ये असलेले हजारी ३·६३ चे प्रमाण १९५५ मध्ये १·९४ झाले. औद्योगीकरण हाच लोकसंख्येच्या प्रश्नावर तोडगा आहे अशी आशा करण्यास बरीच जागा आहे. अडचण एवढीच की, याला वेळ लागतो, फार वेळ लागतो. मध्यंतरीच्या काळात वृद्धीचे भयानक प्रमाण,–विशेषतः ज्या काळात मृत्युप्रमाण विलक्षण वेगाने कमी होते त्या काळात–हे शीघ्र औद्योगीकरणाऱ्या मार्गातील अडसर ठरते.

या दुर्दैवी कुचंबणेतून बाहेर पडण्याचा मार्ग नाही का ? युद्ध अथवा रोगांची साथ या आपत्ती हा हृदय गोठवून टाकणारा पण या लक्ष्यांच्या सापळ्यातून बाहेर पडण्याचा एक मार्ग आहे. मोठ्या प्रमाणावर देशांतर हा तत्त्वतः तरी, काही प्रदेशांच्या दृष्टीने का होईना, एक उपाय आहे. त्यापेक्षा सोयीची अशी तंत्रे निःसंशय उपयोगी पडतील. हे शक्य आहे की, सर्वस्पर्शी अशी मोहीम, भारताप्रमाणे लोकांचे मन वळविण्यावर भर देऊन नव्हे तर प्रोत्साहनाने व शिक्षा यांवर भर देऊन धडाक्याने सुरू करण्यात आली तर परिणामकारक-पणे जननलाटेला थोपविणे-मग त्यात सामाजिक व राजकीय हानी कितीही होवो, शक्य होईल.

या क्षणाला तरी वरीलपैकी कोणतीही नाट्यमय कार्यपद्धती दृष्टिपथात नाही. आणि परिस्थिती आहे तशीच राहील हाच संभव आहे. प्रत्येक अविकसित देशाला या प्रश्नाचे जीवघेणे दडपण जाणवेल असे नाही. आणि काहींना तो प्रश्न बिनमहत्त्वाचा वाटतो हे खरेच. इजिप्त, चिली यांसारख्या भिन्न देशांना या प्रश्नाची वाढती जाणीव होऊ लागली आहे, हे आशादायक आहे. मात्र जाणीव व उपाययोजना यात फार अंतर आहे. निदान या पिढीच्या काळात तरी जननप्रमाण विकास-समीकरणात सामान्यतः एक स्थिर व अपरिवर्तनीय घटक म्हणून राहील, अशीच दुर्दैवाने शक्यता अधिक आहे. म्हणून विकासाला गतिमानता यावयाची असेल तर समीकरणातील इतर घटकांकडे—ज्यांचे लक्ष वाढत्या लोकसंख्येकडे नसून वाढत्या उत्पादनाकडे आहे—पाहावे लागेल.

भांडवलाची उत्पादकता :

विकासाच्या समीकरणात उत्पादनाच्या बाजूस दोन गोष्टी आढळतात, हे आपल्याला आठवत असेलच. भांडवलनिर्मितीकरता उपलभ्य असणारी बचत ही त्यांतील एक गोष्ट व ती बचत वापरल्यास तिची उत्पादकता ही दुसरी गोष्ट. त्यांतील दुसरीचे विश्लेषण प्रथम करू. नव्या भांडवलगुंतवणीची उत्पादकता वाढवून अपूर्णविकसित राष्ट्रांच्या उत्पादनात उल्लेखनीय वाढ करता येईल काय ?

विशिष्ट भांडवलगुंतवण उत्पादनात किती वाढ घडवून आणते हा प्रश्न नव्यानेच अर्थशास्त्रात चर्चिला जात आहे हे नवलाचे आहे, हा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा आहे व त्याची जी काही उत्तरे आहेत ती स्पष्ट नाहीत हे त्याचे एक कारण आहे. सरासरीने अपूर्णविकसित प्रदेशात भांडवलगुंतवणीच्या पंचवीस ते पन्नास टक्के फळ मिळते, असे सामान्यतः गृहीत धरले जाते. म्हणजे दहा लाख डॉलर भांडवल-गुंतवण केल्यास वार्षिक उत्पादनात अडीच ते पाच लाख डॉलरची वाढ होते. तरी पण या आकड्यात खूप बदल होऊ शकतो आणि हे इतके पक्के नाहीत की, त्यांचा उपयोग करून आपण उत्पादन-वाढीसंबंधाने आडाखे बांधू शकू. अपूर्णविकसित देशांना त्यांनी अधिक किफायतशीर भांडवलगुंतवण करावी असे आवाहन आपण करू शकत नाही. कोणते प्रकल्प फलदृष्ट्या अधिक किफायतशीर आहेत हे आपल्यालाच

निश्चित माहीत नाही. विश्व-बँकेच्या अध्यक्षांनी असा अनुभव सांगितला आहे की, एका खाणकंपनीने खाणकामाची यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी कर्ज मागितले असता त्याऐवजी तिने खाणकामगारांसाठी नवीन घरे बांधण्याकरता स्थानिक कर्ज काढल्यास उत्पादकता अधिक वाढेल काय, यावर जोरदार चर्चा झाली.

विशिष्ट भांडवलगुंतवणीपासून होणारी उत्पादनवाढ जास्तीत जास्त करण्याचा सोपा मार्ग नसला तरी भांडवली साधनांचा अपव्यय टाळणे ही एक गोष्ट खचितच करता येईल. गेल्या दहा वर्षांत अब्जावधी डॉलर बचत निष्फळ झाली आहे. याचे कारण ती साठवली गेली आहे किंवा तिचा वापर विलास-वस्तूंच्या उत्पादनासाठी केला आहे हे नव्हे तर ज्या विकास-प्रकल्पात ती गुंतवली गेली त्यातून त्या खर्चाचे समर्थन होण्यासारखी फलनिष्पत्ती झाली नाही हे होते.

आपण हे पाहिलेच आहे की, बहुतेक मागासलेले देश विकासाला सुरुवात करतात तेव्हा त्यांना आपल्या शक्तीची पुरेशी जाणीव नसते. त्यांना आपली साधनसंपत्ती किती आहे याची कल्पना नसते. त्यांच्या भूप्रदेशाची समाधानकारक पाहणीही झालेली नसते. आपली एकूण लोकसंख्या किती आहे हे त्यांना माहिती नसण्याचाही संभव असतो. तेव्हा असे देश आपले विकास-प्रकल्प यशाच्या अपेक्षेबाबत केवळ अंदाज करून व आशा बाळगून सुरू करण्याची फार शक्यता आहे.

यामुळे अपरिमित हानी होऊ शकेल. उदाहरणार्थ : दुसऱ्या महायुद्धानंतर टांगानिकामध्ये भुईमुगाच्या शेंगांचे पीक काढण्यासाठी ब्रिटनने जे प्रयत्न केले त्यांचा इतिहास उद्‌बोधक आहे. त्यासाठी जी योजना आखण्यात आली होती तिच्यावर अपेक्षेपेक्षा सतरापट अधिक खर्च झाला. या अपेक्षाभंगाचे कारण काय ? पुरेशी पूर्वतयारी करण्यात आली नव्हती हेच त्याचे प्रमुख कारण होते. जमिनीची पात्रता तपासण्यात आली नव्हती आणि ट्रॅक्टरच्या वजनामुळे ती खडकासारखी कठीण झाली होती. पावसाबाबतचे अंदाज अचूक नव्हते. वाहतुकीच्या सोयी पुरेशा नव्हत्या. कुशल मनुष्यबळ सातत्याने उपलब्ध होणे कठीण होते. शेंगा प्रकल्पाच्या अपयशाने ब्रिटनसारख्या देशालाही खूप अपव्यय झाल्याचे वाटले. अपूर्णविकसित देशाला हा अपव्यय मारकच ठरला

असता. म्हणून भांडवलगुंतवणीपूर्वीची साधनधनाची, मनुष्यबळाची पाहणी परिणामकारक विकासासाठी अत्यावश्यक असते ह्याची अधिकाधिक जाणीव होत आहे.

भांडवलाची उत्पादकता चुकीची भांडवलगुंतवण टाळल्याने किती वाढविता येईल? काळजीपूर्वक पूर्वतयारी केल्यास भांडवलगुंतवण-प्रकल्पाची सफलता पुष्कळच वाढवता येईल हे निःसंशय. भांडवलगुंतवणीपूर्वी बरेच काम करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या स्पेशल फंडचा असा अंदाज आहे की, साधनसामग्रीची पाहणी करण्यासाठी खर्च केलेला प्रत्येक डॉलर शंभर डॉलरची फलदायक भांडवलगुंतवण होण्याची शक्यता निर्माण करतो. उलट बाजू ही की, पूर्वतयारीसाठीही वेळ खर्च होतो. एखादे महत्त्वाचे बंदर गाळाने भरते, त्यावर उपाय शोधण्यासाठी लाटांसंबंधी माहिती मिळविण्यात एक वर्ष जाते. शिवाय पूर्वगुंतवणीवर फार भर दिला तर विकासाच्या प्रश्नाकडे तुकड्यातुकड्याने पाहण्यास उत्तेजन मिळते. धाडसापेक्षा सावधगिरीला अधिक महत्त्व येते. मोठे फळ प्राप्त करून घेण्यासाठी जे अपार प्रयत्न लागतात (मग त्यात अपव्यय कितीही असो) आणि ते करणे हा विकासाचा एकमेव मार्ग असतो ते न केले जाण्याचा संभव निर्माण होतो.

आणि ज्याचे पूर्वनियोजन उत्कृष्ट आहे अशा प्रकल्पाच्या बाबतीत देखील भांडवलगुंतवण कार्यक्रम पार पाडण्यासाठी पुरेसा कुशल नोकरवर्ग मिळत नाही हा आणखी एक अडसर दिसून येतो. १९४९ मध्ये लिबिया जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा त्या देशात शालेय शिक्षण मिळालेले फक्त पाच हजार नागरिक होते आणि त्यांत विद्यापीठाची पदवी मिळालेले फक्त १४ जण होते. आफ्रिकेत ८० ते ८५ टक्के लोक निरक्षर आहेत. फक्त ८ टक्क्यांपेक्षा कमी मुले दुय्यम शिक्षण घेतात व त्यांतील एक टक्क्यापेक्षा कमी व्यावसायिक शिक्षण घेतात. भारतात फक्त पन्नास टक्के मुले शाळेत जातात आणि दक्षिण अमेरिकेतील सर्वसाधारण स्थिती तशीच आहे.

मागासलेल्या देशांचे वैशिष्ट्य असलेल्या कौशल्याच्या अभावाकडे जर आपण साकल्याने पाहिले तर त्याचे प्रमाण काळजी वाटण्याजोगे मोठे आहे असे दिसून येईल. असा अंदाज करण्यात आला आहे की, पुढील दहा वर्षांत फक्त नायजेरियासाठीच सुमारे वीस हजार वरिष्ठ अधिकारी, व्यवस्थापक,

तंत्रज्ञ वगैरे लागतील आणि मध्यम श्रेणीत त्याच्या दुप्पट लोक लागतील. जागतिक पातळीवर याचा विचार केला तर सात लाख वरिष्ठ श्रेणीचे व त्याच्या दुप्पट खालच्या पातळीवरचे अधिकारी व नोकर लागतील असे दिसते. त्यांतील निम्म्या संख्येची तरतूद करावयाची म्हटली तरी गरीब देशातील दुर्बल शिक्षणव्यवस्थेवर असह्य असा बोजा पडेल. उदाहरणार्थ, भारतात सध्या दर दहा लाखांमागे फक्त अठरा इंजिनियर तयार होत आहेत आणि हे प्रमाण अमेरिकेशी तुलना करता एक दशांशापेक्षा कमी आहे.

इतर देशांकडून अथवा संयुक्त राष्ट्रसंघाकडून होणाऱ्या तांत्रिक मदतीने ही उणीव अंशतः भरून काढता येईल. तांत्रिक मदतीच्या कार्यक्रमाला यश लाभल्याच्या खात्रीदायक कथा पुष्कळ सांगितल्या जातात. उदाहरणार्थ, पाकिस्तानमध्ये कागद-गिरणी चालवायची होती. ती चालवण्यासाठी प्रशिक्षित असा एकही पाकिस्तानी नसल्यामुळे अडून पडली होती. पण संयुक्त राष्ट्रसंघाने एक स्विस कार्याधिकारी पाठविल्याने ती सुरू करता आली. पण मागासलेल्या देशांची प्रगती कुंठित करणाऱ्या कौशल्याचा प्रभाव परकी मदतीने दूर करणे महाकठीण आहे. १९६२ पर्यंत राष्ट्रसंघाकडून मागासलेल्या देशांसाठी सुमारे दहा हजार तज्ज्ञ नेमण्यात आले होते आणि अधिक तज्ज्ञ मिळविण्यासाठी या कार्यक्रमात फार मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या कार्यक्रमाची व्याप्ती वाढली असून देखील १९६२ पर्यंत मागासलेल्या प्रदेशांतील फक्त १६ हजार नागरिकांना स्वदेशातील अथवा परदेशातील व्यावसायिक शिक्षण-संस्थांत पाठविणे राष्ट्रसंघाला शक्य झाले.

तेव्हा नजीकच्या काळात तरी उत्पादकता वाढण्याची शक्यता फारशी दिसत नाही. मात्र कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाप्रमाणे या बाबतीतही सुटकेचा नाट्यमय मार्ग सापडण्याची शक्यता आहे. जी अल्पप्रमाणात उद्योगात वापरता येतील व भरघोस उत्पादन देऊ शकतील अशा नव्या प्रकारच्या उत्पादनतंत्रांचा अवलंब केल्यास अपूर्णविकसित देशांतील बऱ्याच क्षेत्रांत उत्पादकतेची उल्लेखनीय वाढ होऊ शकेल. अल्पप्रमाण पण अतिकार्यक्षम शेतीचा प्रश्न सोडून द्या, पण आधुनिक व बहुउत्पादन आणि अनेक उपभोग्य वस्तूच नव्हे तर औद्योगिक साधनसंच देखील निर्माण करण्यास समर्थ कुटीरोद्योगक्षेत्र शक्यतेच्या कोटीतले आहे.

सध्या मात्र असे उत्पादनतंत्र उपलब्ध नाही आणि अल्पप्रमाण उद्योग-विकास-प्रयत्नांच्या दृष्टीने त्यांचा उपयोग कितीही असला तरी–विकासाच्या समीकरणात उत्पादकतेच्या घटकाला जोराने पुढे ढकलण्यास समर्थ नाहीत. अल्पप्रमाण उद्योग हे अवजड उद्योगांच्या प्रचंड भांडवली समूहाला पर्याय ठरण्यासही समर्थ नाहीत हे चीनमध्ये मागल्या अंगणांत पोलादाच्या भट्ट्या बसवण्याचे जे प्रयत्न झाले, त्यामुळे स्पष्ट झालेच आहे. आधारभूत सामाजिक भांडवलाची निर्मिती ही शीघ्र औद्योगिक विकासाची पूर्वशर्त आहे पण त्या बाबतीतले अल्पप्रमाण उद्योगांचे सामर्थ्य त्याहूनही कमी आहे.

तेव्हा सध्या तरी भांडवलाची उत्पादकता वाढविण्यासाठी भांडवलगुंतवणपूर्व पाहण्या व तांत्रिक मदतीचा कार्यक्रम यावरच अवलंबून राहावे लागणार आहे. या दोन्ही गोष्टी वरच्या तळावरचा अग्रहक्क मिळण्यास पात्र आहेत आणि असंख्य प्रकल्पांच्या यशाची शक्यता त्यांच्यामुळे वाढेल हे निःसंशय. शेवटी हेही लक्षात ठेवणे उचित होईल की, अपव्यय ठरलेली भांडवलगुंतवण देखील केवळ पुनः उपयोग करता येईल अशा भौतिक मालमत्तेच्या रूपानेच नव्हे तर अमोल अनुभवाच्या रूपानेसुद्धा उपयुक्त भाग मागे ठेवू शकेल. गरजा आणि उणिवांचा हा एकंदर हिशेब पाहता यांसारख्या गोष्टीपासून एकूण विकासगतीत फार फार तर नाममात्रच वाढ होईल यापेक्षा अधिक अपेक्षा करणे शहाणपणाचे होणार नाही.

बचतवाढ :

विकाससमीकरणातील शेवटच्या घटकाचा विचार अजून आपल्याला करावयाचा आहे. तो घटक म्हणजे अपूर्णविकसित देशाला वाढवता येणारी बचत जिचा प्रयत्नपूर्वक वाढवलेला भाग भांडवलवाढीसाठी वापरता येईल ती होय.

लोकसंख्येचा सगळ्यात मोठा भाग जो शेतकरीवर्ग, त्याला बचतवाढ करावयास लावता येईल हे असंभवनीय आहे. बहुतेक अपूर्णविकसित देशांत शेतकीक्षेत्रात बचत करण्याजोगे अतिरिक्त उत्पादन नाही. खरे म्हणजे, आपण पाहिल्याप्रमाणे, शेती शास्त्रशुद्ध मार्गांनी करून असे अतिरिक्त उत्पादन करणे ही विकासातील एक प्राथमिक समस्या आहे. बचतवाढ मोठ्या प्रमाणावर करणे हे

फक्त जमीनमालकीची यशस्वी पुनर्घटना करण्यावर अवलंबून नसून शेतकऱ्याचे अतिरिक्त उत्पादन उपभोगात जाण्यापूर्वी ते त्याच्याकडून काढून घेण्याच्या सरकारच्या सामर्थ्यावर ते अवलंबून आहे.

संख्यादृष्ट्या लहान असलेल्या औद्योगिक कामगारवर्गाकडून बचत उकळणेही तेवढेच कठीण आहे. या महत्त्वाच्या गटाला संतुष्ट करण्याकरिता वेतन वाढ व इतर तरतुदी यांना अकाली मान्यता दिली जाईल, हाच खरे म्हणजे विकासकाळाच्या सुरुवातीस उद्‌भवणारा एक प्रश्न आहे. अशा धोरणामुळे तो देश भावफुगवणीच्या खाईत लोटला जाणे अटळ आहे. पण हे धोरण एकदा स्वीकारल्यावर पुनः मागे येणे कठीण असते. पेरोंच्या राजवटीतले अर्जेंटिनाचे उदाहरण ह्या बाबतीत उद्‌बोधक आहे. १९६२ मध्ये पेरोंला इतकी मते मिळाली की, लष्करी क्रांती करणाऱ्या अधिकाऱ्यांना निवडणुकीचे निकाल दडपून टाकावे लागले. औद्योगिक कामगारांकडून बचत होणे शक्य आहे. पण शेतकऱ्यांप्रमाणे कडक नियंत्रण करून सरकारला त्या वर्गावर बचतीची सक्तीच करावी लागेल.

मध्यम व वरिष्ठ वर्ग वाढत्या बचतीचे उगमस्थान ठरू शकतील; या वर्गाच्या बाबतीत वाढती बचत करण्याचा मोह त्यांना व्हावा व ती औद्योगिक उपक्रमाकडे वळावी यासाठी नक्की काही तरी करता येईल. उदाहरणार्थ, औद्योगिक भागभांडवल पूर्वी ज्यांनी भागरोखे कधीच घेतले नव्हते अशा मध्यम व वरिष्ठ वर्गीयांकडून घेण्याचे बरेचसे कार्य विश्व-बँकेच्या आधिपत्याखाली पार पडलेले आहे. या पद्धतीने मोठी बचतवाढ होण्याची शक्यता कदाचित फार कमी असेल. पन्नास ते शंभर टक्के बचतवाढ करावयाची असेल तर लोकांचे मन वळवून करण्याऐवजी सक्तीने करणे अधिक परिणामकारक ठरेल. विलासवस्तूंच्या उपयोगावर कडक नियंत्रणे बसवून त्यामुळे वाचलेली रक्कम जबर प्राप्तिकर बसवून अथवा सक्तीची कर्जे घेऊन गोळा करता येईल.

अशी उपाययोजना, परत आपल्याला आर्थिक विकासाशी अभेद्यपणे निगडित असलेल्या राजकीय बाजूकडे वळावयास लावते. भूमिसुधारणेप्रमाणेच करसुधारणा हादेखील अपूर्णविकसित देशांच्या कार्यक्रमपत्रिकेवरचा एक कायमचा विषय आहे आणि सामान्यतः हे दोन्ही विषय कागदोपत्रीच राहिले आहेत. चैनीच्या वस्तूंवरचा खर्च कमी करण्याला बेताचेच यश मिळाले आहे.

अपूर्ण विकसित देशांतील वरिष्ठ वर्गात उधळपट्टी हा वैयक्तिक खर्चाचा नियम आहे, अपवाद नाही. तरी पण पुष्कळ बचत होण्याची संभाव्यता निःसंशय आहे. राजकीय विरोध बाजूस करता आला तर अंतर्गत बचत पुष्कळ प्रमाणात का वाढू नये याला वरवर पाहता तरी कारण नाही. निदान भांडवलाची उत्पादकता अथवा लोकसंख्या या घटकांशी तुलना करता बचतीचा ओघ ही अपूर्णविकसित देशांत तावडतोब नियंत्रित करता येईल अशी गोष्ट आहे. विकास समीकरणातला तो सर्वांत आशाजनक घटक आहे यात संशय नाही.

त्या समीकरणातील सर्व घटकांना एकत्रित आणण्याची आपली अद्याप पूर्ण तयारी झाली नाही. अपूर्णविकसित देशांत भांडवलनिर्मिती होण्यासाठी अंतर्गत साधनधन मुक्त करणे यापेक्षा अधिक काहीतरी लागते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. जगाच्या प्रगत भागातून औद्योगिक यंत्रसामग्री मिळण्याचरही ती पुष्कळच अवलंबून असते, म्हणून आपण प्रगत अर्थव्यवस्थेचे देश व अपूर्णविकसित प्रदेश यांचा संबंध या महत्त्वाच्या प्रश्नाकडे आता वळू.

व्यापार-प्रवाह :

जेव्हा आपण प्रगत देश अपूर्णविकसित देशांना कोणत्या प्रकारे मदत करू शकतील याचा विचार करतो तेव्हा आपले मत प्रथम "मदती"कडे –म्हणजे विसाव्या शतकात आंतरराष्ट्रीय संबंधांचे गमक ठरलेल्या एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राला दिलेल्या कर्जाकडेच– वळते. पण अशा प्रकारे या प्रश्नाचा विचार सुरू करणे चुकीचे आहे. प्रगत देश व मागासलेले देश यांतील प्रमुख आर्थिक संबंध, मदतीवर म्हणजे एकतर्फी वस्तूंच्या देशांतरावर अवलंबून नसतात, म्हणजेच एकाकी व्यापारावर दोन्ही देशांना लाभदायक अशा वस्तुविनिमयावर अवलंबून असतात. तिचा बराच भाग त्यांना कोणी देणगी म्हणून दिलेला नसतो; तो विकत घेतलेला असतो व त्याची किंमत कॉफी, कच्चे कथील, रबर, कोको, हस्तोद्योग वस्तू यांच्या रूपाने म्हणजे ज्या वस्तू औद्योगिक देशांना हव्या असतात पण ज्यांचे उत्पादन या देशांत होत नाही अशा वस्तूंच्या रूपाने मोजलेली असते.

डॉ. पीटर केनन लिहितात की, आपण अपूर्णविकसित देश कर्जाने मिळालेल्या पैशांचा उपयोग करून यंत्रसामग्री, बांधकामाचा माल व इतर भांडवली

वस्तू खरेदी करतात असे आपण गृहीत धरतो, पण ते खरे नाही. बहुतेक अल्प उत्पन्नाचे देश आपल्या आयातीची किंमत निर्यातीच्या रूपाने देतात. उदाहरणार्थ, १९५५ मध्ये भारताने १३ टक्के आयात उसनवारी अथवा बाहेरील सरकारांच्या मदतीने मिळविली; सुमारे ७० टक्के निर्यातीच्या आधाराने मिळविली आणि उरलेल्याची तरतूद राखीव निधीतून केली.

एकंदरीने अपूर्णविकसित देश परराष्ट्रीय व्यापारातून सुमारे तीस ते चाळीस अब्ज डॉलर्स मिळवतात. पण त्यांचा उपयोग करून बाहेर ते जी प्रगती करतात ती सर्वच्या सर्व विकासास उपयोगी पडते असे नाही. पुष्कळशी भांडवली साधने केवळ चालू गाड्यास खीळ पडू नये म्हणून आवश्यक असतात. पोलादी रूळ आयात करावे लागतात ते नेहमीच रेल्वे-मार्ग बांधण्यासाठी नसून जुने रूळ बदलण्यासाठीही लागतात. त्याशिवाय अपूर्णविकसित देशांच्या प्राप्तीचा बराच मोठा भाग परकी कर्जावरील व्याज देण्यासाठीही लागतो आणि दुष्काळाच्या वर्षी निर्यातीचा उपयोग धान्यआयातीची किंमत देण्याकरिता करावा लागतो.

मागासलेल्या देशांचे निर्यातीपासूनचे उत्पादन शहाणपणाने वापरले जाईल अशी खात्री देता येत नाही. डॉलर्सचा उपयोग मोटारगाड्या व वातानुकूल यंत्रे यांसाठी केला जातो, डिझेल इंजिने अथवा शेतीला उपयोगी यंत्रे यासाठी केला जात नाही अशी अनेक उदाहरणे आहेत. परंतु विकासाची आवश्यकता जसजशी तातडीची होत आहे तसतशी विलास-वस्तूंची मागसलेल्या देशांतली आयात कमीतकमी होत आहे. मागासलेल्या देशांत परकी चलनाचा प्रश्न मुख्यतः त्याची उधळपट्टी करण्याचा नसून जास्तीत जास्त परकी चलन कसे मिळवायचे हा आहे.

आणि ही गोष्ट साधी नाही. आपण पाहिलेच आहे की, गरीब देश कच्चा माल विकतात आणि बऱ्याच वेळा त्यासाठी एखाद्याच वस्तूवर अवलंबून असतात. याचा अर्थ असा की, ज्या वस्तूची किंमतीतील अस्थैर्याबाबत कुप्रसिद्धी झाली आहे अशा वस्तूंवर ते परकी चलनासाठी अवलंबून असतात. त्यामुळे स्थिर आणि खात्रीलायक असा परकी चलनाचा ओघ चालू राहील यावर विसंबून त्यांना आपल्या भावी योजना आखता येत नाहीत. उलट, निर्यातीपासूनची प्राप्ती कमालीची अस्थिर आहे व त्यात केव्हा केव्हा हानि-

कारक बदल होतात असाच अनुभव त्यांना येतो. किंमतीतील हे फेरबदल अचानकपणे पुष्कळ प्राप्ती करून देणारेही ठरतात हे खरे आहे. मागासलेल्या जगात युद्धोत्तर काळात एकंदर जो विकास झाला त्याला बऱ्याच प्रमाणात भाववाढीचा हातभार लागला. ही गोष्ट दीर्घकाळच्या संदर्भात दिलासा देणारी नसली तरी तिला तिचे योग्य ते श्रेय दिले पाहिजे.

पण यात आणखी एक गुंतागुंत आहे. कच्च्या मालाचे भाव वरखाली जात असले तरी त्यांचा ज्यांच्याशी विनिमय होतो त्या पक्क्या मालाचे भाव अलिकडील काळात फक्त वरच्या दिशेने हेलकावे खात आहेत. त्यामुळे व्यापारशर्ती कच्च्या मालाच्या निर्यातकाला हानिकारक होत आहेत. त्यामुळे द्यावा लागणारा कच्चा माल प्रमाणाने वाढत आहे व त्या मोबदल्यात मिळणारी यंत्रसामग्री कमी कमी होत आहे. परिणामी गरीब देशांना एका वर्षी दोन अब्ज डॉलर्सची क्रयशक्ती कमी मिळाली आणि हा आकडा त्यांना त्या वर्षी मिळालेल्या मदतीपेक्षा मोठा आहे. म्हणजे अपूर्णविकसित देशांनी विकसित देशाला नकळत अर्थसाहाय्य केले आहे.

याबाबत काय करता येईल ? प्रगत देशांनी आपल्या आर्थिक आंदोलनांना लगाम घालावा हा एक मार्ग आहे. (किंवा, काहींनी सुचवल्याप्रमाणे निर्यातीतील अकल्पित नुकसानीची भरपाई होईल अशा रीतीने मदत द्यावी) आणि दुसरा एक मार्ग विकासाशी सुसंगतच आहे. तो म्हणजे अविकसित देशांनी आपल्या निर्यातीत विविधता आणून तयार अथवा अर्धतयार वस्तू जागतिक बाजारपेठेत पाठवावयाच्या हा होय. मर्यादित प्रमाणात याची सुरुवात झालीच आहे. ब्राझीलकडून पोर्तुगालकडे ब्राझीलमध्ये तयार झालेल्या मोटारगाड्या (ऑटो) पाठवल्या जातात. भारत लौकरच थोड्या प्रमाणात पोलादाची निर्यात करू लागेल.

येथे नवीन अडचण येते. आपल्या अर्थव्यवस्थेत अशा वस्तूंची आयात झाल्यास निर्भेळ आनंद मानणारे देश थोडेच आहेत. अमेरिका धरून अनेक देशांनी पेट्रोल, जस्त, शिशासारख्या कच्च्या मालाच्या आयातीवर अंतर्गत उत्पादकांना संरक्षण देण्याच्या हेतूने निर्बंध घातले आहेत. युरोपातील अनेक देशांनी चहा, कॉफी, कोको, तंबाखू सारख्या वस्तूंवर परंपरागत जबर कर बसवून अपूर्णविकसित देशांना उपलब्ध असलेल्या बाजारपेठेच्या कल्पनेतून

उद्भवलेल्या निर्बंधामुळे मालाच्या निर्यातीत अर्जेंटिनाला २५ कोटी डॉलर्सचे नुकसान १९६१ मध्ये सोसावे लागले. कच्चा मालाच्या आयातीवर निर्बंध घालण्याची प्रवृत्ती कारखानदारी मालाच्या बाबतीत अधिक तीव्र झाल्यावाचून राहणार नाही. अमेरिकेत हाँगकाँग-जपानमधून कमी किमतीचे कापड येत असल्याने अशा कापडावर बहिष्कार घालण्याच्या धमक्या देण्यास अगोदरच सुरुवात झाली आहे व मदतीकरता कामगार मालकांचे शक्तिशाली संयुक्त दडपण वॉशिंग्टनवर आणले जात आहे. बाहेरच्या देशांत अल्पखर्चात उत्पादित होत असलेल्या मालाचा अमेरिकन उत्पादकांनी आधीच धसका घेतला आहे. आणि जेव्हा या मालाचे उत्पादन केवळ अल्पवेतनाच्या मनुष्य-बळाकडून न होता, त्यासाठी कार्यक्षम यंत्रेही उपयोगात आणली जातात, तेव्हा त्या भीतीत तथ्य असते.

तेव्हा हा प्रश्न वाटतो तितका सोपा नाही. असे अनेक वेळा सुचविण्यात आले आहे की, आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी परिणामकारक झाल्यास 'प्रगत' देशांना धान्योत्पादक देश बनता येईल. आणि 'मागासलेले' देश जगाचे कारखाने बनतील. परदेशांतील स्वस्त मालाच्या आयातीमुळे अमेरिकेतल्या एखाद्या कामगाराच्या चरितार्थावर गदा येत असेल तर केवळ जागतिक उत्पादनाच्या पुनर्घटनेचे तत्त्वज्ञान सांगून त्याचे समाधान होणार नाही. ज्यांचा रोजगार गेला आहे त्याला दुसरे काम शिकवून तयार करावे लागेल व दुसऱ्या व्यवसायात मुरवावे लागेल आणि या कठीण स्थित्यंतराच्या काळात त्याच्या चरितार्थाची निश्चित सोय करावी लागेल.

असे बदल लहान प्रमाणावर करावयाचे झाले तरी ते खर्चाचे व त्रासाचे असतात. पण ते अशक्य नाही. आयात वाढवून बाहेरील विकासाला मदत करण्यात आपलाही फायदा होईल हे प्रगत देशांना उमजले तर हे बदल सुकर होतील. कारण आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रगत देश ग्राहकही असतात व विक्रेतेही असतात आणि त्यांची विक्री त्यांच्या बाहेरील ग्राहकांच्या विकास-मानावर अवलंबून असते. तेव्हा त्यांनी बाहेरील आर्थिक विकासाला हातभार लावला तरी त्यांचेही आर्थिक कल्याण होईल. पुढील दहा वर्षांत मागासलेल्या देशांचे दरमाणशी उत्पन्न सरासरीने दोन टक्क्यांनी वाढले तर अमेरिकेचे बाहेरील उत्पन्न १४ अब्जांनी वाढेल असा अंदाज करण्यात आला आहे.

मागासलेल्या देशांना मदत करण्यात व्यापाराला प्राथमिक महत्त्व आहे हे आता प्रगत देशांना समजू लागल्याची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकेतल्या अधिकारीवर्गाला आंतरराष्ट्रीय बाजारात सर्वांना समान संधी देण्याचे महत्त्व किती आहे याची पूर्ण जाणीव झाली आहे. अमेरिकेतील व्यापारीवर्गाच्या संशोधन-गटाने सावधगिरीच्या शब्दांत का होईना समानतेच्या व स्थैर्याच्या हेतूने केलेल्या व्यापारी करारांना पाठिंबा दिला आहे, हे सूचक आहे. कारण त्यावरून व्यापारीवर्गाने विचार बदलल्याचे दिसते. स्वस्त मालाची आयात पसंत असलेल्यांना देखील ही जाणीव झाली आहे की, बाहेर माल विकण्याची व त्या मार्गाने विकासासाठी पैसा उभारण्याची संधी मागासलेल्या देशांना अचानकपणे नाकारता येणार नाही. अमेरिकेत व युरोपात आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन येऊ लागला आहे. व्यापार ही देखील मदत आहे आणि अविकसित देशांना प्रगत देशांना माल विकण्याची सध्या जी संधी उपलब्ध आहे त्यावर मर्यादा घातल्यास शेवटी त्याच्या विकासाचीच पीछेहाट होते, हे कधी ना कधी आपल्याला समजून घ्यावेच लागेल.

खाजगी भांडवलाचे प्रवाह :

महत्त्वाचा व्यापार हा बाहेरील जगाने विकासाला मदत करण्याचा एक मार्ग झाला. दुसरा अतिशय महत्त्वाचा आर्थिक आधार म्हणजे प्रगत देशांची अविकसित देशांतील भांडवलगुंतवण होय.

दुसऱ्या जागतिक युद्धापूर्वी अशी भांडवल-गुंतवण हा त्या काळातल्या वसाहतींचा वा उपेक्षित देशांचा विकासासाठी भांडवलगुंतवण मिळवण्याचा व्यापाराव्यतिरिक्त मुख्य मार्ग होता. 'ईस्ट इंडिजमधील प्रचंड बागायती, लॅटिन अमेरिकेतील प्रचंड खाणी, आफ्रिकेतील वनस्पती तेलाचे घाणे, पाश्चात्त्य देशांनी पुरवलेल्या भांडवलामुळे निर्माले व व्यवस्थित चालू राहिले. १९०० ते १९१४ च्या दरम्यान इंग्लंडचे सात टक्के राष्ट्रीय उत्पन्न मुख्यतः अपूर्ण-विकसित देशांकडे गुंतवणीसाठी निर्यात केले गेले हे उल्लेखनीय आहे.

पाश्चात्त्य देशाने आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या डोळ्यांत भरेल असा भाग मागासलेल्या भागात नवे अर्थोद्योग सुरू करण्यासाठी पाठवला तर विकासाचा प्रश्न तेवढा बिकट राहणार नाही. पण युद्धापूर्वीची होती त्याच अल्पांशानेच

आता खाजगी गुंतवण होत आहे. इंग्लंड आता बाहेर फक्त एक टक्का राष्ट्रीय उत्पन्न गुंतवत आहे व त्याचाही फक्त एक-तृतीयांश भाग गरीब देशांकडे जात आहे. युनायटेड स्टेट्स राष्ट्रीय उत्पन्नाचा एक-दशांश ते एकपंचमांश टक्के भाग मागासलेल्या देशांत गुंतवत आहे आणि त्यातील साठ टक्के भाग उत्तर आफ्रिका, लॅटिन अमेरिका व नजीक पूर्वेकडील देशांतल्या तेलखाणीतच आहे. खाजगी भांडवलगुंतवणीची पायरी इतक्या झपाट्याने खाली आली त्याचा खुलासा करणे कठीण नाही. मायदेश आणि वसाहती देश हा संबंध आता कोलमडला आहे आणि त्याबरोबर भांडवलाला आकर्षित करणारी खास उत्पादनक्षेत्रे व प्रोत्साहनेही नामशेष झाली आहेत. दुसऱ्या जागतिक युद्धाने जो विध्वंस झाला त्यामुळे नेतृत्व करणाऱ्या युरोपातील देशांना हानी सोसावी लागली आणि युरोपातच तेजी येऊन युरोपीय देशांतील भांडवलनिर्मितीकडे पैशाचा ओघ वळला. अनिश्चित राजकारण व विकासावस्थेचा आर्थिक ताण यांमुळेही परकीय भांडवलाच्या अनिर्बंध मुक्त-प्रवाहाच्या मार्गात प्रचंड अडथळे निर्माण झाले आहेत हे कारणही कमी महत्त्वाचे नाही.

हेही खरे आहे की, कमी अधला तरी खाजगी गुंतवणीचा प्रवाह वाहत आहे. १९५५ पासून स्थूलमानाने दर वर्षी दोन अब्ज डॉलर्स, प्रामुख्याने युरोपातून, खाजगी कर्जाच्या अथवा खाजगी गुंतवणीच्या रूपाने श्रीमान देशांतून गरीब देशांकडे गेले आहेत. ते ज्यांना मिळाले त्या देशांना दुहेरी फायदा झाला आहे. एकतर भांडवली रकमांच्या मोठ्या भागाचे परिवर्तन भांडवली मालमत्तेत झाले आहे आणि त्यामुळे मागासलेल्या देशांच्या उत्पादनाच्या व निर्यातीच्या सामर्थ्यात वाढ झाली आहे. दुसरे असे की, बहुतेक नव्या परकी अर्थोद्योगांनी त्या त्या देशात कर भरण्यामुळे तेथील सरकारचे सांपत्तिक कर-सामर्थ्य वाढले आहे. लॅटिन अमेरिकेत एकंदर करांच्या सुमारे वीस टक्के कर अमेरिकन कंपन्यांनी भरला आहे.

तरी पण खाजगी भांडवलाने विकासप्रक्रियेला उत्तेजन देण्यात जो कार्यभाग उचलला आहे त्याबाबत अतिशयोक्ती करण्यात अर्थ नाही. खाजगी भांडवल मोठ्या प्रमाणात तेल, खनिज द्रव्ये यांसारख्या कर्षणक उद्योगातच गुंतले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, अपूर्णविकसित देशांतील अर्थोद्योगापासून

ब्याज, नफारूपाने प्रगत देशांतील संस्थामालकांना जी प्राप्ती होते त्यातील अर्धी इराक, व्हेनिझुएला या तेलाचे उत्पादन करणाऱ्या प्रमुख देशांतून होते.

कर्षणक उद्योगातील गुंतवण ज्या देशात ती आहे तेथील सकल आर्थिक जीवनावर फारच मर्यादित प्रभाव पाडते. प्रचंड कर्षणक उद्योगांना भोवतालच्या आर्थिक वातावरणात स्वयंपूर्ण व स्वतंत्र अस्तित्व असलेले विभाग यापलीकडे महत्त्व नाही.

याचा अर्थ कर्षणकारी गुंतवण विकासदृष्ट्या महत्त्वाची नाही असा नाही. सर्व अविकसित खनिजोद्योगांच्या भरभराटीत या ना त्या प्रकारे सहभागी होतात व त्यांना मिळणाऱ्या बाट्याचा विकासकार्याला आधार मिळू शकतो, ह्याचा उल्लेख यापूर्वीच झाला आहे. तो मिळतो का नाही हे अर्थातच राजकीय सत्तेच्या स्वरूपावर अवलंबून असते. कुवैतमध्ये जी आधुनिक-सरंजामशाही आहे ती अशा अर्थोद्योगातील प्राप्तीचा एक-तृतीयांश लोक कल्याणासाठी, एक-तृतीयांश सर्वसामान्य प्रशासनावर व एक-तृतीयांश स्व-समृद्धीवर खर्च करते आणि परिणामी कुवैतचा शेख बँक ऑफ इंग्लंडमधला सर्वांत मोठा खाजगी ठेवधारक म्हणून प्रसिद्ध पावला आहे. इराकमध्ये तेलापासून मिळणारी बरीचशी स्वामित्वप्राप्ती विकास-प्रकल्पासाठी उघडपणे राखून ठेवण्यात आली आहे. आणि लॅटिन अमेरिकेतही तेलाच्या उत्पन्नामुळे अनेक विकास-योजनांना वित्तपुरवठा करणे शक्य झाले आहे.

तरीही कर्षणकारी उद्योग भविष्यकाळात विकासात प्रभावी कार्यभाग उचलतील हे असंभवनीय वाटते. त्यापेक्षा ज्या देशात विकासगती द्रुत झाली आहे तेथे खाजगी कारखानदारी गुंतवण-विकासाला जोराची चालना देईल हे अधिक शक्य आहे. प्रगत होऊ लागलेल्या अविकसित देशांत खाजगी गुंतवणीतील वैविध्य व तिचा प्रभाव वाढत आहे असे दिसते. जोरदार महान आरोहण सुरू झाल्यानंतर विकासाला अधिक गती देण्याचे महत्त्वाचे कार्य खाजगी गुंतवण करील हे शक्य आहे. ब्रिटिश भांडवलाने १९ व्या शतकात अमेरिकेच्या द्रुत गतीने विकासाच्या काळात जो महत्त्वाचा कार्यभाग पार पाडला तो विसरून चालणार नाही.

खाजगी गुंतवणीचा प्रवाह नजीकच्या भविष्यकाळात फार वाढेल अशी अपेक्षा करणे सद्यःस्थिती पाहता अकाली ठरेल. अनेक अविकसित देश परकी

भांडवलावर कडक निर्बंध घालतात. काही तर सरळसरळ विरोध करतात. परदेशांत भांडवल-गुंतवण करणाऱ्यांचे राजकीय कारणामुळे नुकसान झाल्यास ते भरून देण्याचा धाडसी कार्यक्रम युनायटेड स्टेटस्ने आखल्यास अशा गोष्टीतला धोका बराच कमी होईल. तरीही एक मोठी अडचण आहे. मागासलेल्या देशांत परकी किंवा देशी, किफायतशीर भांडवलगुंतवणीसाठी उपलब्ध असलेले क्षेत्र फार लहान आहे म्हणजे मोठी व विविधांगी खाजगी भांडवल-गुंतवण केल्यापासून प्रगत देशांना राजकीय व आर्थिक सावधगिरी परावृत्त करते आणि महान आरोहणाच्या मार्गावरील पहिले पाऊल टाकणे सुद्धा ज्यांना फार जिकिरीचे होत आहे त्यांच्या बाबतीत हे विशेषतः खरे आहे.

परदेशीय मदत :

आता आपण प्रगत देशांना आर्थिक विकासाला साहाय्य करण्याचे जे जे मार्ग आहेत त्यांतील शेवटच्याकडे म्हणजे आंतरराष्ट्रीय मदतीकडे वळू. हा विषय असा आहे की, त्यात वर्तमानकाळ व गतकाळ यांत अजिबात सारखेपणा नाही. आंतरराष्ट्रीय व्यापार व परकी खाजगी गुंतवण या गोष्टी अति प्राचीन आहेत. पण श्रीमान देशांनी गरीब देशाकडे त्या देशांना आपल्य शक्य तेवढ्या जवळच्या पातळीवर आणण्याच्या हेतूने केलेले संपत्तीचे सहेतुक देशांतर ही पृथ्वीतलावरील अभिनव गोष्ट आहे.

परकी मदत नवी असल्यामुळे तो विषय बव्हंशी भोंगळ झाला आहे. त्यात दोन देशांतील आर्थिक व्यवहार जसे येतात तसे जागतिक बँकेचे किंवा राष्ट्रसंघाचे अनेकमुखी व्यवहारही येतात. त्यात देणग्यांचा जसा अंतर्भाव होतो तसा कर्जाचाही होतो. लष्करी अथवा बिनलष्करी हेतूने केलेले व्यवहारही त्यात समाविष्ट होतात. आणि 'भले' म्हणवून घेण्याच्या स्पर्धेत आर्थिक विकासाला हातभार लावण्याचे 'श्रेय' पदरात पडावे म्हणून युरोपातील काही देश निर्भेळ व्यापारी कर्जे अथवा हप्ता सरळ 'परकी मदत' म्हणून दाखवण्यास मागेपुढे पाहात नाहीत.

त्यामुळे कर्जाच्या वा मदतीच्या स्वरूपात प्रगत जगाकडून अप्रगत जगाकडे बिनलष्करी भांडवली मदत किती होते यांचा अंदाज करणे सोपे नाही. राष्ट्रसंघाच्या आकडेतज्ज्ञांच्या अंदाजानुसार मदतीचा आकडा वर्षाला पाच अब्ज

डॉलर असून दहा वर्षांपूर्वीच्या अंदाजाच्या तो दुप्पट आहे. राजकीय अनिश्चिततेच्या वातावरणात जागतिक व्यापारापेक्षा परकी मदत हा अविकसित देशांना अधिक खात्रीचा आधार ठरला आहे हे उल्लेखनीय होय.

मदतीची रक्कम अत्यल्प आहे असे सकृद्दर्शनी वाटते. परराष्ट्रीय मदत खूप असेल असे आपण धरून चालतो. त्यामुळे तिचे प्रमाण माफक आहे ही जाणीव अस्वस्थ करते. अविकसनाच्या समस्येचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेता, परकी मदतीचा प्रवाह फार क्षीण आहे. वर्षाला पाच अब्ज ही रक्कम अविकसित देशांच्या उत्पादनाचा दोन तीन टक्के भाग आहे आणि त्याच्या निर्यातप्राप्तीच्या १५ टक्क्यांपेक्षा कमी आहे.

तरीपण अपूर्णविकसित देशांतील वार्षिक भांडवल-संचयाच्या मानाने परकी मदतीची रक्कम लहान नाही. परकी मदत अविकसित जगातील भांडवल-निर्मितीच्या जवळ जवळ तीन टक्के आहे. (साम्यवादी चीन वगळून) परकी मदतीच्या अभावी अपूर्णविकसित लोकसंख्यावाढीला न जुमानता अत्यल्प राहणीमान कसेबसे टिकवून धरू शकतील असा ह्याचा अर्थ होतो. त्यापेक्षा अधिक जी काही अल्पशी प्रगती होत आहे ती आंतरराष्ट्रीय साहाय्यामुळे भांडवलात पडणाऱ्या भरीमुळे होय.

परकी मदत भरघोस प्रमाणात येईल काय ? पाश्चात्त्य जग आपली मदत वाढवू शकेल यात संशय नाही. मागासलेल्या देशांच्या आर्थिक विकासाला युनायटेड स्टेट्स्ची जी एकंदर मदत होते तिच्यातला लष्करी अंश काढून टाकला तर ती त्या देशाच्या (अमेरिकेच्या) राष्ट्रीय उत्पन्नाच्या अर्धा टक्क्या-एवढी देखील नाही आणि इतर पाश्चात्त्य देशांच्या बाबतीत ती त्याहीपेक्षा कमी आहे, संयुक्त राष्ट्रसंघाकडून होणाऱ्या मदतीचे प्रमाण क्षुल्लक आहे. उदाहरणार्थ UNICEF या संस्थेचा वार्षिक खर्च न्यूयॉर्क शहरातील कल्याणकारी कार्यक्रमासाठी पुरेसा होईल एवढा देखील नाही. संयुक्त राष्ट्रसंघाच्या खास जागतिक निधीतून होणारा खर्च अमेरिका भारतावर जेवढा खर्च करते तेवढा देखील नाही. मदत कमी होते याचे कारण मदत करण्याचे सामर्थ्य पाश्चात्त्य देशांत नाही हे नसून अपूर्णविकसित देशांना सांपत्तिक मदत करण्याची तयारी नाही हे उघड आहे.

आंतरराष्ट्रीय साहाय्य किती प्रमाणात वाढवता येईल, हे बऱ्याच प्रमाणात

पाश्चात्त्य जगातील अंतर्गत राजकारणावर अवलंबून राहील. अमेरिका व युरोप यांची आर्थिक भागीदारी – जिच्याबद्दल वाटाघाटी चालल्या आहेत ती पक्की झाली आणि मदत वाढण्याला जो अंतर्गत विरोध आहे तो परिणामकारक न होईल एवढा कमी झाला तर ॲटलांटिक राष्ट्रगटाला अपूर्णविकसित देशांतील भांडवलगुंतवणीसाठी वर्षाला दहा ते वीस अब्ज डॉलर्स बाजूस राखता येतील.

मात्र येथे हा विषय संपत नाही. एवढी प्रचंड रक्कम अपूर्णविकसित देशांत गुंतवणे शक्य आहे की नाही हा दुसरा प्रश्न आहे. नजीकच्या भविष्यकाळात जे देश विकासप्रकल्प उभे करण्यासाठी व त्यांना मनुष्यबळ पुरविण्यासाठी अक्षरशः झटापट करीत आहेत, त्यांत एवढी प्रचंड रक्कम ओतणे म्हणजे चलनवाढीच्या प्रक्रियेला–जी कित्येक अविकसित देशांत आधीच आटोक्याबाहेर गेली आहे– अधिक गती देणे ठरेल. आंतरराष्ट्रीय खर्चाचे दरवाजे त्वरेने खुले करणे हे दुर्दैवाने त्यांना चलनवाढीच्या आपत्तीत अधिकच लोटण्याजोगे आहे.

विद्यमान परिस्थितीत खेदजनक काही असेल तर ते हे की, अमर्याद भांडवल व अमाप सदिच्छा असली तरी बरेचसे अविकसित देश किती मदत पचवू शकतील याला मर्यादा आहे. उदाहरणार्थ, भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत फक्त २३ अब्ज डॉलर्स खर्च पाच वर्षांत केला जावयाचा आहे व त्यातील फक्त सहा अब्ज डॉलर्स बाह्य मदतीतून मिळवावयाचे आहेत. तरीही अनेक अर्थशास्त्रज्ञांच्या मते भारताच्या गरजांच्या मानाने अति माफक असलेली ही योजना हव्या असलेल्या प्रमाणात मनुष्यबळ व वित्त मिळविण्यास असमर्थ ठरेल.

म्हणून नजीकच्या भविष्यकाळात आंतरराष्ट्रीय मदत वाढविण्यास असलेला वाव खरोखरच फार मोठा नाही. जे निरीक्षक विकासाच्या मंदगतीकडे पाहून कासावीस होतात आणि मदतीचा प्रचंड कार्यक्रम आखल्यास यक्षिणीची कांडी फिरेल असे समजतात त्यांचे ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष होते. मदतीचा पैसा कसा वापरला जाईल हा प्रश्न त्यांना सुचतच नाही. प्रचंड प्रमाणावर मदतीचा पैसा आल्यास तो वापरण्यासाठी जे प्रचंड मनुष्यबळ लागेल त्याचे संघटन कोणी करावयाचे ? कोणत्या प्रकल्पावर त्याचे श्रम गुंतवावयाचे ? क्रयशक्तीत प्रचंड वाढ झाल्यामुळे कमतर असलेल्या धान्याचे भाव वाढतील त्याचे काय ? हे प्रश्न मदतीचे उत्साही पुरस्कर्ते क्वचितच विचारतात; पण ते

आपल्याला प्रत्यक्ष अडचणींची काहीशी कल्पना देतात. खरे म्हणजे, असा मदतीचा कार्यक्रम व्यवहार्य व्हावयाचा झाल्यास एखादा देश ताब्यात घेणे, खालपासून वरपर्यंत त्याच्या मनुष्यबळाचे संघटन व संयोजन करणे आणि कडक अशी नियंत्रणे व दंड बसवणे हा उपाय आहे. याच मार्गाने शेवटी अविकसित देश गर्तेतून वर येईल. पण हा मार्ग पाश्चात्त्य देशांना परवडणार नाही आणि अविकसित देशांना रुचणार नाही.

तात्कडतोब बऱ्याच प्रमाणात मदत वाढल्यास ती उपयुक्त ठरणार नाही किंवा मदतीची उपयुक्तता वाढविण्याच्या मार्गात येणारे अडथळे दूर करण्याचा जोरदार प्रयत्न करण्याची आवश्यकता नाही असा वरील विचार मांडण्यातील आशय नाही. सध्या जे व जेवढे केले जात आहे त्यापेक्षा अधिक काही करणे शक्य आहे व ते केले पाहिजे हे संशयातीत आहे. प्रचंड प्रमाणावर धान्य पुरविल्यास औद्योगीकरणाचा चलनवृद्धिकारक ताण कमी होईल. या उपायाचा प्रयोग जवळजवळ झालेलाच नाही. वापरून जुनी झालेली यंत्रे अथवा वाहने किंवा सेव्य पदार्थ बाहेरील देशांत पाठवण्याची शक्याशक्यता किती याचा संपूर्ण विचार झालेला नाही. प्रगत देशांतही कितीतरी भांडवलगुंतवण चुकीच्या मार्गाने होत आहे हे पाहता परदेशी भांडवल गुंतवताना आपण जे बारकावे काढत बसतो त्यांतील व्यर्थता जाणवते.अति सावधगिरीमुळे काही उपयुक्त प्रकल्पही बाजूला राहतात असे होण्यापेक्षा अति उत्साहाच्या भरात काही मूर्खपणाचे प्रकल्प हाती घेतले जातात, असे होणे हे केव्हाही निःसंशय चांगले.

पण मूळ मुद्दा हा आहे की, जगातली सर्व शक्ती व औदार्य एक झाले तरी या घटकेला आपण किती साध्य करू शकू याला मर्यादा आहे. अपूर्णविकसित देशांची वास्तव पचनशक्ती व पाश्चात्त्यांचे वास्तव राजकारण लक्षात घेता ती मर्यादा प्रचलित प्रयत्नांच्या फार पलीकडील नाही. तेव्हा सध्याची वाढती आंतरराष्ट्रीय मदत चालू राहील, फार तर तिच्यात माफक प्रमाणात आणखी वाढ होईल यापेक्षा अधिक आशा करणे व्यर्थ ठरेल. १९७० च्या सुमारास पाश्चात्त्य राष्ट्रे व संयुक्त राष्ट्रसंघ यांच्याकडून जास्तीत जास्त दहा अब्ज डॉलर्स एवढी मदत वर्षाकाठी मिळविण्याची शक्यता निर्माण होईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही. आणि ही रक्कम देखील पाश्चात्त्यांची देण्याची तयारी आणि पौर्वात्य व दाक्षिणात्य देशांची घेण्याची तयारी यापलीकडली ठरेल.

एकंदर परिणाम :

ज्या विविध गोष्टींचा आपण आत्तापर्यंत विचार केला त्यांना एकत्र गोवून विकासाच्या कोष्टकाची पुनर्घटना करणे आता आवश्यक आहे. त्या कोष्टकातील विविध परिवर्तनीय घटकांत नाट्यपूर्ण सुधारणा होणे शक्य नाही, काहींच्या बाबतीत आशेला थोडी जागा आहे तर काही अशाश्वत आहेत हे आपण पाहिलेच. तरी पण जेथे ते अगदी वस्तुस्थितीला सोडून होणार नाही तेथे आशा बाळगून अडचणी सोडवण्याचा धीटपणे प्रयत्न करण्यास हरकत नाही.

विकासाचे अर्थशास्त्र हे मूलतः भांडवलसंचयाचे अर्थशास्त्र आहे हे पुनः-पुन्हा प्रथमच स्पष्ट केलेले बरे. १९५८ मध्ये अमेरिकेतील एकूण भांडवल दरमाणशी–लहान मुले धरून– दहा हजार डॉलर्स होते. एवढे भांडवल, कालांतराने का होईना जमवणे हे अविकसित देशांचे ध्येय असले पाहिजे.

हे अर्थात ताबडतोब शक्य नाही. असे समजू की तूर्त अविकसित देशांनी अमेरिकेच्या दहा टक्के म्हणजे दर माणशी १०० डॉलर्स एवढेच भांडवल गोळा करण्याची आकांक्षा धरणे युक्त होईल. भांडवलाची उत्पादकता भरपूर आहे असे गृहीत धरल्यास त्यायोगे ३०० ते ४०० डॉलर्सचे वार्षिक उत्पादन प्रतिवर्षी वाढवता येईल व दरमाणशी उत्पादन तिप्पट अथवा चौपट होईल.

सध्या अविकसित देश १० ते २० अब्ज डॉलर्सचा दरवर्षी भांडवलसंचय करीत आहेत. त्यातील दोन-तृतीयांश अंतर्गत संचय असून त्याचा बाह्य मदतीशी काही संबंध नाही. पण बचत वाढवण्याचा व गुंतवणीची कार्यक्षमता वाढवण्याचा भगीरथ प्रयत्न केला, तसेच परराष्ट्रीय व्यापार, गुंतवण व मदत यांचा प्रवाह वेगवान झाला तर वार्षिक भांडवलसंचयाचे जे लक्ष्य मानले आहे ते गाठण्यास निदान पंचवीस वर्षे लागतील.

पण दुर्दैवाने विकासाचे हे पूर्ण समीकरण नाही. अभूतपूर्व संचयाच्या ह्या पंचवीस वर्षांत लोकसंख्या वाढत राहील हे लक्षात ठेवले पाहिजे. १९८५ च्या सुमारास साम्यवादीतर अविकसित जगात दीड अब्जाऐवजी सव्वादोन अब्ज किंवा अधिकच लोकसंख्या असेल. त्यामुळे एका पिढीच्या अखंड प्रयत्नानंतरही अपूर्णविकसित जगातील वार्षिक सरासरी उत्पन्न अमेरिकन प्रातिनिधिक कुटुंबाच्या दोन आठवड्यांच्या उत्पन्नाएवढे असेल.

अतिशय आशादायक गृहीते धरून काढलेल्या या निराशाजनक निष्कर्षांच्या

आधाराने एक महत्त्वाचे विधान करता येईल. ते हे की पुढील दहा-वीस वर्षांत जगातील दरिद्री लोकांचे जीवन फारसे सुधारणार नाही. गेल्या दहा वर्षांतील विकासाचा परिणाम म्हणजे मागासलेल्या प्रदेशांची सरासरी चलनप्राप्ती वर्षाला फक्त एक डॉलर वाढली आहे हे आपण पाहिलेच आहे. राष्ट्रसंघाच्या अर्थशास्त्रज्ञांची अतिशय अनुकूल भाकिते खरी ठरली तर पाचदहा वर्षांत ती दोन डॉलरपर्यंत वाढू शकेल. वीस-तीस वर्षांत वार्षिक वाढ दहा डॉलरपर्यंत चढेल. मेक्सिको, ब्राझिलसारख्या काही देशांत ही वाढ खचितच बरीच अधिक असेल आणि सौदी अरेबिया, घानासारख्या देशांत ती कमी असेल. तरीपण अपूर्णविकसित जगाचा साकल्याने विचार केल्यास, एका पिढीने आजच्यापेक्षा अधिक प्रमाणात आणि अधिक प्रभावीपणे प्रयत्न केला तरीही तिचे जीवन-चित्र आजच्यापेक्षा विशेष वेगळे असणार नाही असे म्हणावे लागते.

याचा अर्थ आर्थिक विकास होणार नाही असा नाही. उलट रस्ते, शाळा, कारखाने इत्यादिकांच्या रूपाने अधिक विकसित अर्थव्यवस्थेचे स्वरूप तेव्हा स्पष्ट होऊ लागेल. आजच्यापेक्षा अधिक दृश्य स्वरूपात स्वयंपोषक भांडवल-निर्माणक्षेत्राची बीजे ओळखता येऊ लागतील. त्याहीपेक्षा महत्त्वाचे हे की, साक्षरतेची देणगी, सुधारलेले सार्वजनिक आरोग्य यांसारखे अमोल अनार्थिक फायदे घवघवीत प्रमाणात मिळू लागतील. तरी पण भुकेकंगालपणा, फाटकी-तुटकी वस्त्रे, गलिच्छ वस्त्या यांसारखी दारिद्र्याची कुलक्षणे आजच्याप्रमाणेच मोठ्या प्रमाणात दिसत राहतीलच.

औद्योगीकरणपूर्व अवस्थेच्या बाळबंटातला भीषण भाग ज्यांनी आधीच ओलांडला आहे अशा काही देशांचे भवितव्य उज्ज्वल आहे हे पुनः आग्रहाने सांगणे खचितच आवश्यक आहे. पण कितीही आशा बाळगून विचार केला तरी या थोड्या सुदैवी देशांप्रमाणे इतर अनेकांची परिस्थिती नाही, हे सत्य लपवता येणार नाही. आपल्या आयुष्यात मोठी आणि सतत आर्थिक सुधारणा होईल असे मानणे ही आत्मवंचना आहे. तो दूरच्या भविष्याचा भाग आहे. मध्यंतरी मागासलेल्या देशातील विद्यमान पिढीला भूतकाळाचे ओझे पेलणे आणि ज्याचा आपण उपभोग घेऊ शकणार नाही त्या भविष्यकाळासाठी कष्ट करणे याखेरीज दुसरा मार्ग नाही.

● ●

७

सामाजिक ताण

विकासाच्या आर्थिक शक्याशक्यतेबाबत आपण जो विचार केला त्याचा शेवट तसा मवाळच आहे. विकासाचे वेळापत्रक दीर्घावधीचे असेल हे स्पष्ट आहे. उत्कर्षकाळ जवळच्या भविष्यकाळात शक्य ठरेल एवढा भांडवलसंचय, फारच थोड्या मागासलेल्या देशांनी केला आहे. त्यातील बहुतेकांना पुढील पिढीत औद्योगिक काळाची नव्हे तर औद्योगिक क्रांतिपूर्व काळाची पायाभरणी करावी लागेल. स्वयंपोषक प्रगतीऐवजी पूर्वतयारीत आपली शक्ती खर्च करावी लागेल.

पुनः हे ठासून सांगितले पाहिजे की, आर्थिक विकास त्यांच्या बाबतीत अशक्य आहे असा त्याचा अर्थ नाही. त्यात अनुल्लंघनीय अडथळे नाहीत. लोकसंख्यावाढ हा देखील तसा अडथळा नाही. पुढील कामगिरीची दिशा बरीच स्पष्ट दिसेल अशी आहे. शेतीची शास्त्रशुद्ध पुनर्रचना केवळ शेतीचा पाया भक्कम व्हावा म्हणूनच नव्हे तर भांडवली प्रकल्पासाठी मनुष्यबळ मोकळे करण्यासाठीही करावी लागेल. या मनुष्यबळाच्या साहाय्याने पुढील प्रगतीची भूमी तयार करण्यासाठी महान सामाजिक भांडवली प्रकल्प उभारावे लागतील. त्यानंतर सुरुवातीला व्यापार व मदत यांच्या बळावर होणाऱ्या आयातीचे अधिष्ठान असलेल्या औद्योगिक भांडवलाची निर्मिती करावी लागेल, आणि नंतरच्या काळात त्या भांडवलाच्या उत्पादक सामर्थ्याचा उपयोग करून भांडवल-उभारणी करावी लागेल. या सर्व कार्याचे सुसूत्रीकरण करण्यासाठी, नवी उत्पादनशक्ती निर्माण करणाऱ्या अर्थोद्योगांचे अग्रहक्क ठरविण्यासाठी एखादी विकास योजना लागेल.

तरीपण विकासाचे आराखडे एका प्रश्नाचे उत्तर देत नाहीत. नव्हे तो उपस्थित करीत नाहीत. विकासकार्य करणार ते कोण हा तो प्रश्न. या प्रश्नाचे उत्तर दिल्याखेरीज विकास-प्रक्रियेतील गतिमानतेची व विकासाच्या ताणाची पुरी कल्पना आपल्याला आली असे म्हणता यावयाचे नाही.

विकासकार :

खाजगी अर्थोद्योग हा विकासाचे साधन होऊ शकेल काय ? विकासप्रक्रियेत अंतर्भूत असलेले महान सामाजिक व आर्थिक परिवर्तन होण्यासाठी खाजगी नफ्याच्या प्रेरणेवर व बाजारपेठेच्या स्पर्धा-नियंत्रणांवर विसंबून राहता येईल काय ? पाश्चात्त्य देशांत अठराव्या एकोणिसाव्या शतकात बहुतांशाने याच मार्गाचा अवलंब करून विकास साधला गेला. विकासाचे हेच माध्यम पुनः एकदा पूर्वेकडे व दक्षिणेकडे वापरता येईल का ?

वरील कल्पना पाश्चात्त्य राष्ट्रांना स्वाभाविकपणेच रुचणारी अशी आहे. परंतु दुर्दैवाने अविकसित देशांना जुन्याच मार्गाने जावयास जे सांगतात त्यांना ह्याचा विसर पडतो की, त्यांच्या विकासकाळात पाश्चात्त्य देशांत जी परिस्थिती होती त्यापेक्षा मागासलेल्या देशांतील आजची परिस्थिती भिन्न आहे.

आज ज्याप्रमाणे अपूर्ण विकसित देश औद्योगीकरणाकडे शीघ्र व अकस्मात संक्रमण करू इच्छितात तसे पाश्चात्त्य देशांत घडलेले नाही. उलट पश्चिमेकडे उद्योगपर्व सुरू होण्यापूर्वी पूर्व तयारीसाठी मोठा काळ घालवण्यात आला. सरंजामशाही, अचलनीकृत, परंपराधिष्ठित समाजाचे सावकाश परिवर्तन भांडवलशाही, चलनीकृत, बाजारमार्गी समाजात चौदाव्या शतकापासून होत राहिले. सामाजिक राजकीय, सांस्कृतिक आघाड्यांवरील पूर्वतयारीसाठी त्याहीपेक्षा अधिक कालखंड लागला.

पूर्वतयारीसाठी वेळ मिळाला नसताही बहुतेक मागास देशांना औद्योगीकरणात प्रवेश करावा लागेल. मंद गतीने होणाऱ्या चलनीकरणामुळे त्यांचा परंपरागत समाज अद्याप वितळून गेला नाही. बाजाराकडे दृष्टी ठेवण्याची अजूनही सवय झाली नाही. त्याच्या मूलभूत सामाजिक संस्था, राजकीय चौकट, संस्कृती यांना अत्यावश्यक असे स्थैर्य प्राप्त झालेले नाही. त्यामुळे त्यांच्या बाबतीत आर्थिक विकास हा सामाजिक उत्क्रांतीचा उच्च बिंदू नसून एका समाजव्यवस्थेतून मूलतः भिन्न अशा दुसऱ्या समाजव्यवस्थेत एकदम घेतलेली उडी असते.

पश्चिमेची विकासाची वाटचाल सुरू झाली तेव्हा एकंदर जगात पश्चिमेला प्रमुख स्थान होते. लष्करी व व्यापारी दृष्ट्या पश्चिमेतील देश हा लुटारूंचा समूह होता. इंग्लंडच्या विकासाला प्रथमतःच जो जोर आला त्याला लुटीचा हातभार कमी लागला नाही. तुलनेने निकृष्ट अशा स्थानावर राहून दक्षिणेकडील व पूर्वेकडील देश आपल्या विकासाची सुरुवात करीत आहेत. ते भेदनीतीने पोखरलेले, बळी पडलेले, दर्जाने कमी असे देश आहेत. विकासासाठी त्यांना जागतिक आर्थिक दडपणाविरुद्ध झगडावे लागेल; त्यावर आरूढ होता येणार नाही.

त्याशिवाय वैशिष्ट्यपूर्ण अशा अंतर्गत अडचणींना तोंड द्यावे लागेल. अतिलोकसंख्येच्या परिस्थितीत पाश्चिमात्यांना विकासाची सुरुवात करावी लागली नाही. माल्थसचा इशारा लक्षात घेऊनही असे म्हणता येईल. माल्थसने भाकीत केलेली लोकसंख्येची दडपणे सध्याच्या जगावर जेवढी आहेत तेवढी पाश्चात्त्यांना तेव्हा भासली नाहीत व त्यांचा विकासाला लगाम घातला गेला नाही. आधुनिक शास्त्रांनी दहा वर्षांच्या अवधीत लोकसंख्यावाढीला मारक जोर देण्याचे कार्य त्या काळी केले नाही. आजच्या विकासशील प्रदेशांशी असलेला फरक यापेक्षा अधिक मोठा कोणताच नसावा. पाश्चात्त्यांना धीमेपणा दाखविणे शक्य होते, नव्या देशांना ते शक्य नाही.

शेवटी असे सांगितले पाहिजे की, पाश्चात्त्यांच्या तुलनेने अनेक दृष्टींनी तंग बंधनात जखडलेल्या अपूर्णविकसित राष्ट्रांना पाश्चात्त्यांना उपभोगावयास न मिळालेले एक स्वातंत्र्य मात्र आहे. त्यांना आपली अर्थव्यवस्था निवडण्याची संधी आहे, जी अठरा-एकोणिसाव्या शतकात उपलब्ध नव्हती. औद्योगिक श्रेष्ठत्वासाठी परस्परांशी झगडत असता पाश्चात्त्य राष्ट्रांनी अर्थव्यवस्थेचा एकच नमुना स्वीकारला. तो म्हणजे कमीअधिक प्रमाणात स्वातंत्र्य, अर्थोद्योगाला कमीअधिक प्रमाणात राज्यसंस्थेचे संरक्षण व उत्तेजन यांची जोड देणारा नमुना होय. विकासासाठी संपूर्णपणे नियोजित व नियंत्रित अर्थव्यवस्थेची कल्पना तेव्हा माहिती नव्हती आणि साहजिकच पर्याय म्हणून पुढे नव्हती. हा पर्याय अपूर्णविकसित देशांपुढे आहे आणि त्याची आकर्षणे जबरदस्त आहेत.

हे सर्व महत्त्वाचे फरक अपूर्णविकसित देशांची आजची व पाश्चात्त्यांची तेव्हाची परिस्थिती यांची तुलना करण्यातील व मागासलेल्या देशांना योग्य

मार्ग म्हणजे पाश्चात्त्यांच्या अनुभवाचे अनुकरण करणे असे सुचविण्यातील अडचणी सुचवितात. आणि या अडचणींखेरीज आणखी एक समस्या आहेच ती म्हणजे अपूर्णविकसित देशांत नवा उद्योग काढू पाहणाऱ्या खाजगी उद्योगपतीला पत्करावा लागणारा अतीव धोका ही होय. आपल्यासारख्या प्रगत अर्थव्यवस्थेत एखादा महत्त्वाकांक्षी उद्योगपती जेव्हा नवा अर्थोद्योग सुरू करतो तेव्हा बाजारातील क्रयशक्तीचा पुरेसा भाग आपल्या मालाकडे वळेल व आपली गुंतवण समर्थनीय ठरेल असा बराचसा रास्त विश्वास त्याला वाटत असतो. पण अविकसित जगात उद्योग काढू इच्छिणाऱ्याला ही खात्री नसते. क्रियाशील मागणीच्या साठ्याऐवजी अत्यल्प क्रयशक्ती त्याला विचारात घ्यावी लागते. जो उद्योगपती पुढे सरकतो, त्याला त्याच्या कष्टाचे फळ दुःखदायक नुकसानरूपानेच मिळण्याचा संभव असतो.

याचा अर्थ खाजगी भांडवलनिर्मिती होणार नाही असा नाही. खरे म्हणजे अशी भांडवलनिर्मिती हा विकासाचा महत्त्वाचा मार्ग आहे. पण त्यावरून एवढे समजते की, विकासकालीन पश्चिमेत गतिमान वातावरणात खाजगी भांडवल गुंतवणीचा कार्यभाग जेवढा होता त्यापेक्षा अविकसित देशांत तो कमी राहील. अपूर्णविकसित देशांत भांडवलदार विकासाचे नेतृत्व न करता नंतर त्याचा पाठ पुरावा करील असा संभव असतो. फायद्याची संधी दिसू लागली की ती घेण्यास जरी तो उत्सुक असला तरी विकासाचा मार्ग दाखवणारा पुढाकार घेण्यास तो उद्युक्त होईल असा संभव नाही.

परंपरागत व्यापारी दृष्टिकोणामुळे किंवा अद्यौगिक दृष्टिकोणाच्या अभावामुळे प्रतिकूल मनःप्रवृत्तीचे वातावरण व त्याला मिळालेली प्रतिकूल परिस्थितीची जोड यांमुळे गतिमान औद्योगिक नेतृत्वाचा अभाव दिसत आहे. अशा स्थितीत औद्योगीकरणाला चालना देण्याच्या कार्यात सरकारचा वाटा मोठा असणे अपरिहार्य आहे. विकासाचे नियोजन उद्योगक्षेत्रबाह्य सत्तेने केले तरच मंदगतीने का होईना विकास होत राहील म्हणूनच प्रत्येक अपूर्णविकसित देशात केंद्रीय सरकार महत्त्वाचा कार्यभाग स्वीकारीत असल्याचे दिसून येते. भारताच्या आर्थिक विकासावरचे एक तज्ज्ञ बिलफ्रेड मेलेनबाम म्हणतात की, इतर अपूर्णविकसित देशांप्रमाणे भारतात ज्या गोष्टी युनायटेड स्टेट्स्‌मध्ये निश्चितपणे खाजगी उद्योगपतीच्या क्षेत्रात पडतात, अशा कित्येक गोष्टी सरकारनेच

केल्या पाहिजेत. याची कारणे उद्योगपतींची संख्यात्मक कमतरता–जी भारतासारख्या इतर गरीब देशांच्या तुलनेने याबाबत सुदैवी असलेल्या देशांतही दिसून येते–हे होय. पोलाद कारखान्याएवढ्या मोठ्या अर्थोद्योगासाठी चलन-भांडवल उभारण्यातील अडचण ही शिवाय आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट ही की खाजगी उद्योगक्षेत्रात कित्येक दशके क्रियाहीनता झुकू लागेल अशी भीती असते.

सामाजिक ताण :

आर्थिक विकासासाठी अपेक्षित असणाऱ्या व समाजावर लादल्या जाणाऱ्या अनेक बदलांची नोंद आपण यापूर्वी केलीच आहे. निरक्षर शेतकऱ्यांना साक्षर शेतकरी बनवले पाहिजे. गलिच्छ वस्त्यांत राहणाऱ्या अगतिकांना शिस्तबद्ध कारखाना–कामगार केले पाहिजे. जुन्या व सत्ताधारी सामाजिक वर्गांचे सनातन हक्क काढून घेतले पाहिजेत. नव्या पण अननुभवी सामाजिक वर्गांवर मोठमोठ्या जबाबदाऱ्या टाकल्या पाहिजेत. सर्वांत मुख्य हे की, आर्थिक जीवनाचा आराखडा व गती बदलण्याच्या सर्वंकष व अखंड मोहिमेला विकासशील देशांच्या आचारविचारात दीर्घकाळपर्यंत मूलभूत स्थान मिळाले पाहिजे.

आपल्याकडे हे सर्व जीवनविषयक बदल इतिहासाचा भाग बनले असल्यामुळे हे बदल किती क्रांतिकारक उलथापालथ करणारे असतात याकडे आपले दुर्लक्ष होण्याचा संभव आहे. एकच उदाहरण द्यावयाचे झाल्यास शेतीच्या पुनर्घटनेचा विचार करताना जमीनसुधारणा करून हा प्रश्न सुटेल असे आपण धरून चालतो. ज्या देशांत जमीनमालकी हा सामाजिक हक्कांच्या बांधणीचा मध्यवर्ती आधारस्तंभ आहे त्या देशांत भूमिधारणातील सुधारणा ही जमीनदारांना द्यावी लागणारी अल्प किंमत नसून त्यांच्या संपत्तिसत्तेच्या मुळावर घाव घालणारी ती घटना आहे, हे आपण विसरतो. आपल्याहून श्रेष्ठ देशाने भागभांडवलधारणात आपण सुधारणा करून भागभांडवलाचे केंद्रीकरण कमी केले पाहिजे किंवा नष्टच केले पाहिजे, ही शर्त घालून मदत देऊ केलेली दिसून आली आहे. जुन्याची सुधारणा करण्यासाठी नवे स्वीकारण्यास भारतीय उद्योगपती मनाने तितका तयार नाही. ते काहीही असो. स्थूलमानाने भारतात सरकारला मोठ्या उद्योगांचे नेतृत्व घ्यावे लागेल.

सरकारच्या अपरिहार्य कार्यभागाची जाणीव जेव्हा होते तेव्हा फक्त या समस्येला तोंड फुटते. ब्राझील अथवा भारतासारख्या संमिश्र अर्थव्यवस्थेत विकास होण्यासाठी आवश्यक असलेले भांडवल कालांतराने निर्माण का होऊ नये याला तत्त्वतः काहींच कारण नाही. आर्थिक प्रगती ज्यात अंशतः राज्य-संस्थेकडून व अंशतः खाजगी अर्थोद्योगाकडून घडून येते अशा सरकार व उद्योगक्षेत्राच्या भागीदारीची शक्यता दर्शविणाऱ्या अनेक तात्त्विक मीमांसा उपलब्ध आहेत. ज्या काही निवडक देशांत थोड्या वर्षांच्या अवधीत नेत्रदीपक विकास दिसून येण्याची शक्यता आहे, अशांत अशी भागीदारी विकासयंत्रणा ठरू शकेल.

पण अपूर्णविकसित जगाच्या बहुतेक भागात विकासाचा कालावधी अनिश्चित एवढा दीर्घ असल्यामुळे अर्धवट भांडवलशाही, अर्धवट समाजवादी अशा संमिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करण्यात एका अतिमहत्त्वाच्या घटकाकडे दुर्लक्ष होते. तो घटक म्हणजे विकासाचा राजकीय–सामाजिक ताण होय. या ताणामुळे संमिश्र अर्थ-व्यवस्था या मवाळ उपायाची दिशा अतिशय कडकपणे नियंत्रित राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेकडे आहे अशी कल्पना आपण करू शकलो तर भूमिसुधारणा कितपत सुकर ठरेल याचा उमज आपल्याला पडू शकेल. भाग-भांडवलधारणात बदल या सूचनेला आपले जे कोणी सत्ताधीश असतील ते किती लौकर मान्यता देतील? याच न्यायाने ९० टक्के जमीन जेथे दहा टक्के लोकांच्या हातांत आहे अशा लॅटिन अमेरिकेत भूमिसुधारणेला लौकर मान्यता कशी मिळेल?

मेक्सिकोत १९१६ त भूमिसुधारणा झाली. पण त्यानंतरच्या पहिल्या अठरा वर्षांत फक्त सहा टक्के शेतजमिनीचे पुनर्विभाजन झाले हे आपल्याला माहीत आहे. बोलिव्हियात भूमिसुधारणेसाठी १९५२ मध्ये क्रांती व्हावी लागली. ग्वाटेमालात भूमिधारणपरिवर्तनासाठी झालेल्या क्रांतीचा रंग एवढा डावा होता की युनायटेड स्टेट्सला भीती वाटून भूमिसुधारणा करणाऱ्या सरकारला खाली आणण्यास त्याने मदत केली व त्यानंतर सत्तारूढ झालेल्या उजव्या सरकारच्या अमदानीत भूमिसुधारणा जवळजवळ थांबलीच आहे.

भूमिसुधारणा ही सामाजिक तणातणी निर्माण करणारी एकच गोष्ट नाही सामाजवादी शिक्का धारण केलेली राष्ट्रे देखील विकासाच्या अनुरोधाने वेतन-

वाढ मागणाऱ्या कामगार-संघटनांना मान्यता देताना किती खळखळ करतात ! अधिक महत्त्वाचा प्रश्न हा की अपूर्णविकसित देशांतील किसान-कामगारांचा, दलितवर्गविकासाचा दीर्घकाळ पडणारा बोजा व त्यातून उद्‌भवणारी निराशा पेलताना किती सहनशक्ती, किंवा तळमळ दाखवितो ?

विकास हा प्रचलित समाजव्यवस्थेची सखी असलेली जी उदासीनता तिचा सर्वांत मोठा शत्रू आहे हे ध्यानात ठेवलेले बरे. बदल जसा दिसू लागतो, विकासाच्या कल्पना पुढाऱ्यांकडून अनुयायांकडे जशा येतात तसा एक भयावह बदल होऊ लागतो. पीडित वर्ग जागा होतो आणि त्याची परिस्थिती एकंदरीत सुधारत असली तरी त्यात थोडीही कमतरता येईल असे दिसले तर त्याचा संताप होतो.

याचाच अर्थ असा की आर्थिक राहणीमानात सुधारणा झाल्यास पूर्वी नसलेले किंवा सुप्तावस्थेत असलेले सामाजिक ताणाचे प्रसंग उद्‌भवतात. या संदर्भात इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या प्रथमावस्थेत कामगार व भांडवलदार वर्गातील वाढत्या दरीतून निर्माण झालेले सामाजिक ताण लक्षात घेतले तरी आजच्या विकासशील देशांत पुढे काय वाढून ठेवले आहे याचे यथार्थ दृश्य आपल्या मनःचक्षूसमोर येऊ शकेल.

आर्थिक विकास ही दीर्घकाळ पण सुकरतेने होणारी यशाच्या एका टप्प्या-वर नेणारी प्रक्रिया आहे असे मानणे ही नुसती चूकच नव्हे, तर घोडचूक आहे. उलट तो एक प्रचंड सामाजिक उत्पात आहे असे मानणे योग्य ठरेल. या उत्पातात सापडणाऱ्या अनेक लोकांना विकासाचे महान सामाजिक परिवर्तन हे वाढत्या अपेक्षांची पूर्ता न वाटता अपेक्षांची काहीतरी हानी वाटेल किंवा सुखदायक फायदे अनुभवास न आणता गमावल्याची नवी जाणीव निर्माण करील असा संभव आहे.

राजकीय शक्याशक्यता :

हे सर्व बोचक विचार एकच दिशा दर्शवितात. विकासात अंतर्भूत असलेल्या सर्वांगीण बदलाला चालना देण्यात, मार्गदर्शन करण्यात, मर्यादा घालण्यात व त्याचे नियंत्रण करण्यात राजकीय नेतृत्वाचा कार्यभाग अत्यंत महत्त्वाचा आहे हेच ते दर्शवतात. महान आरोहणाला पुढे रेटण्याकरिता अत्यावश्यक असलेल्या

स्वार्थत्यागासाठी स्फूर्ती देण्याचे, दुःखदायक सामाजिक जुळणीसाठी आवाहन करण्याचे अथवा आज्ञा देऊन ती घडवून आणण्याचे, लोकांचा विश्वास–अनेकदा अंधश्रद्धा – संपादन करण्याचे कार्य फक्त शक्तिमान व गतिमान राजकीय नेतृत्वच करू शकेल.

हे नेतृत्व अविकसित राजकीय वातावरणात उदयाला यावयाचे आहे. अनेक मागासलेल्या प्रदेशांत राजसत्तेची उगमस्थाने फार मर्यादित आहेत. राजसत्ताधाऱ्यांचा परंपरागत वर्ग तेथे सरंजामशाहीचा अथवा सरदारशाहीचा वारसा चालवणारा आणि त्यामानाने व्यापारी हितसंबंधांपासून दूर असणारा असतो. त्याला अतिशय ध्येयवादी, सामान्यतः डावीकडे झुकणाऱ्या विचारवंत व राजकारण्यांचा गट विरोध करीत असतो. मतमतांतऱ्यांच्या भिन्नतेत मध्यावर सामान्यतः लष्कर असते आणि काही झाले तरी लष्करात स्थिर श्रेणीबद्ध संघटना तयार असते. अशा वातावरणात राजकीय सत्तेत परस्परापासून फार भिन्न अशी वेगवेगळी टोके दिसून येतात आणि आर्थिक विकास हा एकात्मतेचे नव्हे तर राजकीय संघर्ष वाढविण्याचे व मतामतांतील तफावत अधिक व्यापक करण्याचे साधन ठरतो.

अविकसित देशांतील अनेक सरकारांनी विशेषतः अर्धवट सरंजामशाही स्वरूप असलेल्या सरकारांनी विकासाच्या शक्यतेचा स्वीकार मनोभावाने केलाच नाही. त्यातील हक्कदार वर्ग जो असतो त्याला विकासाच्या गतिमानतेमुळे जे जे क्रांतिकारक प्रवाह अनुभवण्याचा संभव असतो त्याचा सुगावा अधिक लागतो आणि त्यामुळे मोठमोठे प्रकल्प हाती घेऊन विकासाची प्रक्रिया संपूर्णपणे गतिमान करण्यासाठी लागणारा सर्वांगीण प्रयत्न करण्यास ते फार उत्साही नसतात. आर्थिक विकासामुळे मवाळ स्वरूपाच्या राजकीय सुधारणा घडून येतात असे नव्हे तर स्फोटक स्वरूपाचे राजकीय बदलही घडून येतात. आणि त्यात सामाजिक वर्ग आणि मूलसंस्था संपूर्णतया नष्ट होण्याचा संभव असतो.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतच क्रांतिकारक उठावाची संभाव्यता अंतर्भूत आहे. अशा प्रकारच्या सर्व अस्थिर परिस्थितीत सुप्त शक्ती क्रियाशील होतील का? आणि होणार असतील तर त्या केव्हा, याबद्दल सर्वसामान्य अनुमान करणे कठीण आहे. उदासीनता विकासाला मारक असली तरी स्थितिशीलतेची शक्ती उठावाच्या शक्तीपेक्षा अधिक जोरदार असते. अशी अनेक उदाहरणे

इतिहासात आहेत. आणि काही विकासशील देश रक्तपात टाळून क्रांतिकारी सामाजिक बदल घडवून आणतील;–जसे इंग्लंडने औद्योगिक क्रांतिकाळात केले– हे शक्य आहे. या बाबतीत आशादायक अपेक्षा उघडपणे बाळगण्यात अर्थ नाही. पुढारलेल्यांची बरोबरी करण्याच्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित झालेल्या देशांत इतिहासात पुढाकार केलेल्या देशांपेक्षा क्रांतिकारक प्रवृत्ती प्रथम प्रबल असण्याचा फार संभव आहे. सामाजिक बदल जर गतिमान नसेल तर विरोधी राजकीय गटांत, मग ते साम्यवादी असोत किंवा विद्यमान समाजस्थितीला केवळ विरोध करणारे असोत, क्रांतिकारक बदलाचे बीजांकुर फुटण्याची संभाव्यता असते.

येत्या बीस-तीस वर्षांत दडपणे जशी वाढतील आणि अडचणी जशा स्पष्ट होत जातील तसे विकासाचे मार्गदर्शन निष्ठावंत क्रांतिकारक गटाकडून केले जाण्याची शक्यता आपण लक्षात घेतली पाहिजे. विकासाच्या व्याघ्रावर शामळू माणसे आरूढ होणार नाहीत किंवा मवाळ राज्यव्यवस्था अथवा अर्थव्यवस्था विकासाला रोखू अथवा गती देऊ शकणार नाहीत.

बहुतेक अपूर्णविकसित देशांत विकासाच्या नेतृत्वासाठी लष्करी हुकूमशाही अथवा कडवी नागरी हुकूमशाही यांपैकीच निवड होण्याचा संभव आहे. प्रा. मेसन म्हणतात, त्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत क्रांतिकारक विकासकर्ते लोकशाहीनिष्ठ भांडवलशाहीचा मार्ग स्वीकारण्याची शक्यता नाही. विकासाची मंद गती, वाढता सामाजिक ताण, महान आरोहणातील अनिवार्य कडक शिस्त लक्षात घेता ज्यांच्याकडून लोकांवर विकास लादला जाईल अशा अर्थव्यवस्था आणि राजवटी साकार होतील हे तर्कशास्त्राला धरून आहे.

पण प्रशासक कितीही कठोर असला तरी तो विकासाला गती देण्याचे काम विशिष्ट मर्यादेपर्यंतच करू शकेल. सुरुवातीला पार पाडावे लागणारे महान सामाजिक भांडवलउभारणीचे प्रकल्प कामगारसैन्ये त्यांच्या आधिपत्याखाली असल्याने केंद्रीय हुकूमशहाला सहजी पार पाडता येतील. पुरेशी परकी मदत असल्यास प्रभावी उद्योगव्यवस्था निर्माण करण्याच्या कार्याला मोक्याच्या क्षेत्रावर निष्ठुरपणे लक्ष केंद्रित करून बरीचशी गती देता येईल. तरीही प्रगतीची एकंदर गती सामाजिक बदलांच्या वेगावरच अवलंबून राहील आणि त्यापैकी लोकसंख्येतील बदल हुकूमशाही पद्धतींना जुमानीत नाहीत असेही दिसून

येईल. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट ही की, कितीही कडक शिस्त असली तरी भांडवलउभारणीच्या प्रक्रियेसाठी सेवनमान कमी करण्याच्या प्रयत्नामुळे असंतोष वाढतच राहील.

त्या असंतोषाला आर्थिक अपेक्षांच्या वाटेने जाऊ न देता, दुसऱ्या वाटा मोकळ्या करून द्याव्या लागतील. त्यामुळेच हेतुपूर्वक पोसला जाणारा राष्ट्रवाद, काळजीपूर्वक आखण्यात येणारा ध्येयवाद, इतकेच नव्हे तर लष्करी साहसे या गोष्टी विकासातून निघू लागतात. काही देशांत लोकांच्या भावनांचे अशा प्रकारे एकवटीकरण केल्यासच त्यांचा उत्साह व शक्ती नियंत्रित केली जाईल व त्यांना मोकळीक लाभेल.

थोडक्यात म्हणजे आर्थिक विकासात केवळ अंतर्गत क्रांतीची बीजे असतात असे नाही, तर वाढत्या आंतरराष्ट्रीय संघर्षाची बीजे असतात. त्यांतील काही संघर्ष फार महत्त्वाचे नसतील पण एवढे खरे की आर्थिक विकासामुळे आंतरराष्ट्रीय तणातणी चालूच राहील. पुष्कळदा असे जे विधान सहजगत्या केले जाते की, विकासामुळे जागतिक शांततेचा नवा प्रवाह वाहू लागेल ते बरोबर नाही.

साम्यवादाची संभाव्यता :

आतापर्यंत केलेला सर्व विचार आपल्याला अनिवार्यपणे साम्यवादाचा आर्थिक विकासाशी जो काय संबंध आहे त्याच्यापाशी आणून पोचवतो.हा संबंध फार खोलवर गेला आहे हे आत्तापर्यंतच्या विवेचनावरून उघड झालेले आहेच.

हे स्पष्टच आहे की विकासातून होणाऱ्या राजकीय उलथापालथीत साम्यवादी उठावाला अनुकूल अशी परिस्थिती अनेकदा लाभते. पण केवळ कटबाजीच्या प्रभावामुळे साम्यवादाची शक्यता निर्माण होत असेल तर तो प्रश्न फारसा गंभीर आहे असे म्हणता येणार नाही. महत्त्वाचे आहे ते हे की, अपूर्णविकसित देशांना साम्यवादाच्या क्रियाशीलतेचे आकर्षण वाटते. ते असे समजतात की, मागासलेल्या प्रदेशासाठी साम्यवाद ही अत्यंत योग्य अशी राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्था राहील.

साम्यवादाचा विकासाचा आराखडा हे गुपित नाही. प्रत्येक अपूर्णविकसित देशाने जे केले पाहिजे त्याचाच पुरस्कार साम्यवाद करतो. म्हणजे धान्याधिक्य निर्माण करण्यासाठी शेतीची पुनर्घटना, शेतीतून मुक्त झालेल्यांकडे ह्या धान्याची पाठवणी, भांडवलनिर्मितीसाठी ह्या कामगारांचा निष्ठुरपणे, सातत्याने निष्ठा-

कराड ... ठाण. स्टेशन.
नंबर ७४६२० दि: ...
क्रमांक ... २०१९ नं दि: ...
सामाजिक ताण : १०१
व. १५९७०

पूर्वक वापर. फरक एवढाच की तत्त्वतः तरी साम्यवादात हे काम केले जात असताना असाम्यवादी देशांत जसा अनास्था, घर्षण या गोष्टींना वाव दिला जातो तसा दिला जात नाही आणि त्यामुळे कामात अडथळा निर्माण होत नाही. जेथे जमीन हवी असेल तेथे ती घेतली जाते. जेथे कामगार हवे असतात तेथे ते पुरवले जातात. जेथे विरोध होतो तेथे त्यांची बीमोड केला जातो, जेथे मतभेद होतो तेथे तो दाबला जातो. नुकसान होण्याच्या भीतीने काचकूच करणाऱ्या संयोजकाच्या जागी कारखान्यातून व्यवस्थापकाची नियुक्ती केली जाते व त्यांना कामासंबंधी हुकूम दिले जातात. जुन्या समाजव्यवस्थेतील हक्कसंबंध व नव्या व्यवस्थेतील हक्कसंबंध यांचा सारासार, तौलनिक विचार करणाऱ्या सरकारच्या जागी भविष्याकडे दृष्टी ठेवणाऱ्या सरकारचीच स्थापना होते.

तत्त्व व व्यवहार यात फार फारकत आहे हे सांगायलाच पाहिजे असे नाही. साम्यवादी आर्थिक विकास विनाघर्षण किंवा सुकरपणे झाला आहे असे नाही. साम्यवादी प्रयोग अंशतः तरी अयशस्वी झाल्याची उदाहरणे विशेषतः शेतकी पुनर्घटनेच्या क्षेत्रात अनेक आहेत. पण त्या अपयशाची तुलना त्याही-पेक्षा मोठ्या अपयशाशी म्हणजे अनेक मागासलेल्या देशांत विकासाचा संपूर्ण अभाव जो दिसून येतो त्याच्याशी केली पाहिजे.

येथे हे मान्य करणे आवश्यक आहे की, साम्यवादाचे कार्य त्यातील सर्व उणीवा लक्षात घेऊनही डोळ्यांत भरणारे आहे. साम्यवादात होत असणाऱ्या फसवणुकीबाबत म्हणजे भरघोस वचने देऊन व आरोप करून जनतेचे लक्ष तिच्या हालचालीवरून उडवण्याबाबत, बनावट आकडेवारी तयार करण्याच्या त्यांच्या चातुर्याबाबत, खोट्या गोष्टी प्रसवण्याबाबत पाश्चात्त्यांच्या हेतूंना व कृतींना विकृत स्वरूप देण्याबाबत पाश्चात्य देशांत बराच गवगवा आहे. ते सर्व खरे असेलही. पण साम्यवाद जेव्हा आर्थिक विकासाची ग्वाही देतो तेव्हा तिचा पाया भक्कम असतो. चीनची शेती संकटात सापडेपर्यंत चीनमधील उत्पादन भारताच्या दुप्पट-तिप्पट तरी होते. आणि सध्याच्या धान्यसंकटातून चीन बाहेर पडला तर पुन्हा ते तेवढे होऊ शकेल. फक्त दोन पिढ्यांपूर्वी आज तुर्कस्थान व ब्राझील विकासाच्या ज्या अवस्थेत आहेत त्याच अवस्थेत असलेला रशिया, आज जागतिक औद्योगिक श्रेष्ठत्वाचे आव्हान देत आहे हे आपण विसरून चालणार नाही. अपूर्णविकसनातून बाहेर पडण्याचा साम्यवाद हा

जलद मार्ग असू शकेल आणि चिंतनीय गोष्ट ही की, जगातील अनेक प्रदेशांत असाम्यवादी विकास हा सर्वांत मंद ठरत आहे.

आपण हे आधीच पाहिले आहे की, विकासाला पुढे रेटण्याच्या साम्यवादाच्या तंत्रात गूढ वा गहन असे काहीच नाही. महत्त्वाचे आहे ते हे की विचारप्रणाली व राजकीय चळवळ या दोन्ही नात्यांनी समाजाची क्रांतिकारक पुनर्घटना करावयाची साम्यवादाची तयारी आहे आणि नेमकी हीच गोष्ट असाम्यवादी सरकारे टाळू पाहतात.

साम्यवादाची निर्घृण क्रांतिप्रवणताच पाश्चात्त्यांना असह्य वाटते. गुंतलेल्या हितसंबंधावरील साम्यवाद्यांचा हल्लाच केवळ पाश्चात्त्यांत प्रतिकूल ग्रह निर्माण करतो असे नाही. असाम्यवादी विचारांचा उद्धट अधिक्षेप, साम्यवादी विचाराचा अंध स्वीकार, यांत्रिक कार्यपद्धत यामुळेही पाश्चात्त्यांना साम्यवादाची घृणा येते, तसेच आजपर्यंत साम्यवादाने साधलेले फक्त हलाखीचे राहणीमानही त्या भावनेला मदत करते.

पण पौर्वात्यांवर व दाक्षिणात्यांवर साम्यवादाचा परिणाम हाच होतो असे नाही. राजकीय स्वातंत्र्य परिचित नसल्यामुळे उपाशी शेतकरी-कामगारांना त्याचा अभाव जाणवत नाही. वरिष्ठ वर्गाकडून होणाऱ्या जाचाची व अवहेलनेची सवय झाल्यामुळे आपल्या नव्या राज्यकर्त्यांच्या चाबकापुढे तो निर्विकारपणेच नमतो. ओझ्याने तो आधीच वाळलेला असल्यामुळे साम्यवादाने पडणारे जादा ओझे तो पेलू शकतो. आपल्या मुलानातवंडांना भूतकालीन अगतिकतेतून मुक्त होण्याची संधी मिळेल अशी आशा त्याला वाटल्यास तो ह्या सर्वांस तयार असतो. मागासलेल्या प्रदेशातील सामान्य माणसाला हलाखीच्या राहणीमानाने मुक्त अशी सध्याच्या साम्यवादी राष्ट्रांतील आर्थिक वास्तवताही पाश्चात्त्यांच्या नेत्रदीपक व फार वरच्या राहणीमानापेक्षा अधिक वस्तुस्थितिनिष्ठ, जवळची, शक्यतेच्या कोटीतली व चित्ताकर्षक वाटण्याचा संभव असतो.

हे विचार मांडणे याचा अर्थ विकासेच्छू देश अपरिहार्यपणे साम्यवादाच्या मार्गानेच जातील असे भविष्य वर्तवणे नाही. अपूर्णविकसित देशांतील क्रांतिकारक पुढाऱ्यांपैकी देखील फार थोडे साम्यवादाच्या रूढ मार्गाने जाऊ इच्छितात. त्यामुळे विकासेच्छू देशांना साम्यवादाच्या ध्येयाच्या व राजकारणाच्या आहारी जावे न लागता विकासाचे कार्य पार पाडता येणे शक्य आहे व

योग्यही आहे. या प्रश्नाबाबत घोपट भविष्यकथन करणे अशक्य आहे. विकासशील राष्ट्रांतील बरिष्ठ वर्गांच्या आवडीनिवडी व विकास-परिस्थितीतील दडपणे यांच्या संघर्षात निर्णायक प्रभाव अनेक घटकांचा पडू शकेल. उदाहरणार्थ, सनातन वरिष्ठाची प्रतिकारशक्ती, स्फूर्ती देणाऱ्या नव्या नेत्याचा उदय आणि त्याच्या ध्येयवादाचा रंग, असाम्यवादी गटांना शिस्त व उत्साह एकत्रित आणण्यात मिळणारे यश, स्थानिक साम्यवादी संघटनांचे यशापयश इत्यादींपैकी कोणतीही गोष्ट प्रभावी ठरेल.

विकासकारी क्रांतिकारक राजवटी शेवटी साम्यवादाच्या गोटात ढकलल्या जातील किंवा न जातील, पण त्या राजवटी समाजवादाच्या गोटात आहेत असे मानले जाईल, यात संशय नाही. प्रत्येक विकासशील देशाने–मग तो देश क्यूबा, चीनसारखा साम्यवादी असो किंवा सीरियाप्रमाणे उजवीकडे झुकणारे सरकार असणारा असो किंवा मेक्सिको–भारताप्रमाणे मध्यममार्गी असो–समाजवादाशी निष्ठा व्यक्त केली आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

वरील उदाहणावरून असे दिसते की, समाजवादी-छाप असलेल्या अर्थव्यवस्थांतील वैविध्याबाबत ग्रंथ लिहिता येतील. हे स्पष्ट आहे की अविकसित जगात सर्वत्र त्या शब्दाला आकर्षक नादमाधुर्य आहे. केवळ त्यातील सामाजिक न्यायाच्या कल्पनेमुळे हे आकर्षण प्राप्त झालेले नसून जलद विकासाचे वाहन या नात्याने अनियोजित अर्थव्यवस्थेच्या तुलनेने नियोजित अर्थव्यवस्थेला असलेल्या प्रतिष्ठेमुळे हे आकर्षण निर्माण झाले आहे.

थोडक्यात विकासक्रमातील अंतर्गत ताणाचा परिणाम साम्यवादाचा उदय जगभर होण्यात झाला आहे आणि या घटनेमुळे भांडवलशाही पाश्चात्त्य समाजाला अगदी वेगळी पार्श्वभूमी लाभली आहे. समाजवादाच्या ह्या मवाळ नमुन्यांना देखील हुकूमशाहीच्या व सामुदायिकीकरणाच्या प्रभावी शक्तीशी समाज घ्यावा लागणार आहे, हे भविष्य अचूक ठरण्याचा संभव आहे. हे प्रवाह अंतिम टोक गाठतील किंवा नाही हे संपूर्णतया अंतर्गत घटकावर मात्र अवलंबून नाही; विकासाच्या आव्हानाबाबत पाश्चात्त्यांची प्रतिक्रिया काय होईल यावर ते अंशतः अवलंबून राहील. त्या महत्त्वाच्या प्रतिक्रियेकडे आता वळले पाहिजे.

● ●

८

पाश्चात्त्यांना आव्हान

विकास-प्रक्रियेची वास्तवता अमेरिकेतील जनमत ज्या दोन गृहीत तत्त्वांवर अधिष्ठित आहे त्याच्या मुळालाच हात घालून त्याबाबत संशय निर्माण करते. त्यावरून असे स्पष्ट होते की आर्थिक विकास ही प्रक्रिया आपल्या मानवतावादी प्रेरणांची अव्यभिचारी निष्ठा मिळावी अशी नाही. त्यावरून असेही स्पष्ट होते की, अमेरिकेच्या जागतिक हितसंबंधांना पोषक अशी परिस्थिती निर्माण होण्यात आर्थिक विकासाची प्रत्यक्ष परिणती होणार नाही.

हे विचार अस्वस्थता निर्माण करणारे व गोंधळात टाकणारे आहेत. आर्थिक विकासाकडे आंतरराष्ट्रीय धर्मादायाचा भाग म्हणून पाहण्यास लोकमताला उत्तेजन देणे ही एक गोष्ट झाली आणि आर्थिक विकासासाठी, उद्याच्या पिढीसाठी आजच्या पिढीला किंवा आजच्या पिढीसाठी उद्याच्या पिढीला हेतुपूर्वक स्वार्थत्याग करायला लावणे ही अगदी वेगळी गोष्ट आहे. त्याचप्रमाणे महान आरोहणामुळे लोकशाहीच्या व मांडवलशाहीच्या प्रवृत्तींना प्रोत्साहन दिले जाईल असे गृहीत धरून त्यात अमेरिकेने सक्रिय सहभागी व्हावे अशी अपेक्षा करणे आणि ज्या प्रयत्नांची परिणती राजकीय हुकूमशाही व आर्थिक साम्यवाद यांत होण्याचा संभव आहे त्यांत अमेरिकेच्या सहभागाची अपेक्षा करणे ह्या दोन अगदी भिन्न गोष्टी आहेत.

अर्थात जागतिक दारिद्र्याच्या प्रश्नावर उपाययोजना करताना प्रचंड प्रयत्न करणाऱ्या क्रांतिकारकांची निष्ठा व तयारी आणि मानवतावाद्यांच्या मनाचा मोकळेपणा व विशालता यांचा समन्वय होईल अशी आशा कोणीही करील, स्वार्थत्यागाची आवश्यकता ब ज्यांना स्वार्थत्याग करावयाचा आहे त्यांच्याबद्दल

सहानुभूती या दोन्हींची सांगड घालणारा असा विकासाचा कार्यक्रम असावा, अशीही आशा कोणीही बाळगील. पण अशा प्रकारचे समन्वय होऊ शकत नसतील तर काय करावयाचे ? गतिशून्य समाजव्यवस्थेतील आघाडी उघडण्यात ज्या काही गोष्टी असतात त्यांतून स्वाभाविकपणेच संकुचित मनाचे आणि क्रूर क्रांतिकारक पुढे आल्यास काय करावयाचे ? मनाचा मोकळेपणा व विशालता या गोष्टी दारिद्र्यातून त्वरित सुटका मिळविण्यासाठी लागणाऱ्या कडक शिस्तीबरोबर एकत्र नांदू शकत नसतील तर काय करावे ? अशा सखोल प्रश्नांना सुलभ उत्तरे नाहीत. विकासातील कठीण समस्या आणि भवितव्यातील अडचणी, स्वार्थ व परमार्थ यातील मनाला दिलासा वाटणारी एकता साफ धुऊन काढतात आणि त्याऐवजी अटळ अशा दुष्परिणामांपैकी कमीत कमी जो वाईट असेल त्याची निवड ही अप्रिय गोष्ट करण्यास भाग पाडतात. जे आपल्या खाजगी नैतिक स्वरूपाच्या निर्णयाबाबत लागू पडते तेच राष्ट्राकडून घेतल्या जाणाऱ्या सार्वजनिक निर्णयांनाही लागू पडते. जे सरकारने केल्यास विकास ही हितकारक व अमेरिकेच्या ध्येयवादाशी आणि सामाजिक प्रक्रियांशी सुसंगत प्रक्रिया ठरेल अशी कोणतीही गोष्ट नाही. उलट आर्थिक विकासाने ही जाणीव आपल्यावर लादली गेली आहे की भवितव्यतेचे स्वरूप व आशय बदलण्याचे आपले सामर्थ्य पूर्वीपेक्षा फार कमी झालेले आहे ? आर्थिक विकासाचा प्रचंड जोर व त्यातील भयावह संभाव्य गोष्टी ह्यामुळे आपल्याला बचावाची बाजू स्वीकारावी लागली आहे व त्यामुळे घटनांना कलाटणी देण्याच्या आपल्या सामर्थ्यावर फार मर्यादा पडल्या आहेत.

ते अर्थात संपूर्णपणे नाहीसे झाले नाही. गतकालाप्रमाणेच थोडासा हस्तक्षेप करून अस्थिर पण आपल्याशी मैत्री ठेवणारी सरकारे आपल्याला उभी करता येतील व अस्थिर पण आपल्याशी शत्रुत्वाने वागणाऱ्या राजवटी उलथून टाकता येतील. पण रशियन आणि चिनी विरोधामुळे लष्करी कृती करून दूरवरच्या अविकसित देशांतील क्रांतीला आळा घालण्याच्या कामात आपल्याला अल्पच यश लाभू शकेल. तसेच लॅटिन अमेरिकेतील अमेरिकन-विरोधी भावनांमुळे तेथे केलेला मुत्सद्देगिरीचा हस्तक्षेप देखील धोक्याचा व कदाचित विनाशाचाही मार्ग ठरेल. विकासाची वाटचाल अडीअडचणींतून चालली असता, आपल्याला निष्क्रिय होऊन बाजूला राहावे लागेल हीच

शक्यता फार आहे. कारण ज्यांची धोरणे व कार्यक्रम आपण जे इष्ट समजतो त्याच्या अगदी विरुद्ध आहेत–अशा आफ्रिका, आशिया व दक्षिण अमेरिका या देशांतील राजवटींच्या कोंडाळ्यात आपण आहोत.

अलिप्ततेची संभाव्यता :

विकासातील क्रांतिकारक प्रवृत्तींचा बीमोड करण्यासाठी प्रत्यक्ष कृतीचा हस्तक्षेप शक्य नसेल तर दुसरे एक करणे शक्य आहे. जागतिक घटनांच्या अनिष्ट वाटचालीतून असा एक सूर निघणे शक्य आहे की अपूर्णविकसित जगापासून पाश्चात्त्यांनी, विशेषतः अमेरिकेने अलिप्त राहावे, म्हणजेच त्या देशांची मदत कमी करावी व महान आरोहणाला पाठिंबा देण्याचे किंवा त्यात सक्रिय भाग घेण्याचे टाळावे.

कच्च्या मालाचे उत्पादन करणाऱ्या मागासलेल्या देशांशी असलेले आपले संबंध पाश्चात्त्य देश कितपत तोडू शकतील ते सांगणे कठीण आहे. तसे त्यांना करता आल्यास पाश्चात्त्य देशांच्या दृष्टीने ती अतिशय अनिष्ट अशी घटना होईल यात बिलकुल संशय नाही. अपूर्णविकसित देशांतील सुप्तावस्थेतील सर्व प्रतिकूल प्रवाह अमेरिकेने विकासाकडे पाठ फिरविल्यास वेगवान होईल. भरपूर मदत करूनही आपल्याला विकासाचे क्रांतिपोषक परिणाम थोपवता येत नसतील अथवा त्यांची दिशा बदलता येत नसेल तर मदत नाकारून ते टाळता येणार नाहीत हे निश्चित. आपण पैसा दिला अथवा न दिला तरी क्रांती व्हावयाची असेल तर ती होईलच. आपण बाजूला राहिल्यामुळे प्रगतीचा वेग ताबडतोब कमी झाल्यास विकासातून उद्भवणाऱ्या क्रांतीत दिसून येणारी द्वेषाची भावना व गोंधळ वाढेल मात्र. आपण नाकारलेल्या सामग्रीचा पुरवठा काही प्रमाणात रशिया करू शकेल. त्यामुळे जागतिक मत व जागतिक राजकारणाचे प्रवाह त्या देशाला अनुकूल होऊन त्याना फायदा होईल. अलिप्तपणा स्वीकारल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचा प्रभाव–ज्याचा हल्ली काही प्रमाणात चांगला उपयोग होऊ शकतो, कमी होईल.

त्याहीपेक्षा अलिप्तपणाचा देशातच होणारा नैतिक परिणाम आत्मनाशाचा ठरेल. काही झाले तरी या दारिद्र्यमय जगात पाश्चात्त्य देश हे संपत्तीचे मोठे खजिनेहि आहेत. जगात अनेकांना पोट भरणे कठीण आहे, पण अमेरिकेत मात्र पडून राहिलेल्या धान्याचा त्रास होत आहे. मागासलेल्या देशांत

यंत्रांच्या सर्व प्रकारच्या अभावामुळे प्रगती मंदावली आहे तर आपल्याकडे अनेक उद्योगांत जादा उत्पादनशक्ती आहे; आपल्याकडे हुशार तज्ज्ञ आहेत आणि त्यांना त्यांच्या मानाने कमी प्रतीचे काम करावे लागत आहे आणि अपूर्णविकसित देशांत तज्ज्ञ मिळविण्यासाठी आक्रोश करावा लागत आहे! स्वतःच्या पाठीवर आपले ओझे वाहणारे लोक ज्या देशात आहेत, तिथल्या लोकांना ज्यांचा अमूल्य उपयोग होऊ शकेल अशी वाहने आपण मोडीत काढीत आहो. तसेच आपण टाकून देत असलेले जुने कपडे ज्यांना नेहमीच दुसऱ्यांनी वापरलेले कपडे घालावे लागतात अशा गरीब स्त्री-पुरुषांना फार उपयोगी पडतील. हलाखीत असलेल्या सुमारे डझनभर देशांच्या अर्थसंकल्पा-एवढा खर्च आपण रात्रीच्या क्लबांतून करीत असतो ही एवढी संपत्ती मनुष्य-जातीच्या कल्याणासाठी न वापरणे हे नैतिक अधःपाताचे लक्षण असून त्यामुळे बाहेरील क्रांतीमुळे जसा होईल तसाच पाश्चात्त्य जगाचा विध्वंस होईल.

आणखी एक शेवटचा विचार सांगता येईल. अलिप्त राहणाऱ्या अमेरिकेचे राजकीय भवितव्य उज्ज्वल राहणार नाही. विकासमार्गावरील जगाची भीती बाळगल्याने, त्याचा विजय हा आपला पराभव समजल्याने आत्तापर्यंत स्वस्थ असलेल्या दक्षिणेकडल्या व पूर्वेकडल्या पोकळीत इतिहास वेगाने प्रवेश करीत आहे. ही आपल्यासाठी धोक्याची सूचना मानल्याने पाश्चात्त्य देशांतील अनिष्ट राजकीय प्रवाहांना उत्तेजन मिळेल. अलिप्तपणामुळे बाहेरील क्रांतिकारी सरकारांशी संबंध ठेवणे आपल्याला टाळता येईल, पण त्यामुळे देशातच अनिष्ट गोष्टींना तोंड देण्याची पाळी आपल्यावर येईल.

अधिक विधायक व आकर्षक असा कार्यक्रम आपल्याला विकासकार्यात निवडक असा भाग घ्यावयास लावील. निराळ्या शब्दांत सांगायचे तर ज्या देशात हुकूमशाहीचा आणि आत्यंतिक डाव्या उपायांचा अवलंब केल्या-शिवाय विकासाचा गड चढून जाण्याची शक्यता आहे अशा देशांवर आपली मदत केंद्रित करणे उचित होईल. मेक्सिको, अर्जेंटिना, ब्राझील, भारत अशा देशांची नावे निवडक मदतीच्या कार्यक्रमाचे लक्ष्य म्हणून घेतली जातात.

आपला पैसा ज्या देशांकडे पाठविणे फलप्रद आहे त्या देशांकडे तो पाठवणे समर्थनीय ठरेल. कारण एकतर यशस्वी विकास जेथे होतो तेथे पैसा उपयुक्त-पणे वापरला जातो आणि दुसरे म्हणजे त्या देशांना पैसा दिल्याने आपली

नैतिक पातळी उच्चपणाला प्राप्त होते. विकास-प्रक्रियेत जी वास्तवता आहे तिच्यामुळे प्रत्यक्षात मदत करताना सुद्धा निवड केली जातेच. तरीपण अशी मदत करणे हे अधिकृत धोरण म्हणून ठरविण्यात बऱ्याच अडचणी आहेत. कारण असाम्यवादी समजल्या जाणाऱ्या व विकासात यशस्वी ठरलेल्या देशांतही भवितव्याची हमी देता येणार नाही. मेक्सिको, भारत, अर्जेंटिना व ब्राझील या चारी देशांत अनिश्चिततेचे वातावरण नाही असे नाही.

आणि वरील देशांत सर्व गोष्टी इष्ट मार्गाने घाडल्या तरी त्यांनाच फक्त मदत करणे हे सोपे किंवा शक्य होणार नाही. कारण त्यामुळे इतर देशांतील अनिष्ट प्रवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. भारताच्या तुलनेने पाकिस्तानला मदत कमी केल्यास तेथे काय होईल? अर्जेंटिनाला मदत करून चिली, कोलंबिया, व्हेनेझुएला यांना नाकारता येईल काय? नायजीरियाला मदत देऊन घानाला मदत न करणे व्यवहार्य होईल काय? राजकीय वास्तवतेच्या दडपणामुळे केंद्रित केलेली मदतसुद्धा अपरिहार्यपणे पसरू लागते. आपली मदत ज्या देशांना देणे सर्वांत उपयुक्त ठरेल त्या देशांकडे ती वळवणे योग्य ठरेल. पण इतरांना बाजूला सारून अशी मदत करता येईल काय, याबाबत शंका आहे. परराष्ट्रीय मदतीच्या आपल्या कार्यक्रमात विविध प्रकारच्या देशांचा अंतर्भाव करावा लागेल. यशस्वी देशांबरोबर अयशस्वी देशांना, मित्रत्व अधिक असलेल्या देशांबरोबर ते कमी असलेल्या देशांनाही मदत करावी लागेल.

राजकीय धोरणाची तत्त्वे :

आर्थिक विकासाच्या क्रांतिकारक प्रवृत्तींबरोबर वाटचाल करावयाची झाल्यास आपल्याला काय करता येईल?

हे स्पष्ट केले पाहिजे की दृष्टिकोनात बदल ही जेवढी महत्त्वाची गरज आहे तेवढी धोरणात बदल ही नाही. आपल्याला परिचित असलेल्या विचारपद्धतीतून बाहेर पडून विकासासाठी धडपड ज्या देशांत चालू आहे त्यांचा दृष्टिकोन आपण आत्मसात केला पाहिजे. आपण अनेक वेळा वापरलेला शब्दप्रयोग पुनः वापरायचा झाल्यास महान आरोहणाचे स्वरूप काय आहे हे आपण पाहिले पाहिजे, तें कसे असावे ह्याबद्दल आपल्याला जे वाटते ते पाहून चालणार नाही.

या भिन्न दृष्टीने पाहिल्यास आपल्याला ही जाणीव होते की प्रवाहाविरुद्ध न जाता प्रवाहाबरोबर आपण गेल्यास आपल्याला विकासाच्या दिशेवर प्रभाव पाडता येईल. निराळ्या शब्दांत सांगावयाचे तर महान आरोहणाची दिशा आपल्याला पालटावयाची असेल तर अनेक देशांत विकासाच्या प्राथमिक अवस्थेत राजकीय हुकूमशाही व आर्थिक समुदायवाद यांची गरज आहे हे मान्य करावे लागेल. स्पष्टच बोलावयाचे झाल्यास लोकशाहीयुक्त भांडवलशाही हा आर्थिक व राजकीय व्यवस्थेचा नमुना म्हणून स्वीकारल्यास, निदान आपल्या आयुष्यात तरी तिचा प्रभाव पश्चिमेपलीकडील देशांत पडणार नाही ह्या स्पष्ट गृहीतावर आपले परराष्ट्रीय धोरण आधारले पाहिजे.

वरील तत्त्वाचा अधिकृतरीत्या पुरस्कार केला तर अनेक व्यावहारिक व तांत्रिक अडचणी उपस्थित होतील हे सांगावयास नकोच. शक्तीचा वापर करून नव्हे,तर प्रत्यक्ष उदाहरणाने पाश्चात्त्य जीवनपद्धतीचा प्रसार करता येईल अशी ज्यांची समजूत करून देण्यात आली आहे त्या मतदारांपुढे असला अप्रिय व पलायनवादी समजण्यात येणारा विचार मांडण्यातील धोका अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणात तेथील सत्ताधाऱ्यांना पत्करावा लागेल. बाह्य धोरणाबाबत आपले हित अन्यत्र उदारमतवादी सरकारे येण्यात आहे आणि आर्थिक-दृष्ट्या समुदायवादी सरकारांना आपण विरोध केला पाहिजे हे साधे मार्गदर्शक तत्त्व एका झटक्याने नष्ट होईल.

तथापि असा 'पलायनवादी' दृष्टिकोन आपल्या संस्थांचे रक्षण करण्याच्या व काही प्रदेशांत तरी आपला परिणामकारक प्रभाव पाडण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतो ही नियतीची कठोरता म्हणावी लागेल. जी सरकारे विकासाला जास्तीत जास्त गतिमान करू शकत नाहीत, मग ते कोणत्याही कारणाकरिता असो, त्यांना पाठिंबा दिल्यास पुढे होणाऱ्या व नियंत्रणापलीकडे गेलेल्या प्रवृत्तीतून उद्भवणाऱ्या क्रांतीचा पाया घालण्यासच आपण मदत करतो. आणि ह्या उलट हुकूमशाही व समुदायप्रवृत्तीमुळे अप्रिय वाटणाऱ्या सरकारांना मदत केल्याने अधिक अनिष्ट अशा गोष्टी आपल्याला टाळता येतील ही जाणीव, तो दृष्टिकोन आपल्याला करून देतो. याचा अर्थ जुलमी सरकारांना त्यांच्यातील दडपशाहीच्या गुणामुळे अमेरिकेने पाठिंबा द्यावा असा खचितच नव्हे. शुद्ध दडपशाही व दडपशाहीवर अधिष्ठित पण सहेतुक अशी शिस्त यात भेद

करण्याचे कठीण काम वरील वास्तव धोरणात अभिप्रेत आहे. तसेच गतिहीन हुकूमशाही व हुकूमशाहीतला विकास यात फरक केला पाहिजे. बऱ्याचदा दोन्ही गोष्टी एकत्र दिसतील. त्या परिस्थितीत मानवी हक्क व मालकी हक्क यात गोंधळ करण्याची मोहवशता आपण टाळली पाहिजे व त्यायोगे पुराणमतवादी राजवटींना आपला पाठिंबा व जहाल राजवटींना आपला विरोध हयांना बुद्धिवादाचे अधिष्ठान दिले पाहिजे.

सर्वांत विशेष हे की अमेरिकेचे धोरण प्रभावी व्हावयाचे असेल तर अपूर्ण-विकसित देशांतील समाजवादासंबंधीचा आपला दृष्टिकोण तिला बदलावा लागेल. सध्याच्या साम्यवाद्यांच्या वर्चस्वाखाली जाणे विकासशील देशातील जहाल नेत्यांपैकी फारच थोड्यांना आवडते, हे आपण पाहिलेच आहे. पण महान आरोहणाच्या संकलित दडपणाखाली, असाम्यवादी सरकारांना देशी समाजवादाच्या दिशेने जाऊन आपले प्रश्न स्वतंत्रपणे सोडवण्याच्या कामी शक्य तेवढी मदत न मिळाल्यास साम्यवाद्यांच्या गोटात जाणे भाग पडते.

आपल्या नियोजन-अधिकाऱ्यांनी व शासकीय अधिकाऱ्यांनी द्रुत-विकासासाठी आर्थिक नियोजनाची व राजकीय हुकूमशाहीची आवश्यकता आहे हे बऱ्याच प्रमाणात ओळखले आहे; पण अजून पूर्णपणे ओळखले नाही. डोळस शासकीय धोरणांना कायदेमंडळाचा पाठिंबा मिळण्यासाठी दीर्घकाळपर्यंत कसून प्रचार करावा लागेल. मुक्त खाजगी अर्थोद्योग आणि लोकशाही या दोहोंना जेथे काही अर्थ नाही एवढेच नव्हे तर त्यामुळे गोंधळ माजण्याचा व पीछेहाट होण्याचाही संभव असतो, तेथेही वजनदार मंडळींकडून ह्या दोन गोष्टींचा उदोउदो केला जातो, तेव्हा तिथल्या देशांत पुढाऱ्यांना आपली धोरणे समजावून देणें कठीण जाते. उदाहरणार्थ, न्यूयॉर्क टाईम्समध्ये अशा आशयाचा अग्रलेख आला की, ईजिप्तमध्ये समाजवादाचा उदय होणे हे खेदजनक आहे आणि तेथील लोकांना आपण आपली लोकशाहीवर अधिष्ठित असलेली मुक्त अर्थव्यवस्था समाजवादाच्या कोणत्याही प्रकारापेक्षा चांगली आहे, हे पटवून द्यावे तर तेथील नेत्यांना वाटेल की आपल्या हक्काधिष्ठित व्यवस्थेचे समर्थन करण्यासाठी इतरांचा विकासवेग मंदावला किंवा त्यांना आर्थिक न्याय मिळाला नाही तरी त्याची अमेरिकेला पर्वा नाही. आणि जोपर्यंत अमेरिकेतील हितसंबंधीय विकासाचे

माध्यम भांडवलशाही हेच व्हावे, समाजवाद होऊ नये असा आग्रह धरीत राहतील तोपर्यंत अपूर्णविकसित देशांतील तक्रार खरी राहील.

बहुसंख्य विकासशील देशांत विकासाबाबतची जी वास्तवता आहे तिचा मुख्य परिणाम अमेरिकेतील महत्त्वाच्या गटांनी वेगळी भाषा बोलण्यात झाला पाहिजे. त्यांनी मार्क्स-लेनिनवाद स्वीकारला पाहिजे असे नाही; पण नियोजन, नियंत्रण व आर्थिक सामाजिक न्याय यांचे महत्त्व जाणले पाहिजे. आपला सल्ला क्रांतीच्या नेत्यांनी ऐकला पाहिजे असे अमेरिकेला वाटत असेल तर तिच्या प्रवक्त्यांनी त्या देशांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली पाहिजेत.

परराष्ट्रीय मदतीचे आंतरराष्ट्रियीकरण :

तेव्हा क्रांतीची संभाव्यता मान्य करूनच विकाससंबंधाचे पाश्चात्त्यांचे परराष्ट्रीय धोरण ठरले पाहिजे. त्यानंतरही हे स्पष्टपणे लक्षात घेतले पाहिजे की, अमेरिकेतील नेतृत्व कितीही धाडसी व सद्हेतुपूर्ण असले तरी अमेरिकेने फार अपेक्षा बाळगण्यात अर्थ नाही. दरिद्री आणि हक्कासाठी धडपडणाराला जगात श्रीमान व अधिकारसमृद्ध देशाला इतरांच्या अपेक्षाभंगाचे व शत्रुत्वाचे लक्ष्य व्हावेच लागते. आपण विकासशील देशांच्या अंतर्गत प्रश्नाबाबत नवी समज दाखवून त्यांचा गैरसमजावर आधारलेला विरोध कमी करण्यात यश मिळविले, तरीही त्यांचा सर्वसाधारण परराष्ट्रीय दृष्टिकोण पाश्चात्त्यविरोधी व अमेरिकाविरोधी राहील.

जे देश केवळ हुकूमशाहीवादी अथवा समुदायवादी नव्हे, तर प्रत्यक्षपणे अमेरिकाविरोधीही आहेत, अशा देशांना मदत देणे अमेरिकेला कठीण वाटेल हे नक्कीच. विकासासाठीच द्यावी लागणारी मदत म्हणून आपण ही किंमत मान्य केली तरी ज्यामुळे तात्कालिक हितसंबंधाबाबत संघर्ष होणार नाही असे विकासाचे मार्ग शोधून काढणे हा अमेरिकेच्या धोरणाचा एक आनुषंगिक भाग ठरेल. निराळ्या शब्दांत सांगायचे तर जे देश जाहीरपणे आपल्याशी सहानुभूतिशून्य अथवा विरोधी भावना बाळगून आहेत अशा देशांना प्रत्यक्षपणे मदत केल्याशिवाय विकासाची गती वाढवता येईल असे मार्ग आपण शोधून काढले पाहिजेत.

हे कठीण उद्दिष्ट साध्य करण्याचा एकच मार्ग आहे. विकास-प्रयत्नांचा अधिकाधिक भाग आंतरराष्ट्रीय संघटनांकडे सोपवणे. विकासाला करावयाची

मदत शक्य तेवढ्या प्रमाणात अंतर्गत राजकारणाच्या कक्षेबाहेर ठेवली पाहिजे.

हे उद्दिष्ट अल्पावधीत सफल होणारे नाही. मदतीचा कार्यक्रम परिणामकारकरीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक त्या आंतरराष्ट्रीय संघटना अस्तित्वात नाहीत. अस्तित्वात असलेल्या संघटनांकडून झालेल्या मदतीच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी उल्लेखनीय नाही, त्यात कधी फारच काटेकोरपणा दिसतो, तर कधी फारच औदार्य दिसते.मदतीचा कार्यक्रम ताबडतोब संपूर्णपणे संयुक्त राष्ट्रसंघाकडे किंवा पाश्चात्त्य देशांच्या एखाद्या नव्या संघटनेकडे द्यावा असे म्हणण्याचा परिणाम बहुधा काँग्रेसकडून केली जाणारी तरतूद बरीच कमी होण्यात होईल व त्यामुळे मदत ज्यांना मिळत आहे ती राष्ट्रे अशा संघटनेला तीव्र विरोध करतील.

तरी पण विचारपूर्वक नियोजन करणे अगत्याचे आहे. विकासशील देशांतील ताण आणि विस्कळितपणा काही झाले तरी कमी होणार नाही हे आपण पाहिलेच आहे. अपूर्ण विकसित जगात क्रांतिकारक प्रवृत्ती दिसून येणार व आपल्यापुढे ज्यांचा राजकीय रंग आपल्याला आवडणार नाही अशा सरकारांना मदत करण्याचा प्रश्न उभा राहणार हे लक्षात घेऊन हितसंबंधातील विरोध सौम्य कसा करता येईल व विकासातील मदतीला लोकमान्यता व लोकांचा पाठिंबा मिळणे कठीण असताही ती चालू कशी ठेवता येईल याचा विचार झाला पाहिजे.

वरील संभाव्य संकटावर उपाय म्हणून आजच्यापेक्षा पुष्कळ अधिक प्रमाणात साहाय्याचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे यापेक्षा अधिक समाधानकारक काही दिसत नाही. आरोग्य, तांत्रिक साहाय्य, शेतकी संशोधन इत्यादी बाबतीत परराष्ट्रीय मदत राजकारणाच्या कक्षेबाहेर टाकण्याचे कार्य सुरू झाले आहे. जागतिक आरोग्य संघटना, तांत्रिक साहाय्य मंडळ, अन्न-शेती संघटना, यासारख्या संस्था निर्णय घेतात व कार्यक्रमांची अंमलबजावणी करतात. त्यांतील कित्येक कार्यक्रमांचे अमेरिकेतील प्रकल्प असे वर्णन करता येणार नाही. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय संघटनांकडे शास्त्रीय जबाबदारीचे होणारे हस्तांतर, क्रांतिकारक सरकारांना मदत करण्यात निर्माण होणारा हितसंबंधीय विरोध खचितच नाहीसा करू शकणार नाही; पण तरीही संघर्ष मर्यादित करण्याचा तो जास्तीत जास्त चांगला मार्ग ठरेल.हा मार्ग जेथे प्रत्यक्ष मदत सुरू करणे आणि व्यवहारात अधीक फलदायक ठरू शकेल तेथे ती चालू ठेवणे या मार्गाशी विसंगत नाही.

अंतर्गत सुधारणा :

मदतीचे आंतरराष्ट्रीयीकरण केल्यास महान आरोहणाला अंतर्गत राजकारणात उद्‌भवणारा विरोध काही प्रमाणात कमी होऊ शकेल. पण त्याचा परिणाम विकासशील देशांतच जे विरोधी प्रवाह विकासातूनच निर्माण होतील त्यांवर होणार नाही. त्या विरोधातून उद्‌भवणाऱ्या प्रखर द्वेषाला तोंड देण्याचा अमेरिकेला एकच परिणामकारक मार्ग मोकळा आहे. त्या देशांना अमेरिकेने असे दाखवून दिले पाहिजे की, अमेरिकेपुढेही वेगळ्या स्वरूपाच्या पण महत्त्वाच्या समस्या आहेत आणि त्या सोडवताना जेवढे राजकीय धैर्य अमेरिका इतर देशांत अपेक्षित तेवढे दाखविण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे.

येथे एका महत्त्वाच्या पण नाजूक प्रश्नाचा विचार करणे भाग पडते. विकास हा प्रश्न आज वर्णसंबंधित आहे. आणि त्यावर जी राष्ट्रे गौरवर्णीयांपेक्षा कृष्णवर्णीय हीन आहेत असे मानतात त्या देशांचे वर्चस्व आहे. तेथे पाश्चात्य देशांनी विशेषतः अमेरिकेने आपल्या मनःप्रवृत्तीची तपासणी मोकळेपणी केली पाहिजे. युनायटेड स्टेटस हे आज घटकेला वर्ण-पक्षपाती राष्ट्र आहे. केंद्रवर्ती संघराज्याबाबत हे खरे नाही; पण काही राज्यसरकारांबाबत हे खरे आहे. तसेच बहुसंख्य जनतेच्या प्रेरणात व प्रवृत्तीत आणि कृतीत वर्णपक्षपात होत आहे हे स्पष्ट आहे आणि हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे, मग ते कितीही अप्रिय असो.

फेडरल सरकारचे अधिकृत धोरण वंशभेदाविरुद्ध असले तरी त्या धोरणाचा पाठपुरावा करताना जे धोके पत्करावे लागतात, ते पत्करण्याचे धैर्य त्या सरकारने दाखवले आहे असा त्याचा लौकिक नाही. जगातल्या कृष्णवर्णीय राष्ट्रांना दिसते ते हे की, विरोधी राजकीय तत्त्वज्ञान चिरडण्याकरता लष्करी शक्तीचा उपयोग करण्यास अमेरिका खळखळ करीत नाही, पण अंतर्गत वर्णाप्रश्न काढला की हजारो प्रकारची दक्षता घेण्याची भाषा अमेरिका वापरते. वर्णसमतेच्या उद्दिष्टासाठी मोठा राजकीय धोका पत्करण्यास अमेरिका तयार नाही आणि हे ध्येय जेवढ्या मोठ्याने उच्चारिले जाते तेवढ्याच मऊपणाने आचरणात आणले जाते असे सकृत्‌दर्शनी तरी वाटते. हा मोठा दोष नाहीसा केल्याशिवाय, निदान त्यासाठी धैर्याने व सातत्याने प्रयत्न केल्याशिवाय अमेरिकेला आणि काही प्रमाणात पाश्चात्य देशांना आपली राज्यव्यवस्थ-

आदर्श आहे आणि गौरवर्णीय देशांनी ती अनुसरणे योग्य ठरेल असा दावा करता येणार नाही.

वरील प्रश्न हा वांशिक अन्यायाच्या प्रश्नापेक्षा अधिक व्यापक आहे. ज्या स्वातंत्र्याच्या तत्त्वातून अमेरिकेचा उदय झाला त्याची धुरा वाहण्याचे व रक्षण करण्याचे कार्य अमेरिका अजूनही करीत आहे हे विकासशील देशांतील नव्या नेत्यांना पटवून देण्याचा हा प्रश्न आहे. दक्षिणेकडील आणि पूर्वेकडील देशांना असे वाटते की पाश्चात्त्यांची वाटचाल स्वातंत्र्याच्या निशाणाखाली होत नाही हे आपण मान्य केले पाहिजे. पाश्चात्त्यांना स्वातंत्र्याचे नेते न मानण्यात अपूर्णविकसित देशांतील नेते कृतघ्नपणा करीत आहेत किंवा पाश्चात्त्यांना योग्य ते श्रेय द्यावयास तयार नाहीत असे जे म्हणतात त्यांनी हे लक्षात ठेवावे की नेहरूंनी आपला महान ग्रंथ ब्रिटिशांच्या तुरुंगात लिहिला. इंडोनेशियातील आजचे नेते एकेकाळी डचांचे राजकीय कैदी होते, अल्जेरियन क्रांतीचे नेते फ्रेंचांकडून फसवणूक करून पकडण्यात आले होते, अशा प्रकारची अनेक उदाहरणे देता येतील.

तेव्हा पाश्चात्त्य देशांना जी कामगिरी करावयाची आहे ती स्वातंत्र्याबाबत आत्मीयता बाळगण्याची आपली जी ऐतिहासिक परंपरा आहे ती अबाधित राखण्याची नसून तिचे पुनरुज्जीवन करण्याची व जगाला ते नव्याने पटवून देण्याची आहे. समजूतदार, उदार व वास्तव परराष्ट्रीय धोरण आखून काही प्रमाणात हे साधता येईल. पण बऱ्याच प्रमाणात ते साधण्यासाठी अंतर्गत सुधारणांचा आश्रय करावा लागेल. पाश्चात्त्यांचे अनुकरण मागासलेल्या देशांच्या आर्थिक व राजकीय विकासात ताबडतोब करता येईल असे म्हणणे व्यर्थ आहे. दीर्घकालाच्या संदर्भात पाश्चात्त्य नमुना तेथेही परिणामकारक ठरेल अशी आशा आपल्याला करण्यास व त्या दृष्टीने कार्य चालू ठेवण्यास हरकत नाही. पाश्चात्त्यांना व अमेरिकेला आपल्या समाजाच्या रूपाने मूर्तिमंत उदाहरणे मागासलेल्या देशांपुढे उभी करून त्या देशांना भविष्यकाळासाठी अनुकरणीय वाटेल असा आशय स्वातंत्र्याला देता येईल–विरोधकांच्या हक्काबाबत देखील योग्य ती जागरूकता, बिनहक्कदार व्यक्तीबाबत हक्कदार व्यक्तीसंबंधीच्या आस्थेपेक्षा अधिक आस्था, उपभोग्य वस्तूंच्या संचयापेक्षा अधिक महत्त्वाच्या व्यक्तिगत जीवनासंबंधीच्या आकांक्षांना

उत्तेजन हा अर्थ त्याला देता येईल. बीजावस्थेत असलेल्या जागतिक क्रांतीचा आदर्श अद्यापही पाश्चात्त्य देश आहेत; पण जोपर्यंत स्वतःलाच स्फूर्ती देण्यात पश्चिमेला यश येऊ शकत नाही तोपर्यंत ती जगाला स्फूर्ती देण्यात यशस्वी होणे असंभवनीय आहे.

अमेरिकेपुढील मार्ग :

जागतिक आर्थिक विकासाच्या नेतृत्वाची किंमत अंतर्गत राजकीय आव्हानाच्या स्वरूपात आपल्याला द्यावी लागेल.

हे आव्हान कदाचित फार मोठे ठरेल. विकासाच्या समस्यांबाबत स्पष्ट शब्दांत बोलणे, अप्रिय पर्यायांचा व नैतिक अनिष्टांचा विचार करावयाला लावणे, ज्याचे राजकीय आणि आर्थिक स्वरूप आपल्याला परकी आणि अप्रियही आहे, अशा सरकारांना उत्तेजन देणे ही कदाचित राजकीय हाराकिरी मानली जाईल. परकी मदतीचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे अव्यवहार्य मानले जाईल. वांशिक समतेचा निर्भेळ पुढाकार करणे मुत्सद्देगिरीचा अभाव मानला जाईल, शेकडो बाबतींत अंतर्गत सुधारणांचा आग्रह धरणे अनावश्यक समजले जाईल. निराळ्या शब्दांत आपल्या पुढील पर्यायांचे स्वरूप केवळ तात्त्विक असेल, वास्तव नसेल. तसे असल्यास आणि या पुस्तकातील तर्कशास्त्र बरोबर असल्यास निष्क्रियतेचे परिणाम सोसण्याची म्हणजेच आपली प्रतिष्ठा व नेतृत्व नाहीसे होऊन साम्यवाद्यांना ते लाभलेले पाहण्याची तयारी ठेवली पाहिजे.

वर्तमानकाळातील ऐतिहासिक परिवर्तनावर प्रभाव पाडण्यासाठी धीरोदात्त मार्ग आक्रमण्याचा धोका पत्करण्याचे सामर्थ्य अमेरिकेत व पाश्चात्त्य देशांत आहे की नाही हे सांगणे कठीण आहे. अपूर्णविकसित देशांतील परिस्थिती व आपली परिस्थिती यांत एवढी तफावत आहे की, त्यांच्या दृष्टीतून जो कार्यक्रम मवाळ ठरतो तो आपल्याला धिटाईचा व जहाल वाटतो. भवितव्यात अमेरिकेचे स्थान टिकवण्यासाठी–क्रांतिकारक जगात तिचे नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी नव्हे–जी उपाययोजना आवश्यक आहे तिचा आपल्या परिवर्तनशीलतेवर फार ताण पडेल आणि हे तिच्यातील सत्ताधारी आणि मतदारवर्ग ह्या दोहोंबाबत खरे आहे. या आगामी कसोटीला ती उतरेल की नाही याबाबत खात्रीने बोलणे कोणालाच शक्य नाही.

आर्थिक विकासाची किंमत फक्त विकासमार्गी जगालाच द्यावी लागणार नाही यांत शंका नाही. त्याचा ताण प्रगत देशांवरही पडेल. भवितव्याच्या लांब फासातून श्रीमान व गरीब, आहेरे व नाहीरे वर्ग या सर्वांनाच जावे लागेल. त्या कठीण प्रसंगात ज्याचा तो जीवनमरणाचा प्रश्न आहे तो गरीब वर्ग, ज्यांचा तो केवळ प्रचलित जीवनरीती टिकवण्याचा प्रश्न आहे त्या श्रीमंतांच्या तुलनेने डगमगून जाण्याची कमी शक्यता आहे.

महान आरोहण हे मंद, क्रूर व भीतिदायक असेलही; पण ते घुसळून काढणारे, मोह पाडणारे व भव्यही आहे. कितीही कठीण असला तरी तो शतकानुशतकांच्या गर्द अंधकारातून प्रकाशाकडे व जीवनाकडे नेणारा इतिहासाचा मार्ग आहे. त्यातून अव्यवस्था, पुनर्घटना, तात्पुरता पराजय या गोष्टी उद्भवतील हे दुर्दैवी बहुसंख्य जनतेबद्दल जेवढे खरे आहे, तेवढेच सुदैवी अल्पसंख्य जनतेबाबतही खरे आहे. पण ज्यात प्रथमतःच संपूर्ण मानवजातीचे सामर्थ्य अजमावले जाणार आहे अशा दीर्घावधीनंतर येणाऱ्या युगाची चाल्ल काळ ही नांदी ठरेल, ह्या दृष्टीने त्याकडे पाहणे शक्य आहे. संकट जेवढे मोठे आहे तेवढेच त्यानंतरचे भवितव्य उदात्त आहे. महान आरोहण आपल्याला करावयाचे असेल तर शेवटी त्या भवितव्याकडेच आपण आपल्या आशांचा व दृष्टीचा मोहरा वळवला पाहिजे.

• •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वर्गांक ५४६.२१ दि: ...
प्रवेश २००९ नों दि. २३/३/०१
९५९१०

REFBK-0015910

आर्थिक समृद्धीच्या शिखरावर असलेल्या अमेरिकेच्या अर्थरचनेविषयी हे काही ग्रंथ

* * * *

अमेरिकेची अर्थरचना

अमेरिकेची संमिश्र अर्थरचना; तिच्यात बदल कसे करण्यात आले आणि करण्यात येत आहेत.

संपादक : जेसी डब्ल्यु मार्खम्; अनु. : प्रा. बाळ गाडगीळ : रु. ५·००

आर्थिक विकास

अमेरिकेच्या आर्थिक विकासाची उद्दिष्टापासून अपेक्षेपर्यंतची अमेरिकेच्या राजदूताने केलेली सर्वांगीण चर्चा.

जॉन केनेथ गॅलब्रेथ; अनु. : दिनकर साक्रीकर : रु. १·५०

आर्थिक विकासाच्या रूपरेखा

अमेरिकेतील अर्थव्यवस्थेचे 'जसेच्या तसे' वर्णन; आर्थिक विकास आणि स्वातंत्र्य याबाबतीतले अमेरिकेचे अनुभव.

जेम्स डी. काल्डरवुड आणि हॅरॉल्ड जे. बिऑन्हेन्यू;

अनु. : अंबिका सरकार : रु. २·००

आर्थिक प्रगतीचे रहस्य

लोकशाही उद्योगवादातून बहुजनसमाजाचा स्तर कसा उंचावतो याचे चित्रण.

डिमिट्रिऑस जी. कुस्लस; अनु. : स. ह. देशपांडे : रु. १·००

अमेरिकन भांडवलशाही

अमेरिका आणि तिची अर्थव्यवस्था यांचे जगाला दिसलेले स्वरूप.

जॉन केनेथ गॅलब्रेथ; अनु. : विद्याधर पुंडलीक : रु. २·००

अमेरिकेची अर्थव्यवस्था

अमेरिकन लोकांच्या आर्थिक घडीची सुस्पष्ट कल्पना आणून देणारा ग्रंथ.

जेरहार्ड फोम, थिओडोर जीगर; अनु. : श्री. मं भांडारे : रु. ५·००